सहामाही ,, ३ ,, ०८
सालअखेर ,, ७ ,,१ ०८
किरकोळ अंकास .... .... .... ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।१०६
दुसरे खेपेस .... .... ०१

Annual in advance 5 Postage 13 as.
Annual in arrears 7 ,, 1 Rs. 8 as.
Six monthly ... ... ... 3 ,, 8 as.
Single copy ... ... ... ... 4 as.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ine 3 as

# वऱ्हाडसमाचार.

## THE BERAR SAMACHAR

VOL XXX AKOLA MONDAY 3 FEBRUARY 1896 NO 5

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख ३ माहे फेब्रुवारी सन १८९६ इ० अंक ५

### घड्याळ.

किंमत रुपये ६ हमी ३ वर्षांची

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि भक्कम ह्या फोटोप्रमाणें वॉच घ्या. ६०० वर खपलीं. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.




आम्ही स्विटझरलंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम कराविलीं आहेत. यावर आमचें नांव आहे. हें घड्याळ रेल्वे रेग्युलेटरचें असून याचे कांटे टासकोप प्रमाणें असून सेकंडकाटा आहे मागील बाजूस झांकण असून आंत कांच आहे. चावी देण्यास मोगरा आहे. डायल ( लेटी ) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांत ६ जीवेल ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविले आहेत. ) ज्या घड्याळास रुबी जुवेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यात व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरीं घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्याची जो उमेद बाळगील त्यास १०।११ वर्षांत दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल. व्ही. पी. नेही घड्याळ पाठवूं.

टीपः— " गिऱ्हाइकांस घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल. "

गोविंद महादेव पोळ.
९२-२४ वॉचमेकर आणि रिपेरर नासिक.

### जाहिरात

वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजाचा यंदाचा समारंभ अकोलें येथें तारीख २८ व २९ फेब्रुवारी सन १८९६ [ शुक्रवार व शनिवार ] रोजीं होणार आहे. समाजाचे वेळीं मेंबरांनीं अगत्य येण्याची कृपा करावी. समाजा पैकीं कांहीं मेंबरांचीं नांवें आह्मांस ठाऊक नसल्यामुळें त्यांस आमचेकडून निमंत्रण चिठ्या गेल्या नाहींत तरी त्यांणीं हेंच निमंत्रण समजून वर्गणी होतां होईल तितकी लवकर पाठवावी. वर्गणीचे दर नेहमी प्रमाणें १ रु० २ रु० व रु० ५ आहेत कळावें.

अकोलें ता० ५।१।९६ { दत्तात्रय कृष्ण कोल्हटकर व लक्ष्मण गोविंद ओक सेक्रेटरी.

### नोटीस

नोटीस वेशमी मेहेरबान लाला चुनीलाल मारवाडी दुकान सुनगांव तालुके जळगांव यांस खालीं सही करणार यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मी तुमचे दुकानीं रुपये २७९७ दोन हजार सातशें सत्याण्णव जमा ठेविले आणि आमचे जातींत पंचांनीं माझ्या बद्दल असें ठरविलें कीं, रोख रुपये दोन हजार पांचशें २५०० पंचांस द्यावे व पंचांनीं माझी सोयरीक वगैरे करावी असें कबूल करून पंचवीसशें रुपये मी पंचांस तुमचे दुकानावरून दिले व त्या बद्दल पंचांची पावतीही पंचांकडून मिळाली ती मजपाशीं आहे. आतां तुमचे दुकानीं सदरी लिहिलेली रकम रुपये २७९७ ठेऊन जमा केलेली त्यांतून पंचांस दिलेली रकम २५०० वजा जातां बाकी तुमचे जवळ जमा असलेली रकम २९७ व या रकमेचें व्याज आह्मास रकम देऊन मावती घेईपर्यंत दर शेंकडा १८ प्रमाणें व्याज असें मिळून रुपये नोटीस पावल्या पासून १५ दिवसांत आणून द्यावे न दिल्यास रीती प्रमाणें फिर्याद करून फिर्याद खर्च नोटिशीचा खर्च व अखेर निकाल होइ पर्यंत इतर जो खर्च होईल तो व्याजासह भरून घेतला जाईल ह्मणून दिली नोटीस सही. तारीख २८ माहे जानुवारी सन सन १८९६ इसवी.

( सही )
सहीची निशाणी वखर महादु वल्लद कृष्णा हरी मुरे रहाणार सुनगांव निशाणी खुद्द.

### नोटीस

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं ता० १४ माहे फेब्रुवारी सन १८९६ रसवी रोजीं मे० डेपुटी कमिशनर साहेब बहादुर जि० एलिचपूर यांचे कचेरीत दोन प्रहरी १२ वाजतां छावणी परतवाडा येथील आठवडा बाजारचा मक्ता सन १८९६।९७ साला करितां हरास होणार आहे तर ज्या कोणास हरास घेणें असेल त्यांनीं वर लिहिलेल्या तारखेस हजर व्हावें. ता० २८ माहे जानेवारी सन १८९६ इ०

गणेश नागेश वकील
सेक्रटरी
एलिचपूर सि. स्टे. मुनसिपाल कमेटी.

### NOTICE

(Under sec. 147 of the Berar Municipal Law)

To,

The Chairman,
Cotton-Market-Committee
Khamgaon.

Sir,

Notice is hereby given that the order which the Committee gave to the firm of Bisandayal Ramnarayan of Khamgaon, on the application of the firm of Ganeshdas Bhatter of Khamgaon prohibiting the former firm the use of Cotton-Market at Khamgaon for fifteen days commencing from 25th. January 1896, is illegal and not justified by the facts of the case. The Committee are therefore informed that the firm of Bisandayal Ramnarayan will institute against them in the proper Civil Court, one month hence, a suit to obtain a declaration that the above order is either wrongly given or illegal or both, and to recover damages which the said firm has incurred and will incur within the said period of fifteen days.

Dated 29th. January 1896.

(Signed in Marwari)
Ramnarayan Bisandayal

॥ सरसो विपरीतत्वे सरसत्व न मुंचति ॥
कलंको विपरीतत्वे कलंकत्व न मुंचति ॥

" आत्मसंयमन करणें हें एक कर्तव्य आहे "

दुसऱ्याच्या वर्तनाची केवळ नक्कल न करितां स्वतःच्या अंगीं असणाऱ्या विवक्षीत गुणाच्या अनुरोधानें चालणें हेंच सत्यप्रिय मनुष्यास नेहमीं मान्य होतें. तो सदोदित असें ह्मणत असतो कीं " काय होईल तें होवो आपणाला जें सत्य दिसतें तेंच केलें पाहिजे. आपण जसें वास्तविक आहों त्याहून निराळें दाखविणें ह्मणजे लपंडाळी करण्यासारखे आहे. ह्या लपंडावीला जरी ढोंग ह्मटलें नाहीं तरी तसें करणें निंद्यच आहे. त्याच्याविषयीं दुसऱ्याचे मनांत जो ग्रह उत्पन्न झाला असेल तोच त्यास प्रिय असला पाहिजे व तो असतोच. त्याची सदसद्विवेक बुद्धि त्याला वारंवार असा उपदेश करिते कीं " कांहीं झालें तरी तूं आहेस तसाच लोकांच्या दृष्टीस पड असें केलेंस ह्मणजे तुजवर लबाडीच्या वर्तनाचा आरोप येणार नाहीं.

परंतु वस्तुस्थिति अशी आहे कीं ज्या मनुष्यास आपण वास्तविक आहों तसेंच दुसऱ्यांनीं पहावें, असें वाटत असतें, त्यांस आपण कोणत्या रीतीनें वागलों असतां दुसऱ्यास आहों तसें दिसूं, हेंच समजत नाहीं; इतकेंच नाहीं, तर स्वतः वर कसें अवलंबून राहावें हेंही त्यांच्या लक्षांत येत नाहीं. शिवाय दुसरें असें कीं अशा रीतीनें दुसऱ्यांनीं वागावें ह्मणून जे लोक मोठें वाक्-पांडित्य दाखवीत असतात ते देखील या वर्तनाच्या खऱ्या मार्गाविषयीं इतरांसारखेंच अज्ञान असतात.

तर मग स्वतःवर अवलंबून राहणें ह्मणजे काय ? असा प्रश्न साहजिकच पुढें येतो. स्वतःच्या वर्तनाचें धोरण, स्वतःचे उद्देश व एक प्रकारचा बाणा ह्या सर्वांचा चांगला मेळ घालून स्वार्थाकडे यत्किंचितही दुर्लक्ष न करितां व स्वतःच्या मनोविकारांत कोणताही विरोधभाव उत्पन्न न होऊं देतां आपला वर्तनक्रम ठेवणें असा या गूढ प्रश्नाचा अर्थ आहे काय ? किंवा अंतर्यामी सर्व मनोविकारांचा एक सारखा झगडा चालला असतांही निरनिराळ्या मार्गांनीं स्वकार्य साधण्याकडे दक्षता ठेवून कधींही पूर्ण न होणारी मनाची हाव तृप्त करण्याकरितां मोठी धडपड करून असंबद्ध वर्तनक्रम ठेवणें हाही अर्थ आहे काय ? " स्वतःवर अवलंबून राहणें " ह्या वाक्याचा वाईट अर्थ न करितां चांगला अर्थ देण्या जोगा आहे कीं नाहीं ह्याविषयीं थोडासा खोल विचार केला पाहिजे ह्या वाक्याचे हवे तितके अर्थ करितां आले तरी ज्याला कोणत्याही तऱ्हेनें बाध आणतां येणार नाहीं असा ह्या शब्दापासून कांहीं अर्थ निष्पन्न होईल कीं नाहीं ह्या बद्दल संशय घ्यावयास फारशी जागा नाहीं. या करितां अवलंबन ह्मणजे काय ? स्वतःवर अवलंबून राहणें ह्मणजे काय ? व आपण तसें वागतों असें दुसऱ्यांचे दृष्टोत्पत्तीस आणणें ह्मणजे काय ? या प्रत्येक प्रश्नाची पूर्णपणें व्याख्या करणें अगदीं जरूरीचें आहे.

स्वतःवर अवलंबून राहण्याकरितां स्वतःच्या मनाच्या कला प्रमाणें आपला वर्तनक्रम ठेविला पाहिजे असें नाहीं. त्याच प्रमाणें नीच प्रतीचे मनोविकार व उच्च प्रतीचे मनोविकार यांतील भेद विसरून जाऊन ज्या ज्या वेळेस आपली जसजशी लहर लागेल त्या त्या वेळेस तसतशी तोंडाची वटवट केली पाहिजे असाही त्याचा अर्थ नाहीं; स्वतःला अगर दुसऱ्यांना ज्या गोष्टी निंद्य वाटतात व ज्या गोष्टीची स्वतः आपणास " मनुष्य प्राणी " या नात्यानें अति शरम वाटेल त्या सर्व गोष्टी आपण जाणून बुजून छपवूं व ज्या गोष्टीची स्वतः किंवा दुसरे तारीफ करितील तेवढ्याच गोष्टी मात्र लोकांच्या नजरेपुढें आणूं तर आपल्या वर्तनांत खरेपणा कसा राहील ह्या बद्दल जबरदस्त शंका उत्पन्न होते. तर मग "स्वतःवर अवलंबणें" किंवा "आपले वर्तनांत आपलेपणा राखणें " ह्याचा चांगला अर्थ घ्यावयाचा किंवा वाईट असा घ्यावयाचा?

अर्थात मनुष्यानें आपले ठिकाणीं जो आपलेपणा राखायाला पाहिजे तो नीच प्रकारचा नसून जे उन्नत विचार आपणास वारंवार बोध करीत असतात व जे दुष्ट मनोविकारांशीं नेहमीं मोठ्या जोरानें भांडत असतात

त्यांच्या अनुरोधानें वर्तनक्रम ठेवणें हा होय. आपल्या आंगों नीच गुणांचे प्राबल्य असावें ही गोष्ट कोणाही म.णसास पसंत पडणार नाहीं; इतकेंच नव्हे तर, इतरांच्या आंगच्या नीच गुणावरून त्यांची परीक्षा करणें यथा-योग्य होईल असेंही त्यास बिलकूल वाटणार नाहीं. तसेंच जर एखादा मनुष्य आपल्या उत्तम मनीषा व सुविचार दाबून टेवून नीच रीतीनें वर्तन ठेवूं लागेल तर त्याच्या आंगच्या उत्तम गुणांच्या अनुषंगानें असणारा आपलेपणा त्याचे ठायीं आहे असें मुळींच ह्मणतां येणार नाहीं. आपल्या महत्वाकांक्षा व यत्न यांचे अनुसंबंधानानें जो मनुष्य आपले विचार उत्तम रीतीनें व्यवहांत आणितो त्याच्या अंगींच खरें आपलेंपण वाणिलेलें असतें. डेव्हिड ब्राउनिंग यानें सत्यप्रिय मनुष्याच्या मनाचें उत्कृष्ट प्रमाण दिलें आहे तें असें.

"Tis not what man does which exalts him, but what man would do."

"मनुष्याला उच्च पदाप्रत नगारी त्याची कृति नव्हे तर त्याची इच्छा किंवा मन होय." स्वतःवर अवलंबणें व आपण तसें करितों असें लोकांस दिसून येणें; त्याच प्रमाणें दुसऱ्यांनीं ही स्वतःवर अवलंबून राहावें व तसें आप या दृष्टीस यावें ह्मणून जें कांहीं आहे तें हेंच. (ग० चा०)

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य ५ शके १८१७

विलायतेंत यांत्रिक शिक्षणाचा इतका प्रसार झाला असूनही इतर राष्ट्रांशीं जी स्पर्धा लागली आहे तिजमध्यें इंग्लंडचा निभाव लागणार नाहीं असें वाटूं लागलें आहे त्यामुळें तिकडें यांत्रिक शालागृहें नवीन पुष्कळ निघत आहेत. इतर राष्ट्रा बरोबर सामना देण्याविषयीं सामर्थ्य यावें, उद्योगधंद्याची अभिवृद्धि व्हावी आणि इंग्लंडची सरशी नव्या चढाओढीमध्यें कायम राहावी ह्मणून नवीं शालागृहें स्थापून यांत्रिक ज्ञानाचा फैलाव चालविला आहे. साम्पत्तिक वैभव इंग्लंडचें फार मोठें आहे आणि तेथें जर यांत्रिक शिक्षणाची इतकी विलक्षण आवश्यकता मानतात तर आमच्या देशामध्यें किती गोष्टी कमी आहेत हें कळविण्यास देखील लाज वाटते. विद्यादानाकडे इंग्रजसरकार फार दुर्लक्ष्य करितें आणि अशीच इंडियाविषयीं हयगय होईल तर हा देश सांप्रतच्या स्पर्धाचक्राखालीं पक्का चुरडला असें निदर्शनास येईल. बर्मिनघाम मुनसिपालिटीनें उद्योगशाला घातली आणि त्या बरोबर सर्व लोकांनीं आनंद दर्शविला; ह्मणजे जणू कांहीं एक मोठी उणीव दूर झाली व अत्यंत आवश्यक गोष्ट प्राप्त झाली. विलायतेस जर यांत्रिक शिक्षणाविषयीं ही कळकळ दृष्टीस पडते तर इंडियांत त्याच गोष्टीविषयीं इतकी घोर अनास्था असावी याचें इंगित काय?

---

कायदा मोडला ह्मणजे अन्याय होतो असा साधरण नियम आहे. पण जेथें कायदा अन्यायाच्या तत्वावर रचला आहे तेथें तो कायदा फक्त राजनिष्ट साठीं पाळावा लागतो हिंदुस्थान देश राजनिष्टेनें तंतोतंत व ओतप्रोत भरला आहे तेव्हां राज्यकर्त्यांनीं कोणताही कायदा केला तरी तो पाळला जाईल यांत शंका नाहीं. पण अशा कायद्यानें लोकांचीं मनें चलबिचल पावतात, असंतुष्टता वाढते, आणि राज्यें लयास जाण्याचीं कारणें प्रेरित होतात. हल्लीं जकातीच्या कायद्याचा मसूदा कायदे कौंसिला समोर आला आहे. त्यानें सर्व देश हालवून सोडला आहे.

हल्लीच्या बिलांचा इतिहास फार चमत्कारिक आहे. प्रथम खजिन्यांत तूट पडली ह्मणून आयात मालावर जकात बसविली. अर्थातच विलायतच्या कपड्यावर व सुतावर शेंकडा पाच प्रमाणें जकात बसली. या जकातीनें देशी गिरण्यांस फायदा मिळेल व म्यांचेस्टरवाल्यांचा व्यापार बुडेल ह्मणून वीस नंबरा वरील सुतावर व त्याच्या देशी कपड्यावर सारखाच शेंकडा पांच प्रमाणें कर बसविण्यांत आला. म्यांचेस्टरवाल्यांनीं ओरआरडून स्टेट सेक्रेटरीला आपलासा केला आणि हिंदुस्थानच्या सर्व हलक्या व उंच प्रतीच्या गिरणींतील कापडावर कर बसविण्या विषयीं बिल कायदे कौंसिलांत आणविलें. सुतावरील जकात माफ करण्याची सूचना आली आहे, आणि हलक्या प्रतीच्या कापडावर कर बसल्यानें गरिब रयतेवर नवा बोजा बसला ह्मणून आयात व देशी कपड्यावर शेंकडा पांच कर होता तो कमी करून शेंकडा ३॥ होणार आहे. या बिलामुळें ५० लाख रुपयांचें नुकसान होत आहे तरी इंडिया सरकारास त्याची पर्वा नाहीं

विलायतच्या गिरणीवाल्यांचा व्यापार आपोआपच कमी कमी होत चालला आहे. बुडत्याला हात देण्याच्या इराद्यानें नवीन बिलें आलीं आहेत. देशी कपडा उंची नंबराच्या सुताचा नसल्यामुळें खरोखर विलायती व देशी मालामध्यें चढा ओढ नाहीं. असें असून ही देशी गिरण्यांतील सुतावर व कपड्यावर अन्यायानें कर बसविण्यांत आला. इतक्यानें तृप्ती झाली नाहीं ह्मणून देशी व्यापार अखेरीस बुडेल अशा तत्वावर निराळें बिल आणिलें आहे. सर्व प्रकारच्या देशी कपड्यावर जकात बसल्यानें गरीब लोकांच्या वापरण्यांतील हलका कपडा या नव्या करामुळें महाग होईल व गरीब लोकांवर अन्यायानें निराळा अप्रत्यक्ष कर बसला जात आहे ह्मणून न्यायाचें तराजूं तंतोतंत करण्यासाठीं श्रीमंत लोकांस ज्या उंची विलायती कपड्या बद्दल शेंकडा पांच प्रमाणें कर द्यावा लागत असे तो या पुढें शेंकडा ३॥ या पुढें द्यावा लागणार आहे. या सर्व कृतीचा भावार्थ असा कीं गरीबश्रीमंताला सारखेंच लुटावयाचें पण गरीब नव्यानें लुटले जात आहेत ह्मणून कृपादृ दृष्टीनें श्रीमंतावरील लूट थोडी कमी करण्याची योजना केली आहे. या सर्व लुटालुटीनें इंग्लिश गिरणीवाल्यांचा फायदा आपोआप करून दिला जात आहे लोकांच्या ओरडण्याला सरकार जुमानणार नाहीं व हे कायदे अंमलांत येतील तर लोकांनीं आपआपला मार्ग सुधारला पाहिजे विलायती कापड वापरणार नाहीं असा प्रत्येक इंडियनानें निर्धार केला पाहिजे आणि विलायतच्या कापडवाल्यांची खोड मोडली पाहिजे. ही गोष्ट आमच्या लोकांच्या हातून होणार नाहीं तर आह्मी आपल्या देशांत जीवंत असून नसून सारखेच.

---

युरोप खंडांतील स्काल्डेमेरिल्यांड नामक अरण्यमय प्रदेशांत इसवी सनाच्या ३ र्‍या शतकाच्या सुमारास झील्यांडर्स अथवा फ्रीजियन्स लोक राहत असत. त्या वेळीं मूर्तिपूजक असून अर्धवट रानटी स्थितींत होते. पण निसर्गतःच ह्यांच्या अंगीं स्वातंत्र्यप्रीयता पूर्णपणें बाणली गेली होती. स्वातंत्र्तेच्या अनुषंगानें स्वावलंबन व अप्रतिहत उत्साह हे गुण ह्या फ्रीजियन लोकांच्या रक्तारसांत खेळत होते. पुढें काळाच्या अतर्क्य प्रभावानें ह्या लोकांस फ्रयांक सत्तेखालीं नांदण्याचा प्रसंग आला. एखाद्या जातिवंत तेजस्वी घोड्याला जंगलांतून धरून आणल्यावर त्यावर स्वारी करिते वेळीं जी त्याची दांडगाई चालते अशीच दांडगाई ह्या लोकांनीं प्रारंभीं केली. परकीय फ्रयांक लोकांचा हुकूम आपण कां मानावा हें त्यांस समजेना; ख्रिस्ती धर्म फ्रिजियनांस समजत नव्हता व त्यावर त्यांची श्रद्धाही नव्हती. तो ख्रिस्तीधर्म तरवारीच्या जोरावर फ्रयांक लोकांनीं लादला; अशा ख्रिस्ती धर्मप्रीत्यर्थ ख्रिस्ती उपदेशकांना आपण काय ह्मणून कर द्यावा हें त्यांच्या लक्षांत येईना येशूच्या पवित्र कळपांत त्यांना ओढण्याकरितां पुष्कळ उपदेशकांनीं आपापल्या मगदूरा प्रमाणें उपदेश केले, परंतु प्रत्येक फ्रीजियनाला ख्रिस्ती धर्माचा दीक्षा देण्याकरितां दुसऱ्या एका फ्रिजियनाचा जीव ह्या ख्रिस्ती भटांस घ्यावा लागला.

अशा रीतीनें ह्या फ्रीजियन लोकांचे स्वातंत्र्य नष्टझालें. पण त्यांच्या प्रदेशांत "फ्यूडल सिस्टिम" कधींच प्रचारांत आली नाहीं. त्यांना वाटे कीं फ्रयांक प्रतिनिधींना जर आपल्यावर राज्यच करावयाचें आहे तर त्यांनीं राज्यकारभार आमच्या कायदेकानू प्रमाणेंच केला पाहिजे. त्यांनीं फ्रयांक लोकांच्या सत्ते विरुद्ध वारंवार बंडें केलीं आणि आपल्या नांवाचे धनी जे फ्ल्यांडर्स येथील 'काउंट' यांच्या कोपास, नंतर जर्मनचे बादशाहांच्या कोपास आणि तेराव्या शतकांत "धर्म सभेच्या [ Inquisition ] असह्य कोपास त्यांनीं आपणास पात्र करून घेतलें. ह्या प्रमाणें त्यांचे एक सारखे हाल होत आले, त्यांची स्वतंत्रता नष्ट झाली, परंतु त्यांच्या अंगीं असलेल्या अप्रतिहत उत्साहाचें निर्मूलन कोणाच्यानेंही झालें नाहीं. ईश्वरानें ज्या स्वतंत्र स्थितींत आपल्याला निर्माण केलें त्या स्वतंत्र स्थितींत राहण्याचा अखेर त्यांनीं निश्चय केला आणि प्राणाची पर्वा न करितां एखादा जोराचा प्रयत्न केला. या जोरदार प्रयत्नाचें फळ डच रिपब्लिक रूपानें आज आपल्या दृष्टीस पडत आहे. हे विचार आपल्या देशास कितपत लागूं पडतील बरें?

---

The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 3, 1896

√ The Cotton Duties and Tariff bills are on the anvil of the Imperial legislative council. The whole nation is unanimous in its protest against this piece of legislation. The bills are monument of injustice to India and blind partiality to England. In them a casual observer will perceive a black spot in the British rule. If they ever become a law of the land they will constitute a standing disgrace to the good name and prestige of the British government.

In the plausible terms of fairness, justice and free-trade the Govt. of India is committing itself to a suicidal policy. Sir James Westland attempts in these bills at levelling all ups and downs in the cotton-industries of England and India. The present proposals afford an equal footing to England by divesting India of all adventitious and extraneous advantages. An equalizing and levelling procedure is adopted in pursuance of the principle of Free-trade. Financial difficulties drove at first the Government to a revival of the import duties. It is cotton-industry alone that became the favorite of Free-trade. To countervail the protection to Indian industries an excise duty was imposed. The matter did not end here. The excise—duty was found unworkable and the exchequer could well afford to a loss of some 50 lakhs of revenue. Firstly the line of taxation of Indian goods of 20s. and of upper counts presented difficulties of an enormous nature. Secondly, the exemption of coarse cloth led people to reject fine woven goods and to divert the consumption from the finer to the coarser. Thirdly if Lancashire begin to export coarser goods Indian goods of the same sort will be under a protection by the import-duty on English goods. Fourthly the tax levied upon yarns is *pro tanto* a lighter tax than is levied upon the manufactured article. For these reasons, the bills are framed to secure a perfect equality to both the parties by assimilating the methods as well as equalizing the results. In short yarns are exempted from all duty. The excise duties on cotton manufactures on India are extended to goods of 20s. and under and are equivalent to those levied *ad-valorem* upon imported cotton goods. The extension of excise-duties to goods of lower counts involves an additional tax upon the poorer class in India and in order to counterbalance this addition a reduction is effected in the levy of duty from 5 per cent to 3·5 per cent. This reduction led to similar a reduction of import-duty on English goods. This is in short the substance of the new proposals.

The public meeting held at Bombay has summarized in its protest the defects in the present bills. The resolution runs as follows:—

"That this meeting protest against the proposal to rearrange the cotton duties in such a manner that the poorer classes hitherto exempt will have to pay 3 and a half per cent. duty on the coarse cloth manufactured in India, which form their wearing apparel, while the rich who use the

finer goods manufactured in Lancashire are relieved by a reduction of 1 and a half per cent. of the duty hitherto paid by them without hardship or complaint. That this meeting further protests against the wholly groundless assumption that the finances of India are in condition to admit of the remission of half a crore of rupees—one-third of the amount of the cotton duties—in presence of the notorious fact that the Famine Insurance Fund is suspended, necessary public works are stopped throughout the Empire, while every Provincial Government in India is embarrased, and the administration impaired by the necessity of meeting the ever recurring demands of the Government of India."

But we read a lesson of self-help in the eloquent words of Mr. Wasumji Khimji when he calls upon his countrymen to stop using Lancashire and English-made cloth. A time is now come when we should present such a bold front if the Government turns a deaf ear to our entreaties.

An interesting report on the Post Office in India for 1894—95 is published in the last of the Gazette of India. The following are the principal events under "Inland Post":—

(1) The amalgamation of the postal system in the Native States of Kashmir, Pudakotta, Burma, and Nandgaon with the Imperial Post Office.

(2) The extension to the whole of the North-western Provinces and Oudh Circle of the system, successfully tried in Oudh, of serving civil processes and write of demand through the registered letter post.

(3) The introduction of a scheme for giving simple instructions to students in primary schools in the Punjab Circle on postal matters, with the object of popularising postal information. If successful, the scheme will eventually be extended to other provinces.

(4) The acceleration of the mail service between Calcutta and Simla and between Bombay and Lahore, and the establishment of a through service between Lucknow and Simla.

(5) The introduction, experimentally, of a system of local audit, by the Postmasters of certain head offices, of the accounts of money order transactions within their respective jurisdictions as a preliminary to their final acceptance by the Comptroller, Post office. It is proposed to extend the scheme eventually to other head offices with the object of checking of further increase of an already overgrown establishment in the Comptroller's office.

(6) The conclusion of a new contract, for a period of ten years, with effect from the 1st May 1894, with the British India Steam Navigation Company for certain mail services in Indian waters.

Rao Saheb Patwardhan hits the right nail when he explains why indigenous schools do not thrive well in the province. His remarks run as follow:—

"The rules for giving grants to indigenous schools in Berar are very liberal compared with those obtaining in the Bombay Presidency, and no further change in them appears to be called for. The majority of our indigenous schools are in villages where there are no Local Board Schools, and I do not see how the jealousy of Local Board schoolmasters can thwart the growth of indigenous schools in villages. The success or otherwise of these schools ought to depend on the way in which they are conducted. Most of the inspecting officers complain that indigenous schools are unsteady in their character; that the instruction imparted in them is of inferior kind: that their statistics are not quite reliable; and that several indigenous masters open and close their schools at pleasure. If they will conduct their schools regularly and systematically and properly bring up boys in the "Three Rs," they will, I feel sure, enlist the sympathies of the people, become of a more permanent character, and supply a real want. A few good schools are likely to do more good than a number of bad scools, and it should be the earnest endeavour of every one interested in the cause of education to try his best to improve these schools by inducing the masters to give up bad practices and follow departmental rules."

## वऱ्हाड

मि० मिडो असि० कमिशनर, उमरावती यांस वऱ्हाड प्रांतीं जस्टिस आफ दी पीस नेमण्यांत आलें.

मि० ए० एलियट यांस सिव्हिल आणि सेशन जज्ज नेमल्या कारणानें गेल्या आक्टोबर १४ व्या तारखे पासून खालील गृहस्थांस बढत्या देण्यांत आल्या:—

| नांव | बढती |
| --- | --- |
| मेजर हेस्टींग | डेपुटी कमि. वर्ग २ |
| महमद यासिनखान (बाह्य प्रांतीं) | ,, वर्ग ३ |
| एदलजी बहिमनजी दस्तुर | ,, |
| मौलवी निझामुद्दीन हसनखान (बाह्य प्रांतीं) | स्पेशल असि. कमि. |
| पंडित सुग्ज नारायण | ,, |
| आर. ए सिम्पसन | अ. क. वर्ग १ |
| लेफ. मारिस | असि असि. वर्ग २ |

हैदराबाद रेसिडेन्सी बझार व शिकंदराबार छावणी तेथील कोडतांचे वरील १० अपिलें अलिशान रेसिडेंट यांच्या कोडतांत होतीं तीं वऱ्हाडच्या जुडिशिअल कमिशनर कडे निकाला साठीं रवाना करण्यांत आलीं.

खालील मास्तर लोकांच्या नेमणुका झाल्याचें वैदर्भावरून कळतें:—

| रा० रा० | बदलीचे गांव. |
| --- | --- |
| गोविंदराव बुजरुक | मलकापूर, फ० अ० |
| एकबोटे बी. ए. | देऊळगांवराजा हे. मा. |
| गोपाळराव प्रभुणें | वाशिम, फ० असि० |
| जोगदंडे बी. ए. | शेगांव. हेड मा० |

नोटीस.

तीर्थस्वरूप रा० रा० रामभट बिन राघव भट जोशी राहणार कुंभारगांव तालुके दर्यापूर—यांस

खाली सही करणार इचा शिरसाष्टांग नमस्कार विज्ञापना. मी आपली स्नुषा असून मोठ्या कष्टानें ही नोटीस देणें मला भाग पडलें आहे. मी विधवा झाल्या दिवसा पासून मला सासरचें घर ह्मणून कांहीं ठाऊक नाहीं. आज ६।७ वर्षे झालीं मी आपल्या तीर्थरूपाच्या वरीं आयुष्याचे दिवस काढीत आहे. माझ्या अन्नवस्त्राची सोय आपण करीत नाहीं व तिर्थरूपाच्या हातुन गरीबीमुळें माझ्या पोटा पाण्याची सोय होऊं शकत नाहीं. सासरीं राहण्यास जावें तर सर्वजण अपशब्द बोलून व खायाला नीट न घालून घरांतून मला हाकलून दि जातें. अशा दुःखांत मी आहे. माझी गती कुंठीत आहे. आपल्या कुटुम्बांतील मी एक माणूस आहे. माझ्या पोटापाण्याची सोय करण्याचा बोजा शास्त्र प्रमाणें आपल्यावर आहे. तर विज्ञापना कीं गेल्या ६।७ वर्षाच्या पोटगीबद्दल माझ्या बापावर पडलेला कर्जाचा बोजा आपण भागवावा. मला सासरी घेऊन जावें आणि मला वागवून घेण्याची भिक्षा घालावी असें न होईल तर मला सरकारांत फिर्याद करून अन्नवस्त्राबद्दल कांहीं नमणूक ठरवून घेणें जरूर पडेल. कळावें तारीख १ फेब्रुवारी १८९६ इ.

[ सही ] तुळशी जवजे अंबादास जोशी
दस्तुर गोपाळ भट बिन गोविंदभट
जोशी राहणार मुंडगांव ता०
आकोट

नोटीस

रा. रा. गणेश परशराम सनावडी ब्राह्मण राहणार बाळापूर यास:—

खालीं सही करणार याचेकडून नोटीशीनें कळविण्यांत येतें कीं, तुह्मी आपली लबाडी व खोटेपणा छपविण्यासाठीं व जानजा वल्द नारायण महाली हा मरणोन्मुख झालेला पाहून त्याच्याकडून लिहून घेतलेले पोकळ खरेदीखत परत मयत जानजीचेच नांवानें करून देते वेळीं, खोट्या बहाण्यानें माझ्याकडून २४॥ अक्षरी साडे चोवीस रुपयांचा दस्तऐवज करून घेतला. हा दस्तऐवज काय आहे व कशाबद्दल आहे हें चार चौवांसमक्ष पक्कें ठरून नंतर लिहिलेला आहे या दस्ताऐवजा वरून फिर्याद वगैरे कराल तर त्याबदल तुह्मास मी कांहींएक देवाल नाहीं; इतकेंच नाहींतर, हा दस्तवैज नोटीस पोचल्या ता खेपासून आठ दिवसाचे आंत फाडून परत आणून न वाल तर, मला फसवून ठकबाजी केल्या बद्दल फौजदारींत फिर्याद केली जाईल. कळावें. तारीख ३१ माहे जानेवारी सन १८९६ इ.

(सही)
सहीची निशाणी वस्तरा नारू वल्लद
दारकू महाली राहणार पातुर्डे
तालुके जळगांव.

## नोटीस

रा० रा० भजनलाल शिवचंद या नांवचें दुकान मालक शिवचंद खेतशीदास यांस नोटीस देणार गुरुमुखराय सुखानंद तर्फे मुखत्यार उमेदिराम जेठमल. तुमचा आमचा सवदा दर पोत्यांत दोन मण मेथी अशा भरतीची पोतीं १० तुह्मांस आह्मीं द्यावीं असा तुमचा आमचा करार झाला व दर मणास ४ रु० प्रमाणें भाव टरला. सदरील करारा प्रमाणें पोतीं तुह्मांस मोजून दिलीं. ठरावा प्रमाणें याचे रुपयें ८० तुह्मी आह्मांस देण्याचें. परंतु आजपर्यंत दिले नाहींत. तुमचे दुकानांतून आह्मी तांदूळ १ मण २ पायली किंमत रु० ८॥ चे घेतले आहेत. ते वजा जाता बाकीचे रुपये नोटीस पावल्या पासून व्याजा सुद्धां एक दिवसांचे आंत आपचे आह्मास आणून देऊन पावती घ्यावी असें झालें नाहीं तर फिर्याद करून या नोटिसीचे व फिर्यादीचे सर्व खर्चासुध्दां सगळा खर्च भरून घेतला जाईल. कळावें. तारीख २ माहे फेब्रुवारी सन १८९६ इ०

सही
उमेदीराम जेठमल दस्तुर
गजानंद

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यास कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सराटिफिकिट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहिरात

सन १८८९ चा अक्ट ७ प्रमाणें
दि. कि. मु० नंबर १६ वर्ग १५
१८९५

डे० कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

नांव— प्रल्हाद भट
बापाचें नांव—श्रीधर भट
राहणार—बाभळी तालुके दर्यापूर जिल्हा एलिचपूर यांस मयत

श्रीधर भट बापाचें नांव जैकृष्ण भट राहणार बाभळी ता. दर्यापूर जि. एलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटिफिकीट मिळावें ह्मणून सदहू अर्जदार यानें अर्ज केला आहे. त्याज करितां सदहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्यांचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं तारीख २४ माहे फेब्रवारी सन १८९६ इसवी रोजीं सदहू अर्जाची चौकशी होईल त्या वेळीं या कोर्टांत हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी. तारीख २० माहे जानेवारि सन १८९६ इ०

H. Godwin Austen
Deputy Commissioner
Ellichpur

वऱ्हाड समाचार पत्राचा तारिख ६ ज्यानेवारी सन १८९६ चा अंक नंबर १ यांत नमुना नंबर १४२ प्रमाणें दिपुटी कमिशनर साहेब बाहादूर जिल्हा येलिचपुर कोर्टातील अर्जाचा नंबर ७ क्लास नंबर १३ ची जी जाहिरात प्रसिद्ध केलेली आहे त्यांतील अज्ञान सदाशिव वल्लद इण्णाजी याचे राहण्याचें गांव जें हिरूर ह्मणून दोन ठिकाणीं लिहिलेलें आहे तें हिरूर नसून मौजे हिवरें तालुके एलिचपूर असें आहे करितां सदरहू गांव हिवरें असें लोकांनीं वाचावें.

## वर्तमानसार.

खरोखर वाईट स्थिति! हिंदुस्थानच्या एवढ्या मोठ्या लोकसंख्येचें तेथील सरकारावर कोणत्याही प्रकारचें वर्चस्व नाहीं. तिकडे स्वतंत्र असे इंग्रज लोकही फारसे नाहींत तेथील सरकारावर जो दाब आहे तो सगळा मिलिटरी आणि सिव्हिल सर्व्हेटांचा, विशेषतः दुसऱ्यांचा; ते कर भरणारे नसतात. तो भरावयाचा लोकांनीं, आणि त्यांनीं आयतें बसून तो फस्त करावयाचा, आणि त्याच्यावर हव्या तशा मौजा मारावयाच्या; शहाण्या आणि न्यायी हिंदुस्थान सरकारानें प्रजेविषयीं आपल्या कर्तव्यास जागृत राहण्याचे कामीं ही सध्यांची राज्यपद्धति जबरदस्त विघ्न आणीत आहे.

अप्रतिबंध व्यापार—अप्रतिबंध व्यापाराची पद्धति उत्तम हें तत्व मला मान्य आहे. पण इंग्लंड व हिंदुस्थान या दोन देशांमध्यें अशा प्रकारचा व्यापार सुरू ठेवणें ह्मणजे क्षुधापीडित, दुर्बल व निःसत्व अशा पायीं चालणाऱ्या मनुष्यांस चांगल्या धष्टपुष्ट, सशक्त आणि घोड्यांवर बसलेल्या पुरुषाबरोबर धांवण्यास लावण्या सारखे हास्यास्पद आ आहे. स्वतःच्या द्रव्यसामुग्रीवर स्वतः लोकांना ताबा ज्या देशांत आहे अशा देशानें इंग्लंडसारख्या उद्योगबलिष्ट देशांशीं टक्कर दिली असतां शोभेल. पण नेहमीं हिंदुस्थानांत काय पाहतां ! नफानुकसानीचा प्रसंग आला ह्मणजे हिंदुस्थान आपला हटकून बळी पडावयाचा ........ आमच्या देशांतल्या संपत्तीचा प्रचंड ओघ जो आज कित्येक वर्षे पश्चिमेकडे वाहत आहे, त्याला बंधारा घालून तो माघारा परतवा, आणि त्यांस इंग्लंडा सारख्या स्वातंत्र्याच्या सवलती द्या ह्मणजे मग हिंदुस्थानही इंग्लंडाशीं अप्रतिबंध व्यापारांत टक्कर देण्यास तयार राहील. सध्या इंग्लंडाचे मानानें आमच्या लोकांच्या उत्पन्नाचें प्रमाण सगळें १/१५ आहे. तिकडच्यापेक्षां इकडे कर दुप्पट आहेत. शिवाय शेकडों अन्य मार्गांनीं संपत्तीचा पूर इकडून तिकडे जात आहे. इतकें सगळें असून अप्रतिबंध व्यापार पाहिजे ह्मणून हिंदुस्थानास दरडावणें! इंग्रजी मुत्सद्यांनीं या सर्व गोष्टींचा विचार शांतपणें कधीं केला आहे काय?

हिंदुस्थानच्या कर्जाबद्दल जबाबदार कोण?—जो कोणी प्रमाणिकपणानें हिंदुस्थानचा इतिहास शोधून पाहील त्यास असें दिसेल कीं, हिंदुस्थानच्या कर्जाची सगळी जबाबदारी वस्तुतः इंग्लंडावर आहे. आणखी तें कर्ज फेडण्यास नाकबूल होणें ह्मणजे राज्यांत भेद करण्यासारखें आहे. वीस वर्षांपूर्वींच ही गोष्ट टाईम्स पत्रानें कबूल करून असें ह्मटलें होतें कीं हिंदुस्थानच्या बाबतींत जें कर्ज काढिलें आहे. तें एकंदर ब्रिटिश राज्याच्या नांवानें काढिलें नसलें तरी तें त्या राज्याच्या अधिकारानें काढलें असल्यामुळें त्यास कांहीं धक्का पोंहोचत नाहीं. जोंपर्यंत आमचें राष्ट्रत्व कायम ठेवण्याची धमक आमच्या अंगांत आहे, तोंपर्यंत तें कर्ज देणारांनीं बिनघोक राहण्यास कांहीं हरकत नाहीं.

ब्रिटिश राजसत्तेचा खरा पाया.—आमच्या खरा पाया आमच्या शूर शिपायांनीं लढलेल्या लढाया नव्हेत, तर हिंदुस्थानच्या रहिवाशांचा इंग्रजसरकारच्या वचनांवरचा विश्वास हा होय.

कापडावरील जकातींत फेरफार— तुह्मी आरडा ओरडा, पाहिजे तें करा; आह्मांस जें करावयाचें तें आह्मी करणारच हें हिंदुस्थानच्या राज्यपद्धतीचें मुख्य लक्षण झालें आहे व त्याप्रमाणें मुंबइच्या व हिंदुस्थानांतल्या इतर ठिकाणच्या लोकांनीं कापडावरील जकातीच्या बाबतींत जरा हवी तितकी ओरड केली, हवे तितके मोठाले अर्ज पाठविले व आमचें ह्मणणें ऐकून तरी त्या अशा प्रकारच्या जरी हव्या तितक्या ताराही पाठविल्या, तरी त्या जकातीच्या बाबतींत हिंदुस्थान सरकारानें कायद्याचा एक मसुदा तयार करून तो गेल्या गुरुवारीं कायदे कौंसलापुढें आणलाच. आणि होप साहेबाच्या ह्मणण्या प्रमाणें हिंदुस्थानच्या गिरण्याच्या व्यापाराच्या कमरेत एक सडकून लाथ मारण्याचें ठरवूनही टाकलें. ह्मणजे हिंदुस्थानांत तयार होणाऱ्या २० नंबराच्या आंतील जाड्या रफ कापडावर आजपर्यंत जी जकात नव्हती ती यापुढें बसविण्याचें ठरविलें आहे. याचा अर्थ त्यांणीं त्या बिलांत जरी कसाही सांगितला असला तरी त्याचा खरा अर्थ हिंदुस्थानच्या गिरण्यांनीं आपल्या कारखान्यांस कुलपें लावून सर्व प्रकारचें मांचेस्टरवाल्यांचें कापड विकण्यास तयार व्हावें असाच आहे; आणि हाच अर्थ परिणामीं कायमही होईल. सरकारच्या या करण्यानें हिंदुस्थान सरकारची पन्नास लाख रुपयाची जमाबंदी कमी होणार आहे हें जरी खरें आहे, तरी त्याबद्दल इंग्रजांस थोडीच पर्वा आहे. हिंदुस्थानच्या खजिन्याची स्थिती काय आहे व कर भरणारे हिंदुस्थानचे लोक किती विपन्न स्थितीस पोचले आहेत याजकडे लक्ष्य देण्याचें मांचेस्टर सरकारच्या मनांतही येत नसून आपला माल हिंदुस्थानांत जास्त कशानें खपेल याकडे मात्र त्यांचें लक्ष्य आहे व त्याप्रमाणें ते आपले गुमास्ते जे स्टेट सेक्रेटरी त्यांस हुकूम करून अंमल करीत आहेत. आतां हिंदुस्थानच्या लोकांनीं ओरड करणें ह्मणजे अरण्यरुदन करून घसा फोडून घेणें मात्र आहे.

गव्हरनर जनरलांच्या कायदे कौन्सलापुढें विशेष महत्वाचीं अशीं हल्लीं तीन बिलें आहेतः— ( १ ) दिवाणी काम चालविण्याच्या कायद्यांत दुरुस्त करण्याचें; (२) हिंदुस्थानचा रजिस्ट्रचा कायदा व पुराव्याचा कायदा यात दुरुस्ती करणारें आणि (३) जकातीच्या कायद्यांत दुरुस्ती पैकीं पहिलें मि० मोहिनी मोहन राय या नावाच्या नेटिव गृहस्थानें पुढें आणलेलें असून तें पुढें आणण्याच्या कारणाचें जें त्यांनी व्याख्यान दिलें त्यावरून त्यांत बरेच महत्वाचे फेरफार करण्याचें योजलें आहे असें दिसतें. अ. द.

ट्राम रेल्वेः— इराणांत हरफेरी नांवाच्या एका जर्मन इसमास ७५ वर्षांचे मुदतीनें एक रेल्वे गाडी तेहरान पासून बगदाद पर्यंत करण्यास परवानगी मिळाली व ९० वर्षे पर्यंत स्टीम, किंवा विजेची ट्राम गाडी तेहरान पासून उत्तरेकडे १० मैल पर्यंत सुरू करण्याची परवानगी ही त्यासच मिळाली आहे.

योग्य न्यायः— विकोडी तालुक्यांतील चंद्रा नांवाचे एका बाईनें नवऱ्याचे संमतिशिवाय पाट करून घेतल्याबद्दलचा खटला येथील सेशनांत चालला होता, त्याचा निकाल गेल्या आठवड्यांत होऊन सदर चंद्रा इजला ३ महिनें सक्त मजुरीची कैद व तिचे साथीदार भिम्या बिन लक्षमण व बाळू बिन सुभाना या प्रत्येकास १।३ महिनें सक्त मजुरीची कैद आणि तीन तीनशें रुपये दंड, दंड न दिल्यास आणखी १।१ महिना कैद याप्रमाणें शिक्षा झाली. दंडाची रक्कम वसूल झाल्यास दंडा पैकीं ३०० रुपये फिर्यादीस द्यावे असा ठराव झाला. हा ठराव पाहून कोणाही विचारी मनुष्यास संतोष झाल्याशिवाय राहणार नाहीं. पूर्वीं अशा प्रकारच्या बायांना याहीपेक्षां कडक शिक्षा होत असत. त्यामुळें त्या आपले नवऱ्याचें घर सोडून कधींही कोठें जात नसत परंतु हल्लीं राणी सरकारचे राज्यांत स्त्रियास बरीच स्वतंत्रता मिळाल्यामुळें त्या कोणास न जुमानतां व नवऱ्याची पर्वा न बाळगतां मनसोक्त वागूं लागल्या, यामुळें कित्येक अब्रूदार लोकांची धुळधाण होत असून, छाकट्या लोकांची चैन उडत आहे. रत्नागिरी व ठाणें हे जिल्हे खेरीज करून इतर कोणतेही जिल्ह्यांतील वर्तमानपत्र पहा त्यांत नवराबायकोची सोडचिटीची नोटीस नाहीं असें एकही पत्र मिळणार नाहीं. शिवाय अलीकडे १०।१५ वर्षांपासून जिकडे तिकडे खुनाचें जें खूळ माजलें आहे तें बहुतेक खून अशा गुणी बायांचेंच पायीं झालेले दृष्टीस पडतात. याचा अनुभव सर्वत्रांस आहे. तरी वरील ठरावाचा कित्ता सर्व न्यायाधीश जर वळवितील तर अशा मनसोक्त वागणाऱ्या बायांची व त्यांच्या साथीदारांची सहजच खोड जिरून अशा अगोचर कृत्यास ते प्रवृत्त होणार नाहींत.

दी. बं.

लढाईची जर वेळ आली तर कानड्यांतून एक लाख लढाऊ लोक निघतील.

विलायतेस दोन मुलास त्यांच्या मातेसह उंदरांनीं मारून टाकल्याचें समजतें! दुसरी अशी एक बातमी आहे कीं, व बर्गिमह्याम येथील एकंदर घरें व दुकानें उंदरांनीं पोखरून टाकिलीं आहेत.

नवसरी येथें दुधिया तलावाचे नजीक देवीचे मंदिराजवळ रहाण्याऱ्या एका ब्राह्मणाचे स्त्रीस २ जुळीं झाळीं. त्यांचे कंठास प्रसूतकाळीं सर्पाचा वेढा होता, व तो सर्प जिवंत होता. हल्लीं बाळ बाळंतीण खुशाल असल्याचें समजतें.

मद्रासेंतील हिंदु बॅरिस्टर मि० रामचंद्र नायडू यांचा पृथ्वीप्रदाक्षिणेस निघण्याचा विचार असून त्या करितां सरकारचा पास मागण्या करितां ते तेथील सेक्रेटरीएट ऑफिसांत गेले होते. तेथें त्यांस मार देऊन बाहेर घालविलें व आंत शिरल्या बद्दल खटला करण्यांत आला.

बेगमजान व वजीरजान या नांवाच्या दोघी नृत्य गायनपटु नायकिणी हिंदूस्थानांतून नुकत्याच विलायतेस गेल्या असून तेथें आपल्या आंगच्या गुणांनीं लोकांस खुष करून वाहवा मिळवित आहेत. त्यांच्या बरोबर तंतुवाद्यांत व पखवाजांत प्रवीण असे त्यांचे साजिंदेही आहेत. हिंदुस्थानच्या नायकणी विलायतेस गेल्याचें हें पहिलेंच उदाहरण आहे. न्या० सु०

राणीसरकारचे जामात प्रिन्स हेन्री ऑफ बटेनबर्ग यांस ता. २२ रोजीं देवाज्ञा झाली. हे हेसी व ऱ्हाईन ह्या प्रांताचे राजपुत्र अलेक्झांडर यांचे चिरंजीव असून ह्यांचा जन्म सन १८५८ सालीं झाला होता. ह्यांचा विवाह राणी सरकारची कन्या बिआट्रिस हिच्याशीं सन १८८५ सालीं झाला होता. व त्या वेळीं त्यांस "हिज रॉयल हायनेस" असा किताब देण्यांत आला होता. हे हल्लीं आईल ऑफ वाइटचे गव्हरनर होते. ह्यांना दोन मुलगे व एक मुलगी अशीं तीन मुलें आहेत. ह्यांच्या अकालीं मृत्यूनें प्रिन्सेस बिआट्रिस यांजवर फार घोर प्रसंगच गुदरला.

चीन देशांत स्त्रियांचे फोटो घेण्याची सक्त मनाई आहे.

मद्रास युनिव्हर्सिटीच्या बि ए. च्या परीक्षेत १५०० उमेदवार पास झाले.

गेल्या आठवड्यांत सिमला, श्रीनगर व लाहोर येथें धरणीकंपाचे धक्के बसले.

जपानचे बादशहा लवकरच इंग्लंडास जाणार असल्याचें समजतें.

साधारण रीत्या एक गाय दरसाल साडे तीनशें ग्यालन दूध देते असें अनुमान निघालें आहे.

काफिरीस्थानांत आमिराच्या फौजेस जय मिळून तिनें १५ किल्ले हस्तंगत केल्याचें समजतें.

रेल्वे रस्त्यांवर जबरीच्या केसीस दिवसें दिवस अधिक घडून येतात ह्या बद्दल बंदोबस्ताचे कामीं पंजाब सरकारचें मत विचारण्यांत आलें आहे. स० वि०

तरतें नाटकगृह— डिव्हिन सारा नामक विलायती नाटकी बाईनें एका जाहाजावर नाटकगृह तयार केलें असून त्यांत खेळ करीत करीत ती लौकरच हिंदुस्थानांत येणार आहे.

सोलापूर येथील लछमय्या नांवाच्या एका व्यापाऱ्यांनीं आपल्या मुलाच्या लग्नाबरोबर गरिबांचीं धर्मार्थ ३० लग्नें केली.

पोटांत सर्प— मंडाले ( ब्रह्मदेश ) येथील तुरुंगांतील एक कैदी थोड्या दिवसांपूर्वीं पोटांतील कांहीं इजेनें मरण पावला. त्याचें प्रेत फोडून पाहिलें, तों आंत २ जिवंत सर्प निघाले हे सर्प पोटांत गेले कसे..

रंगून येथें गेल्या सोमवारीं एका ब्रह्मी नोकरानें तीन युरोपियन हापिसरांस खंजिरानें भोंसकलें.

सिंध प्रांतांत वाटमाऱ्या लोकांचा बंडावा फार झाल्यामुळें बलुची पलटणीचे वगैरे ६०० लढाऊ लोक हल्लीं सरकारानें तिकडे नेले आहेत व चोरट्यांस पकडण्याचा कारखाना आतां सुरू व्हावयाचा आहे.

तह— रशिया आणि टर्की यांची गोडी होऊन एकमेकाच्या उपयोगीं पडण्या बद्दल तह झाल्याची बातमी आहे. स० शां०

---

☞ हे पत्र अकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर „ ७ „ १ ०८
किरकोळ अंकास .... .... .... ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।०६
दुसरे खेपेस .... .... ०१

Six monthly ... ... ... 3 „ 8 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ...

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXX AKOLA MONDAY 10 FEBRUARV 1896 NO 6

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख १० माहे फेब्रुवारी सन १८९६ इ० अंक ६

## घड्याळ.

किंमत रुपये ६ हमी ३ वर्षांची

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि भक्कम ह्या फोटोप्रमाणें वॉच घ्या. ६०० वर खपलीं. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.




आह्मी स्विटझरलंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम is circu ty to आहेत. यावर आमचें नांव आहे. हें घड्याळ रेलवे रेग्युलेटरचें असून याचे कांटे रासकोप प्रमाणें असून सेकंडकाटा आहे मागील बाजूस झांकण असून आंत कांच आहे. चावी देण्यास मोगरा आहे. डायल ( लेटी ) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत. आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांस ६ जीवेल ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविले आहत. ) ज्या घड्याळास रुबी जुवेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यांत व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरीं घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्याची जो उमेद बाळगील त्यास १०।११ वर्षांत दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल. व्ही. पी. नेही घड्याळ पाठवूं.

टीप:— " गिऱ्हाइकांत घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल. "

गोविंद महादेव पोळ.
९२-२४ वॉचमेकर आणि रिपेरर नासिक.

## जाहिरात

वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजाचा यंदाचा समारंभ अकोलें येथें तारीख २८ व २९ फेब्रुवारी सन १८९६ [ शुक्रवार व शनिवार ] रोजीं होणार आहे. समाजाचे वेळीं मेंबरांनीं अगत्य येण्याची कृपा करावी. समाजा पैकीं कांहीं मेंबरांचीं नांवें आह्मांस ठाऊक नसल्यामुळें त्यांस आमचे कडून निमंत्रण चिठ्या गेल्या नाहींत तरी त्यांणीं हेंच निमंत्रण समजून वर्गणी होतां होईल तितकी लवकर पाठवावी. वर्गणीचे दर नेहमी प्रमाणें १ रु० २ रु० व रु० ५ आहेत कळावें.

अकोलें ता० ९।१।९६ { दत्तात्रय कृष्ण कोल्हटकर व लक्षण गोविंद ओक सेक्रेटरी.

## नमुना नंबर १४२

दिवाणी कोर्टास सूचना

अज्ञानाच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळण्या विषयीं अथवा अज्ञानाचे पालन व त्याच्या मालमिळकतीचा कबजा करण्या लायक मनुष्य नेमण्या विषयीं वर्ग १३ सन १८९० चा अक्ट ८ कलम ६ प्रमाणें.

अर्जाचा नंबर १ सन १८९६

डेपुटी कमिशनर साहेब जिल्हा एलिचपूर यांचे कोर्टांत.

| | |
|---|---|
| अर्जदार | बुंदीया |
| जवजे | उत्तमसींग |
| जात | किराड |
| राहणार | पथरोट |

वरील ( अज्ञान ) मनुबाई जवजे नारायणसींग जात किराड रहाणार पथरोट ता० एलिचपूर जिल्हा एलिचपूर यांणें [ याच्या मालमिळकतीच्या वहिवाटीचें सरटीफिकीट मिळावें ह्मणून ] ( याचें पालन व मालमिळतीचा कबज्या करण्या लायक मनुष्य नेमला जावा ह्मणून ) अर्ज दिला आहे. यास्तव मृत्युपत्राचें आधारें किंवा दस्तऐवजावरून, किंवा अगदीं जवळचे नातलगपणाचे कारणावरून, किंवा इतर प्रकारें ज्या कोणी मनुष्यास सदरहू अज्ञानाचे मालमिळकतीवर सांभाळकर्ता या नात्यानें कबज्या करण्याचा हक्क सांगावयाचा असेल त्या सर्वांस या लेखानें कळविण्यांत येत आहे कीं त्यानीं तारीख ६ माहे मार्च सन १८९६ इसवी रोजीं वरील अर्जाची चौकशी होणार आहे ते वेळीं ह्या कोर्टांत हजर होऊन आपापल्या हक्काची लेखी हकिगत दाखल करावी. तारीख २७ माहे जानेवारी सन १८९६ इसवी.

H. Godwin Austen
Deputy Commissioner
Ellichpur

नोटीस.

रा० रा० ललुप्रसाद मंनुलाल मिसर राहणार वाशीम यांसः—

खाली सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी व आह्मी तारीख १४ ९-९५ पर्यंत एकत्र होतों पुढें तुमचे आमचे न जमल्यामुळें पंचा मार्फत वडिलाचे स्थावर जंगम मिळकतीची वांटणी झालीं त्यांत माझे वांटणीस आलेल्या तीन नंबरांपैकीं मौजे सावरगांव बरडे येथील सरवई नंबर ३३—९६ हे माझे संमति शिवाय तुह्मी लावून काढले आहेत असें समजते तरी या पुढें तुह्मी असें करूं नये वांटणीचे वेळीं आमचे तुह्माकडे निघत असलेले फाजील रुपये १८८- व शेताचे नफ्याचे रु. ३० असें सर्व मिळून रुपये ४८८- तुह्मी शेतसारा आणि सरकारी तगाई बद्दल माझे हिस्याचे रुपये ३० भरून देऊन बाकी राहिलेली रकम रुपये १८८- पोष्ट मार्फत माझेकडे पाठवावी. याप्रमाणें तुह्मी ८ दिवसाच आंत न केल्यास योग्य कोर्टांत तुमची सोय करून सर्व खर्चा सुद्धां रुपये भरून घेतले जातील. कळावें तारीख ४ माहे २ सन '८९६ इसवी.

( सही )
मोहनलाल मंनुलाल मिसर फ०
अ० मास्तर ई० म० शाळा
दर्यापूर

## आत्मसंयमन

( मागील अंकावरून समाप्त )

एखादी गोष्ट चुकीची आहे असें आपणास माहीत असूनही आपलें वाईट मन कधीं कधीं ती गोष्ट करण्यास किंवा बोलून दाखविण्यास सांगत असते. परंतु अशा फितावणसि न जुमानण्या विषयीं आपल्या चांगल्या मनाची एकसारखी टोचणी चाललेली असेत. अशा वेळीं वर सांगितल्या प्रमाणें आपली सद्बुद्धि आपणास टोंचीत असतांही दुष्ट बद्धीच्या प्रेरणेला मान देऊन आपण ती चुकीची गोष्ट केली किंवा बोलून दाखविली तर आपण आपल्या सद्बुद्धीला मागें सारून तिचा दुरुपयोग केला असें होऊन दुष्टबुद्धीला समजून उमजन मान दिल्या सा खें होतें. या प्रमाणें वर्तन घडल्यास आपण स्वतःवर अवलंबण्यास चुकतो व ही चूक अगदीं थोड्याशा हयगयीनेंही होण्या जोगीं आहे. ह्मणून अशा वेळीं आपल्या मनांत जें शुद्ध ह्मणून आपल्यापुढें ठेविलें असतें त्यावरच स्वावलंबन करायाचें व तेवढें न झाल्यामुळें सर्वच फसतें. अशा वेळीं आपलें खरें आपलेपण किंवा ज्यावर आपलें अवलंबन व्हावयाचें तें, ह्मणजे आपणासमोर जें सत्य उभें असेंत व जें मिळविण्याची आपली खटपट चाललेली असेत तें होय. असा अर्थ घेतला ह्मणजे हें खरें आहे कीं तें खरें, आपलेंपण मनुष्याच्या विचारापेक्षां अधिक चांगलें असेंत. कारण जें आपलेंपण मिळविण्यासाठीं मनुष्य प्रयत्न करितो तेंच खरोखर अवलंबन करण्यास योग्य असते. परंतु त्याच्या त्या वेळच्या विचारावरून हें खरें आपलेंपण बाणण्याचे कामीं त्यांचे अंगीं कांहीं कमीपणा आहे असें दिसून येतें. एकदां एक विद्वान गृहस्थ असें ह्मणाला " नीच प्रकारचें वर्तन कसें ठेवावें हें मला जितकें माहित आहे तितकें तें न ठेवण्या विषयीं नेहमीं खबरदारी घेणें हेंच काय तें माझें धर्माचरण होय." आणि प्रत्यक मनुष्यानें धर्माचरण ठेवावें ह्मणून जी ह्मण आहे तिचा तरी अर्थ हाच आहे. आपण आहों असेच असलों तरी व आपल्या मनांत ज्या ज्या दुष्ट वासना उत्पन्न होतात त्या होत असल्या तरी आपल्या मनांमध्यें हल्लींपेक्षां जास्त सुधारणा करणें व आपल्या मनाच्या कलाप्रमाणें आपलें वर्तन बदलत चाललें आहे असें न दाखविता ज्या रीतीनें आपण ... वागलें पाहिजे असें आपणास खरोखर वाटतें तसेंच दाखविणें हें आपलें कर्तव्य आहे हें विशेष स्पष्ट करुन दाखविण्याची गरज नाहीं. ह्मणून स्वावलंबन ह्मणजे आपल्या मनाला वाटेल तसें आपलें वर्तन ठेवणें नव्हे तर आत्मसंयमन करणें असा त्याचा वास्तविक अर्थ आहे.

परंतु एखादा असेंही ह्मणेल कीं " कांहीं कारणामुळें मला राग आला तर राग हा मनोविकार मला आहे असें सुद्धां मी दाखविता कामा नये काय? जो विकार माझे ठायीं खरोखर नाहीं तो दाखविला असतां माझे वर्तनात सत्यता राहील काय? ह्मणून आपल्या वर्तनाचें खरें सुकाणूं ह्मटलें ह्मणजे ' माझें कर्तव्य अमूक आहे " अशी आपल्या मनाची खात्री होणें हें होय. आपल्या मनाला कसेंही वाटो, जें योग्य आहे ते बोलणें व तसें करून दाखविणें हें आपले मोठें महत्वाचें काम आहे. मनाचा नुसता मोकळेपणा असणें हा कांहीं गूण नाहीं. मनाचा मोकळेपणा असणें व भाषणांत धर सोड नसणें हे दोन्ही गूण योग्य दिशेनें जात असले तरच ते प्रशंसनीय होत. आपल्या मनांत विषय वासना उत्पन्न झाली ह्मणजे मनांतील दुष्ट पाप वासना तोंडावाटे बाहेर काढिण्यास हा मनाचा मोकळेपणा आपल्या बेअब्रुला कारण होतो. ह्मणून अशा दुष्ट वासन... वून त्या नाहींशा करून टाकणें हेंच खरें कर्तव्य होय. त्याच प्रमाणें ... अप्रामाणिक व्हावेंसें वाटलें किंवा ... खोटें बोलावेंसें वाटलें किंवा एखाद्या... ष्टुरपणा दाखवावासा वाटला तर तसें ... ण्यास आपल्या मनाचा कल जिकडे ... तिकडे तो फिरूं न देतां जें का... आहे असें आपले खरें मन आपणांस ... तें काम बजावणें आपलें कर्तव्यच आहे.

एखादी गोष्ट आपल्या मनांत येणें हेंक... गैर वाजवी असेल तेव्हां ती आपल्या मनां... आली आहे असें नुसतें दाखविणें सुद्धां अ... योग्य होईल. आपल्या मनांत जें जें निंद्य वाईट असेल तें सर्व आपणच दाखवितां कामा नये. प्रथम तें मनांत येणें व तेथें तें आं... असें भासणें हेंच दोषास्पद आहे; तर म... तें ओठाचे बाहेर काढणें किंवा तें प्रत्यक्ष

कृतीनें करून दाखविणें हें खरोखरच त्याहूनही दोषार्ह आहे हें अगदीं उघड आहे. अशा प्रकारें वर्तनक्रम ठेवणें ह्मणजे निंद्य व दुष्ट रीतीचा आपलेपणा राखणें या सारखें आहे. एखाद्यावर आपले रागावणें खरोखरच वाजवी असल्यास तो राग निदान बाह्यात्कारी दाखविणें हें आपलें कर्तव्यच आहे; मग त्यावेळे पुरता आपणास राग येवो अगर न येवो. कारण एकंदर व्यवहारांत जें वाटणें योग्य आहे तें वाटून दाखविणें हें आपलें कामच आहे. परंतु जेव्हां वाटतील तसले विचार पाहिजे तेव्हां मनांत येतात तेव्हां तें सर्वच बोलून दाखविणें किंवा त्याप्रमाणें वर्तन करणें मात्र अगदीं अयोग्य आहे ही गोष्ट कोणासही अमान्य होण्याजोगी नाहीं.

जगांतील नेहमींच्या व्यवहारांत ह्या सिद्धांताची सत्यता लागू करणें विशेष महत्वाचें असून आपण जें करितों तें योग्य [illegible] अडचणी येतात तो वारंवार स्वतःस असे विचारीत असतो कीं " अमूक मनुष्यावर उपकार करूं नये असें वाटत असतांही त्यावर उपकार केलाच पाहिजे काय ? ज्या मनुष्याचा मी खरोखर तिरस्कार करितों त्या मनुष्यावर माझें प्रेम आहे असें दाखविणें ह्मणजे मी ढोंग करितों असें होणार नाहीं काय ? मी त्यांशीं मित्रभावानें बोलत असतां माझे मनांत उत्पन्न होणारी त्याच्या वर्तनाविषयींची नावड छपविली तर मीं आपलें खरें हृद्गत प्रगट करीत नाहीं असें होत नाहीं काय ? " असे नाना प्रकारचे प्रश्न उत्पन्न होऊन मन अगदीं गोंधळून जातें. याप्रमाणें ज्यांस सत्याची आवड आहे व सत्यच आचरावें अशी ज्यांची मनापासून इच्छा व आवड असेते त्यांस आडमार्गांत ढकलणारे हे जबरदस्त शत्रू नेहमीं तयार असतात. परंतु आतांपर्यंत ज्या एका तत्वाविषयीं इतका उहापोह केला त्याच तत्वाचे आधारावर या व अशा प्रकारच्या दुसऱ्या शत्रूंस सहज जिंकून टाकतां येण्याजोगें आहे.

---

वऱ्हाडसमाचार

मिती माघ वद्य १२ शके १८१७

[illegible]ल्याकडील पाटणाच्या महाराजांनीं [illegible]हत्या केल्याविषयीं दुःखकारक व उद्वेगजनक वर्तमान प्रसिद्ध झाल्यापासून " पोलिटिकल एजंट " ही संस्था नेटिव संस्थानिकांस यमस्वरूपीं असते असें सर्वत्र भासूं लागलें आहे. अमृतबझार पत्रिकेनें जी बातमी बाहेर आणिली आहे तिजवरून असें दिसतें कीं पोलिटिकल एजंसीच्या जांचाला त्रासून, हाल अपेष्टा सहन न होऊन, व निराशेला अगदीं वश होऊन महाराजांनीं आपल्या पत्नीची व आपली हत्या केली. दुसरी अशी ही उठली आहे कीं महाराज [illegible] विश्वास हा ह...

तामसी होते, त्यांच्या मनांतून विलायतच्या सफरीच्या खर्चाला आपल्या पत्नीनें स्वताचे २० हजार रु० द्यावे असें होतें पण ती ही गोष्ट कबूल करीना ह्मणून संतापाच्या भरांत असें वेडेपणाचें कृत्य घडलें आहे. पहिली बातमी खरी वाटण्यास खुद्द महाराजांच्या हातचींच पत्रें कारण आहेत. संस्थानिकची स्वतंत्रता वास्तविक लटुपटीचीच असते पोलिटिकल एजंट ह्मणजे एक दरवेशी होय आणि त्याच्या हुकूमांतील संस्थानिक हीं अस्वलें होत. अशा खरोखरी परतंत्री कारभार असतो आणि तशांत पोलिटिकल एजंटनें त्यांस दुनियेंतून घालविण्या पर्यंत आपली वर्तणूक चोख ठेविली तर त्याबद्दल आमचे राज्यकर्ते जबाबदार नाहींत काय!

नामदार बळवंतराव भुसकुटे यांनीं व्हाइसराय साहेबांच्या कौंसिलांत प्रश्न केला होता कीं यावरील प्रकरणांत सरकारनें विचारपूस केली आहे काय आणि त्या तपा-[illegible] तपासाचें प्रयोजन दिसत नाहीं. आमच्या मतें सरकारनें या गोष्टीचा फार बारकाईनें शोध घ्यावा आणि आपल्या माथीं येऊं पहात असलेला दोष दूर करावा; लोकांचें चित्त संशययुक्त ठवणें फार वाईट होय

---

आह्मी वारंवार प्रतिपादन केलें आहे कीं, आमची सांपत्तिक स्थिति सुधारल्या वाचून देशाची उन्नति होणें दुर्घट आहे आणि सांपत्तिक स्थिति सुधारण्याला लोकांस धंदेशिक्षण मिळून देशाचा व्यापार वाढला गेला पाहिजे " सर्वारंभा स्तंडुलाः प्रस्थमूलाः " हें तत्व कोणासही अमान्य होणारें नाहीं. स्वतंत्र धंदे उर्जित दशेला येण्याला अथवा त्यांची प्राणप्रतिष्ठा होण्याला पारतंत्र्य स्थिति चांगलीशीं अनुकूल नाहीं हें खरें आहे. आमच्यावर राज्य करणाऱ्या इंग्रज लोकांस ' राजे ' ह्या पदवीपेक्षां ' वनिये ' ही पदवी सार्थतेनें जास्त खुलते! त्यांचें राज्य चालविण्याचें धोरण आपला व्यापार जास्त कसा फैलावेल इकडे आहे. आणि ह्या व्यापारास अडथळा येणाऱ्या गोष्टीस ते कायद्यानें निगुडित करून टाकीत आहेत, आमचा देशचा व्यापार वाढला ह्मणजे तितक्या प्रमाणानें विलायती व्यापार कमी होणार. तेव्हां आमच्याकडील धंद्याला सरकाराकडून विशेष उत्तेजन मिळण्याचा संभव कमी आहे व ह्या प्रकाराची साक्ष देण्यास " काटन ड्युटी बिला सारखीं " दुसरीं अन्य प्रमाणें आहेत. ह्या आक्षेपांत बरेंच तथ्य आहे हें आह्मास कबूल आहे

पृथ्वीच्या अंतर्गत भागांत पाण्याच्या प्रवाहनलिका आहेत; ह्यापैकीं आपण एका नलिकेच्या प्रवाहास कृत्रिम उपायांनें अडथळा करून तो बंद करण्याची खटपट केली तर अशा कृत्रिम उपायांनीं कधीं ही बंद न होता तो वाट सांपडेल त्या दीशेनें जाईल आणि त्याला चोहोंकडून निर्बंधित केलें असेल तर स्वशक्तीनें त्या बंधनास पार फोडून तो आपला वाहण्याचा क्रम विशेष जोरानें चालू ठेवील हा सृष्टीधर्म ज्ञानास अगदीं तंतोतंत लागू पडतो लोकांस धंदे शिक्षणाचें ज्ञान असूं द्या ह्मणजे कितीही अडथळे असले तरी त्यांतून शेवटीं तें ज्ञानच आपण होऊन मार्ग शोधून काढील; मात्र हा मार्गशोधनाचा प्रकार बरा अथवा वाईट असणें तें तत्कालीन स्थितीवर अवलंबून राहील. ही गोष्ट लक्षांत वागविली ह्मणजे आह्माला धंदेशिक्षण पाहिजे आहे ( मग त्या शिक्षणाचा आतांच उपयोग करतां येवो अथवा न येवो ) हें उघडपणें सिद्ध होतें.

---

देशी गिरण्यांतील कपड्यावर सरसकट जकात बसविण्यांत आली ही जकांत १०० रुपयें किंमतीच्या मालावर ३॥ रुपये प्रमाणें वसूल करण्यांत येईल. आयात कर पूर्वी शेंकडा ५ होता तेथें आतां ३॥ करण्यांत आला आहे. हे दोन्ही कायदे गेल्या ३ रे तारखेस पसार झाले. जेव्हां या बिला संबधानें वादविवाद झाला तेव्हां सरकारी कामदार-कौंसिलदारांनीं स्टेट सेक्रेटरीच्या हुकूमा अ[illegible] अभिप्राय दर्शविले आणि लोक[illegible] मतें विरुद्ध पडलीं होतीं तथापि [illegible]तीनें बहुमत झाल्यामुळें हे कायदे पसार झाले. नामदार आनंदा चार्लु बळवंतराव भुसकुटे, प्लेफेअर, इव्हान्स, मोहनीराय इत्यादि गृहस्थांचीं मतें प्रतिकूळ पडलीं. आमच्या दृष्टीनें कायदे-कौंसिलांत लोकमताची पायमल्ली होते. सरकारचें बहुमत केव्हां ही कायम असतें. जोंपर्यंत सरकारचे वतीचे कौंसिलदारांची संख्या अधिक आहे तों पर्यंत कायदे करण्याचे असेच फार्स उडावयाचे!

---

अर्थशास्त्राला हे कायदे बाध आणितात अप्रतिबंध व्यापाराचें तत्व प्रतिपादन यांत येतें पण तेंच झुगारलें जातें. या तत्वाचा मान तें मोडण्यांतच आहे असें दिसतें. म्यांचेस्टरवाल्या गिरणीवाल्यांचे हिताकरितां लार्ड हामिल्टन यांनीं नवीन जकातीचा कायदा फर्मावला आणि इंडियाच्या गिरणीवाल्यांस ठार बुडविणारा कायदा व्हाइसरायच्या कायदे कौंसिलांत पसार झाला. इंडियन प्रजेला महाराणी सरकारानें जो हक्करूपी जाहिरनामा कळविला आहे. त्याचें उल्लंघन करून त्याला परिणामीं तिळांजली देण्यांत आली! दुर्दैव आमच्या हतभागी देशाचें!

---

विलायतच्या गिरणीवाल्यांचे दांत त्यांच्याच घशांत पाडण्याचें काम आपल्या हातीच आहे. आपल्या लोकांच्या अंगीं देशाभिमान असेल, त्याच्यामध्यें कांहीं पाणी असेल, आणि सांप्रतच्या स्पर्धाकलहांत आपली निभावणूक होण्यासारखें आपल्या लोकांत आत्मसंयमन असेल तर खरोखरीच आपल्या परीक्षेची ही वेळ आली आहे. विलायती कपडा आपल्या दुनियेंत नाहीं अशी व्यवस्था आपण कृतीनें करून दाखविली पाहिजे. प्राण जावो अथवा राहो, प्रत्येक इंडियन इसमाचा निर्धार असा पाहिजे कीं विलायती कपडा यापुढें वापरणार नाहीं जूटीचें फळ कांहीं विलक्षण आहे. सर्व देशभर जर असा कट झाला तर विलायतेच गिरणीवाले व सरकार यांस आपण जेरीला आणूं. एक राष्ट्रीयत्व आपणामध्यें प्रेरित झाल्याची ओळख आपल्या शत्रूंस होण्याची वेळ हीच आहे. मिल्टन कवीच्या उक्ती प्रमाणें, वेळ आणि [illegible]ची आ[illegible] आहेत. त्या[illegible]

...उघात व पखवाजांत ...

हे, उठा, कंबरा बांधा! नाहींतर असेंच लोळत लोळत पडा!

---

नामदार फेरोजशहा मेथा यांची नेमणूक व्हाइसराय साहेबांच्या कायदे कौंसिलांत झाली होती पण त्यांनीं प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें कौंसिलदारी नाकारली आहे. जकातीचें बिल कौंसिलांत पसार झालें अशा वेळीं नामदार मेथा यांचा राजिनामा पुढें आला हें पाहून सर्व देश हळहळ करीत आहे. नामदार मेथा सारखा मुत्सदी, वक्ता, व कायदेपंडित कौंसिलांत नसल्यामुळें सर्व देशाची बाजू फिक्की पडला यांत शंका नाहीं. लोकांच्या तर्फे आलेल्या प्रतिनिधीचें काम कितीही उत्कृष्ट झालें तरी सरकारी आफिशियल कौंसिलदारांच्या मतबाहुल्यानें तें काम मातीमोल होतें. कित्येकांचा असाही ग्रह झालेला दिसतो कीं नामदार मेथा यांस या कायदे कौंसिलांतली लंपडाबी व काम करण्याची रीत नापसंत असल्यामुळें त्यांनीं निराशेनें हा राजिनामा दिला असावा. सरकारी कायदे कौंसिलांत कायदे करण्याचे फार्सच नेहमी होत असतात आणि तेथें कोणाची मात्रा चालू नये अशीच अंतस्थ सर्व व्यवस्था असते. तेव्हां लोकप्रतिनिधी स्वाभाविकपणेंच नाउमेद होतात!

---

# The Berar Samachar

MONDAY FEBRUAR[Y]
10, 1896

## THE SUPREME LEGISLATIVE COUNCIL

We were the first to press the claims of the Hon'ble Raosahib Balvantrao Govindrao Bhuskute of Burhanpur for a seat in this Council, when it was likely to become vacant by the expiry of the term of office of the Hon'ble G. M. Chitnais. No doubt our contemporary of the Deshsevak of Nagpur and the Hindu of Madras together with several other journals of equal or less note supported our view. But we are justly proud the signal was first given by us. We had no doubt the Hon'ble Bhuskute is equal to the task and let us assure our readers we meant no injury to the Hon'ble Chitnais himself.

Two years ago a regular election was held and His Honor the present Lieutenant Governor of the North West Provinces, the then Chief Commissioner of the Central Provinces did a sort of injustice to the Hon'ble Rao Sahib Bhuskute in nominating the Honourable Chitnais. Thinking that the opinion of the people would not be materially different from that they expressed two years ago, the Hon'ble J. Woodburn the Chief Commissioner of the C. P. recommended the nomination of the Hon'ble Bhuskute. He is thus in the Council.

The Cotton goods manufactured in Indian Mills made up from counts 20 and lower hitherto exempted have been excised like higher fabrics. Most of the members in the Council voted for the Cotton Duties bill, the Hon'ble Babu Mohini Mohan Roy, Rai Bahadur Ananda Charlu the celebrated President of the National Congress at Nagpur and the Hon'ble Raosahib Bhuskute being the only dissentient members.

We were extremely anxious to see

...द्ध केलं.

what figure Raosahib Bhuskute would make, but now ends our solicitude We congratulate him on his fearlessness, moderation, independence, and sobriety in reasoning. The limited space at our disposal will not allow us to publish his maiden speech in extenso. Yet we shall gladly make room for the following extracts from his most thoughtful and lucid speech on Last Monday's meeting of the Supreme Legislative Council:—

"It is no doubt an acknowledged and an established maxim of the Economical science that when an article is made dearer its demand proportionately diminishes and some customers are excluded. But an abstract proposition has a variety of modifications. An increased taste for finery, regard to fashion, comfort, and decency prevent the class of whom I am speaking from resorting to a coarser and therefore cheaper cloth. The duty raises the prices but the rise is not material. There is no paradox in this. But if we were to look to the poorest class of people, helplessness and poverty are beyond measure so great that the duty as proposed would materially fall very heavily on them, whereas the class immediately above them owing to modifications given above will prefer any other privations to sacrificing an outward semblance of decency. Just as in politics every abstract proposition requires a modification of circumstances, so also in Economics every principle has a variety of counteracting influences. It is circumstances which give in reality to every established principle its distinguishing color and its discriminating effect. The class to be burdened by the proposed duty is the poorest. The reduction in duty from five to three per cent and a half will certainly be a decided advantage to the class immediately above it But though it may be an advantage to them the proposed taxation will materially alter the condition of the poorest class. The former class feels the burden yet it does not overpress it. It persists in resorting to its former raiment at the sacrifice of some other necessaries of life. Because it cannot go without it. Competition is hampered in this country by custom and the Lancashire argument about the diversion of trade is therefore quite futile. What is true of the class immediately above the poorest is true of all other classes above it. The other class of men will never exchange their fine clothing *for a coarser* one, so long as the conventional ideas of fashon and respectability remain unchanged. But for the counteracting modifications I have briefly outsketched the argument would have had a deal of intrinsic force in it.

\+ + +

"It is an acknowledged fact that India can not make cloth of yarn of counts above thirty. Considerable opportunity thus presents itself to Lancashire to try her skill in counts ranging from 30 to 20. But as a matter of fact that is not the case. When there is no proof, actual or presumptive, that she can compete with India in cloths of yarns of counts 20 and under it would be perfectly inexpedient to change the entire fiscal arrangement of this country only for the sake of allowing her facility for making an hitherto untried experiment. If her trade be not in a prosperous state, it is owing entirely to other extraneous reasons. If the Government were convinced that the present exemption is detrimental to the just interests of Lancashire some consideration would have been absolutely necessary for her. But in the present case the repeal, of a provision highly congenial to the interests of one class and perfectly harmless to those of another would be highly impolitic."

## वऱ्हाड

रा. रा, सी, शामराव अभ्याची हे रजेवरून परत अकोल्यास रुजूं होतील.

मि० किंग ए० खसि० कमिशनर हे केटाहून परत वऱ्हाडांत आले आहेत.

देशी गिरण्यांतल्या कपड्यावर जकात व सर्विणें अन्यायाचें आहे असें लोकमत दर्शविण्यासाठीं उमरावतीस गेल्या आठवड्यांत टॉलेजंग सभा भरली होती. अध्यक्षस्थानीं रा. रा. मल्हाद नारायण जोग, हायकोर्ट वकील हे हे ते लोकमताला विचारतो कोण!

गेल्या २१ वे तारखेस सर एडवर्ड बक सेक्रेटरी-रेव्हिन्यु व अग्रिकलचरल खातें, हे आकोल्यास येणार आहेत; व ते आल्यानंतर कमिशनर, ६ डेपुटी कमिशनर, इनस्पेक्टर जनरल या आफिसराचें कानफरन्स भरून कांही विशेष महत्वाच्या विषयावर विवेचन होणार आहे.

राव साहेब सिताराम विश्वनाथ पटवर्धन बी. ए व रा. रा. विष्णु मोरेश्वर महाजनी एम. ए. हे उभयता खामगांव मुक्कामाला आहेत.

राव बहादूर जठार यांनीं केलेल्या नेमणुका रद्द करून खालील प्रमाणें फिरफार राव साहेब पटवर्धन यांनीं केली आहे:—

| रा. रा | पगार व बदलीचें गांव |
|---|---|
| बाळकृष्ण सिताराम (हेडमास्तर ५० रुपये) | ४० आकोला फर्स्ट असि. |
| दर्यापूर | |
| मनोहर नारायण | ३५--एजु इनस्पेक्टरचें आफिस |
| रामचंद्र भिकाजी | ३०--हेडक्लार्क डे. इ. इलिचपूर. |
| दाजी वामन | २० दुय्यम क्लार्क डे. इ. आकोला. |
| विष्णु मार्तंड | १५ तिसरे क्लार्क डे. इ. आकोला. |

रा. रा. महादेव काशीनाथ आक यांस आकोल्याहून बदलून दर्यापुरास हेडमास्तरचे जागीं ५० रुपये बढतीवर पाठविलें.

रा. रा. रामचंद्र सदाशिव लेले बी. ए. यांस उमरावती हायस्कुलांतून बदलून मेहकरच्या शाळेवर हेडमास्तर नेमिलें आणि रा. रा चिंतामण गणेश पांडे यांस ७५ पगारावरून ६० रुपये पगारावर नेमिलें हें कळविण्यास वाईट वाटतें.

रा. रा. बाळकृष्ण लक्ष्मण वापट डे ए. इनस्पेक्टर, उमरावती हे चालू महिन्यापासून दोन महिन्यांच्या हक्काच्या रजेवर गेले आहेत. त्यांच्या रजेंत रा. रा. श्रीधर रामचंद्र पिंपळखरे यांस डेपुटी इनस्पेक्टर नेमण्यांत आलें.

राव साहेब पटवर्धन हे येत्या १६ वे तारखे पासून ६ दिवस.च्या किरकोळ रजेवर पुण्यास जाणार आहेत.

वैदर्भ पत्रकर्त्यास ताजी बातमी कळते कीं आलिशान रेसिडेन्ट मि प्लोडन हे त्या २० तारखेच्या सुमारास वऱ्हाडांत येणार आहेत

आमचे लोकप्रिय डेपुटी कमिशनर मि. हेअर साहेब हे लवकरच १९ महिन्यांच्या फर्लो रजेवर जाणार आहेत

## जाहिरात.

म्युनिसिपल नियमांतील नियम १२ अन्वयें जाहिर करण्यांत येते कीं अकोले म्युनिसिपाल कमिटींतील, तारीख ३१ माहे मार्च १८९६ इसवी रोजीं ज्या मेंबरांच्या जागा सदर्हू नियमांपैकीं नियम ३१ प्रमाणें खाली होतील या भरण्या करितां तारीख २४-२५-२६ माहे फेब्रुवारी सन ८९ इसवी. रोजीं सकाळचे ७ वाजे पासून सांयंकाळचे ५ वाजे पावेतों निवडणूक होणार आहे. खालीं दिलेल्या तक्त्यांत प्रत्येक वार्डापैकीं मेंबर निघाले त्यांचीं नांवें, त्या वार्डा करितां होणाऱ्या निवडणूकीची तारीख, जागा, पोलिंग आफिसराचें नांव, व उमेदवारांनीं कोणते तारख पर्यंत पोलिंग आफिसर कडेस म्युनिसिपल रूल १३ प्रमाणें आपले अर्ज द्यावे ही माहिती दिली आहे.

| वार्ड | मेंबरांचीं नांवें. | निवडणुकीची तारीख. | निवडणुकीची जागा. | पोलिंग आफिसरचें नांव. | कोणते तारखेचे आंत उमेदवाराचे नांवचा कागद द्यावयाचा. |
|---|---|---|---|---|---|
| वार्ड १ | मि. गणेश अनंत वैद्य<br>„ दामोदर गणेश पटवर्धन | २४ फब्रुवारी १८९६ | पाटील चावडी | मि. बाळकृष्ण [illegible] एक्स्ट्रा असि० कमिशनर | १७ फेब्रुवारी ९६ |
| वार्ड २ | „ सुरजमल गोविंदराम<br>„ बाळकृष्ण मोरेश्वर साठे<br>„ चुनीलाल गुलाबचंद | २५ „ | ग्रेन मार्केट आफीस | | १८ —— ९६ |
| वार्ड ३ | „ ए० एम० [illegible] | २६ „ | टाउनहाल | | १९ —— ९६ |

ता० ७ माहे २ सन १८९६

W. N. Kale
सेक्रेटरी म्यु० क०
अकोला.

Notice is hereby given that the elections for the Akola Municipal Committee, held to fill up the vacancies of members in the Akola Municipal Committee who retire on 31st. March 1896 under the operation of rule 31 of the Municipal rules, shall take place from 7 A. M. to 5 P. M. on the 24th, 25th and 26th February 1896. The following table gives for each ward names of retiring members, date and place of election, names of polling officers and the dates before which nomination papers under rule [illegible] of the Municipal rules [illegible] be delivered to the polling officers.

| Ward | Names of retiring members | Date of election | Place of election | Name of Polling officers | Date before which nomination papers to be submitted |
|---|---|---|---|---|---|
| I | Mr. Ganesh Anant Vaidya<br>„ Damodar G. Patwardhan | 24th February 1896 | Patel's Chowry | Mr. Balkrishna B. Sub[illegible] Extra Assistant Commissioner | 17th February 96. |
| II | Mr. Surajmal Govindram<br>„ Balkrishna M. Sathe<br>„ Chunilal Gulabchand | 25th February 1896 | Grain Market office | | 18th February 96. |
| III | Mr. A. M. [illegible] | 26th February 1896 | Town Hall | | 19th February 96. |

Dated Akola 7th February 1896.

W. N. Kale
Secretary
Municipal Office
Akola

### एका सापाची कृतज्ञता..

'सान् फ्रान्सिस्को कॉल' नावाच्या अमेरिकेंतील एका पत्रांत पुढील चमत्कारिक हकीकत सान् फ्रान्सिस्को येथील एक बारिस्टर व प्राणिशास्त्रवेत्ते मि० हेमंड यांनीं प्रसिद्ध केली आहे. कांहीं वर्षापूर्वी पूर्व अमेरिकेंतून तेथें एक प्राणिशास्त्राचे प्रोफेसर आले होते. व त्यांना युकाटानच्या दक्षिण भागाला सापांचा शोध लावून त्यांच्या जाति, स्वभाव, वगैरेची माहिती मिळविण्याकरितां पाठविलें होतें. हें प्रोफेसर फार दयाळू स्वभावाचे होते. एके दिवशीं संध्याकाळच्या सुमारास एका अरण्यांतून आपल्या मुक्कामास परत येत असतां, एका दगडाच्या राशीखालून सापाच्या चळवळीसारखा आवाज त्यांना ऐकूं आला. तेव्हां ते लागलीच त्या राशीजवळ गेले व पहातात तों दगडाखालीं शेंपटी चेंगरलेला व वळवळत असणारा एक साप त्यांच्या दृष्टीस पडला. तेव्हां त्यांच्यां मनांत त्या सापाच्या डोक्यांत दगड घालून त्याला ठार मारून टाकावें व दुःखमुक्त करावें असें आलें, परंतु तितक्यांत त्या सापानें त्यांच्याकडे अशा दीनवाण्या दृष्टीनें पाहिलें कीं, प्रोफेसरला त्याची दया आली, व ती दगडाची रास त्यांनीं एका बाजूला करून त्या सापाला बाहेर काढलें. त्याबरोबर तो साप बाहेर निघुन त्यांच्या पायाजवळ आला व त्यांच्या पायांभोंवतीं वेटाळे घालूं लागला आणि त्यांचा हात चाटून आपली कृतज्ञता दाखवूं लागला. यामुळें तर प्रोफेसरांस त्यांची भारीच दया आली व आपल्याजवळच्या पिशवींत थोडासा कापूस होता तो त्या सापाच्या जखमेवर लावून जखम नीट बांधून त्या सापाला सोडून दिलें. दुसरे दिवशीं ते प्रोफेसर युकाटान येथून निघून ग्वाटिमाला येथें गेले व तेथें ते पांच वर्षें पर्यंत राहिले. व नंतर तेथून युकाटान येथें परत आले. व त्या अरण्यांतून जात असतां सहज त्या पूर्वीच्या ठिकाणाजवळून गेले. तों दगडाच्या राशींतून एक साप धांवत धांवत त्यांच्याकडे आला. दोघांनीं एकमेकांस ओळखलें. त्या सापानें त्यांच्या पायाला विळखा घातला, त्यांचा हात चाटला व आनंदानें डुलूं लागला, व अशा रीतीनें तो आपले उपकार दाखवूं लागला. हे पाहून त्या प्रोफेसरांस अत्यंत आश्चर्य वाटलें. पुढें ते प्रोफेसर तेथून जावयास निघाले तों तों साप त्यांच्या पाठीमागून जाऊं लागला. तो त्यांच्या मुक्कामावर गेला. व ते गाडींत बसून निघाले तेव्हां मित्रनें आपल्यासही गाडींत घ्यावें असा आग्रह धरला. त्या प्रोफेसरानें त्या सापाला आपल्याबरोबर घेतलें व ते पूर्वेकडे परत आले. तो साप त्यांचा नेहमीचा सोबती झाला. ते बाहेर निघाले ह्मणजे हा त्यांच्याबरोबर सरपटत जात असे. ते प्रोफेसर व तो साप नेहमी एकत्र दिसत. असें पुष्कळ दिवस झाले. एके रात्री प्रोफेसर जेवून माडीवर निजावयास गेले. साप खालीं माजघरांत होता. प्रोफेसरमध्यें कांच फुटल्यासारखा आवाज होऊन जागे झाले. तों धपकन् कांहीं पडल्याचाही आवाज त्यांस ऐकूं आला. ते उठून उभे राहिले, तों कोणी कण्हतें आहे व हाडें चुरडल्यासारखें कांहीं वाजत आहे असें त्यांस ऐकूं आलें. एका क्षणांत त्यांनीं आंगांत पायघोळ आंगरखा घातला, काडी ओढून दिवा लावला व ज्या खोलींतून आवाज ऐकूं आला तिकडे गेले. त्या खोलीचे दार उघडतात तों काय भयंकर देखावा त्यांच्या दृष्टीस पडला! आपल्या सापानें एका मनुष्याच्या अंगास जबर विळखा घातला आहे, तो मनुष्य चुलीवर आपटल्यामुळें त्याच्या डोक्यांतून रक्त वाहत आहे. व साप जोराजोरानें त्याला आवळीत आहे. जमिनीवर एक चोर कंदील व घरफोडावयाची हत्यारें पडलीं आहेत. व आपली शेपटी खिडकींतून बाहेर काढून गस्त घालणाऱ्या शिपायाला जणूं काय तो बोलावीत आहे अशा तऱ्हेनें खिडकीच्या कठड्यावर तो साप ती हापटीत होता. सापासारख्या प्राण्यानेंही अशी कृतज्ञता, समयसूचकता व धैर्य दाखवावें ही आश्चर्याची गोष्ट आहे! केव्हांही झालें तरी दुसऱ्यावर आपण उपकार करावा त्याचें फळ आपण न अपेक्षितांही केव्हांना केव्हां तरी मिळतेंच हे या गोष्टीवरून उघड दिसतें. करमणूक.

जपानसरकाराने लिओटंग प्रांत सोडून दिला व पोर्ट अर्थर बंदर चीनसरकारच्या स्वाधीन करून आपली फौज परत जाणली.

इंग्लंड व जर्मनी यांच्यांत पुन्हा सख्य करण्याकरितां इटाली व आस्त्रिया हे झटत आहेत.

अबिसीनियाच्या राजाच्या तहाच्या शर्ती इटालीस कबूल होत नाहींत.

कानडाच्या सरकारानें आपली फौज विशेष सज्ज करून ठेवण्याकरितां ९०,०,००० रुपये मंजूर केले आहेत.

मासेडोनिया प्रांतांत बंडावा होण्याची चिन्हें दिसूं लागल्यावरून त्याच्या बंदोबस्ताकरितां टर्कीसरकार पेन्शन फंडांतील रकम खर्च करण्याच्या विचारांत आहे. हिंदुस्थानची दुष्काळ फंडाची रकम कोठें गेली त्याचा पत्ताच नाहीं.

मादागास्करच्या हद्दींत कांहीं नेटिवांनीं बंड केलें व एक व्यापारी आणि कांहीं सरकारी कामदार यांची कत्तल केली.

खारटूम येथें बंडावा होऊन माधीच्या अधिकारास व्यत्यय आला आहे.

√ पोलिटिकल एजंट माझ्याशीं शत्रुत्वानें वागतो त्यास कसे खुष करावें तें समजत नाहीं. क्षमा मागितली तरी व्यर्थ! मी त्यांचा जणू काय खासगी नोकर किंवा गुलाम आहे असें त्यांस वाटतें, दोन गोष्टी बोलण्यास गेलों तर मूर्ख--भूत--पिशाच ह्मणतात, मला अति जाच होऊं लागला ह्मणून कांहीं वेळ २०० मैलांवर लांब जाऊन राहिलों, माझे अधिकार कमी करून मला आपला तावेदार बनविलें, मी त्यांजकडे गेलों तर ते आपल्या शिपायांच्या देखत माझी हवी तशी पुजा करतात, आह्मी मोठ्या पगाराचे बिन अधिकाराचे खरे खरे गुलाम बनलों आहों, हें आधीं कळतें तर १८९४ सालीं मी गादीवरच बसलों नसतों, आमच्या वडिलांचे हक्क आह्मास नाहींत आह्मी जास्त जास्त अधिकाराखालीं तुडविले जात आहों, ही माझीच स्थिती नसून छतीसगड प्रांतांतल्या सगळ्या संस्थानाची आहे, संस्थानाचे कामदार पोलिटिकलच्या हिमतीनें आमच्याशीं बेपर्वा वागतात, एकंदरीनें या स्थितींत राहण्यापेक्षां मोलमजुरी करून पेट भरण्याच्या स्थितींत राहणें बरें वाटतें, असें आपल्या राणीचा खून करून आत्महत्या करून या जगास नुकतेच सोडून गेलेले पाटणाचे राजे रामचंद्र सिंव्हदेव यांणीं मरणपूर्वी एक पत्र लिहून सर्वांस कळविलें असें आतां बाहेर आलें आहे!! अरे रे! बिचाऱ्या राजांची अशी स्थिती झाली काय? यावरून ईश्वरानें आह्मास राजकुलांत उत्पन्न केलें नाहीं हे त्याचे आह्मावर उपकारच ह्मणावयाचे बरे विचोर आह्मी ठं ठं पाळ!! पण त्या राजानें लिहिलेला हा लेख खरा आहे काय; तो लेख अमृतबजार पत्रीकेनें प्रसिद्ध केला असल्यामुळें त्याच्या सत्यासत्यतेची खात्री करण्याची जबाबदारी आतां सरकारावर आली आहे; कारण सरकारानें तो निर्णय केला नाहीं तर सरकार व सरकारची राज्यव्यवस्थ यांच्याविषयीं लोकांत अगदीं वाईट ग्रह होणार आहे. आणि त्याकरतां सरकार काय करते हें पहाणें अवश्य आहे. अ.

### युरोपियन राष्ट्रांचें लढाऊ सामर्थ्य

जर्मनीची फौज—१८,६९९ आफिसर, ५,२८,१६७ शिपायी, ९५,७९४ घोडे, २५४२ घोड्यांच्या तोफा व सामान नेण्याच्या घोड्यांच्या ९७ गाड्या. सगळ्या जर्मनीची १८९२ सालीं १५,२२,०७६ फौज होती.

बेलजम—[हें अगदींच लहानेंस आहे] पायदळ ७२,९३२ व किल्लेफौज ५८,३८० मिळून १,३१,३१२.

बलगेरिया व रोमेलिया—शांततेच्या वेळची फौज २५,९१९ पण लढाईच्या वेळची २,५७,०००; ३८६००० घोडे, ९०००, गाड्या, १,८०,००० बागनेटे, ७,०.० तरवारी, वे ४२० तोंफा.

डेन्मार्क—फौज २,१२,७००; याशिवाय २५,६२७ व्हालेंटीयर, मिळून २,३८,३२७.

इटाली—३३,३३,६८२ इतकी १८९४ सालीं होती, पण शांततेच्या वेळांत ही संख्या फारच कमी असत्ये.

मांटेनिग्रो—यांत पुरुष तितके शिपायी अशी व्यवस्था आहे. शांततेच्या वेळीं ५०,००० फौज कायमची असत्ये,

नेदरलंड— यांत वेगळाल्या तऱ्हेच्या फौजा आहेत. पैकीं एका टोळींत ६९६ हपीसर, ३४,८६७ शिपायी, ३,४८४ घोडे, व १२० तोफा. दुसऱ्या भागांत १७४ हपीसर, ३,४७१ शिपायी, २,५७४ घोडे व ४५९ गाड्या. ग्यारिसन फौजेंत ३६० हपीसर व १६,७३४ शिपायी.

आस्त्रिया हंगारी—१७,११,२२० सरदार व शिपायि, १,९३,३४५ घोडे, व २,०२४ तोफा.

रोमोनीया—४४,७२१ शिपायी व ९,५८४ घोडे पण तयारीच्या वेळीं ६५,७२६ पायदळ व ८,८६६ स्वार असतात.

रशिया—इतर प्रांतांत जी रशियाची फौज आहे ती शिवाय करून फक्त युरोप व काकेशस यांत १८९४ सालीं ७,४९,६४० फौज व १,७४४ तोफा इतकी होती. याच प्रांतांत लढाईच्या वेळची ५८,३३० हपीसर व ३०,७७,३९४ फौज इतकी असावयाचा. अमूर प्रांतांत वेढा पडल्यास ३०,००० पायदळ, ५,००८ स्वार, १६०० गोलंदाज व ८२ तोफा इतकी तयार करतां येण्यासारखी आहे.

स्वीटझर्लंड—येथें लोक तितकी फौज अशी व्यवथा आहे. त्यांत प्रथम २० पासून ३२ पर्यंतच्या वयाच्या लोकांस आणावयाचे, मग ३३ ते ४० व नंतर ४७ ते ५० अशी रीत आहे १८९४ त ९७,९२९ पायदळ, ३,२४४ स्वार, २०,२९४ तोफखान्याचे गोलंदाज व ७,२९२ इंजनेर इतकी होती.

स्पेन—कायमची फौज १,७६,०३५ व ५९० तोफा आणि वेळेवरची तयारी ५,५०० हपीसर ५,८५,००० शिपायी आणि पुन्हा बोलावणें करण्याची पाळी आल्यास १५,१७,००० पुरुष तितके शिपायी या व्यवस्थेचा हा मासला आहे.

टर्की—नेहमींची फौज २,२५,००० पण लढाईचा प्रसंग आल्यास पहिला हाप्ता ४,०४,००० व दुसराही तितकाच.

श्री० शिंदे सरकारानीं इंग्रजसरकारास विचारलें कीं आमच्याकडील शिकी व गुणा हीं दोन लष्करी ठाणीं आपण आपल्या कबजांत बहुत दिवस घेऊन ठेवलीं. आतां तीं परत देण्यास कांहीं हरकत आहे काय? वाघाचे पिल्लू गुरगुरल्या शिवाय राहील काय? पहावें सरकार काय जबाब देतें.

वाई येथें तार हापिस सुरू झालें.

ब्रह्मदेशांत यंदा तांदळाचे पीक फारच उत्तम आलें आहे.

इंडिया सरकारांत पोर्टुगीज सरकारातर्फे एक वकील ठेवण्याचा ठराव झाल्या अन्वयें मिस्तर कावसजी दिनशा पसंत झाले.

इंग्लंड व जर्मनी यांतील लढाई जुपण्याची चिन्हे दिसुं लागली.

इंग्रजलोक विश्वासघातकी असा जर्मनें दरबारानें अरोप ठेवला आहे. म. मि.

महू येथें दोन तोफखानें ठेवण्याचें हिंदुस्थान सरकारानें शेवटीं नक्की ठरविल्यामुळें नशिराबाद येथचा बाकिसावा तोफखाना ताबडतोब तेथें जाईल.

येत्या मे महिन्यांत निजाम सरकार विलायतेस जाणार आहेत असें पालमाल ग्याझेटकर्ते ह्मणतात. या विलायतच्या स्वारीस किती लक्ष रुपयांचा चुराडा होईल तो पाहावा! का. वै.

खजिन्यांची पेटी—एका जर्मन मनुष्यानें एक नवी खजिन्याची पेटी तयार केली आहे. तिच्या कुलपाला कोणी दुसरी किल्ली चालविण्याचा किंवा कुलूप मोडण्याचा प्रयत्न केला असतां त्या पेटीचें दार उघडतें व गुन्हेगाराच्या हातांत बिड्या घालून त्यास पेटींत लोटून कुलूप लावून घेतें. आश्चर्य खरें!

पलटन लुटली—काठेवाड टाईम्स वरून असें समजतें कीं राजकोटाहून डिसा येथें जात असलेली २३ व्या बांबे रायफलचा खजिना लाटूर व लिलापूरच्या दरम्यान सुमारें २० चोरांनीं लुटला व बराच पैसा व हत्यारें पळविलीं. ह्या झटापटींत २-३ खून ही पडलें असें ह्मणतात. खरा प्रकार अद्यापि कांहीं समजत नाहीं. इं. प्र.

---

☞ हे पत्र अकोलें येथें के० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर „ ७ „१ ०८
किरकोळ अंकास .... .... .... ०४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०१०६
दुसरे खेपेस .... .... ०१

Six monthly ... ... ... 3 „ 8 as.
Single copy ... ... ... ... ... 4 as.

Advertisement.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per ins ; ..

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXX AKOLA MONDAY 17 FEBRUARV 1896 NO 7

वर्ष ३० आकोला सोमवार तारीख १७ माहे फेब्रुवारी सन १८९६ इ० अंक ७

## घड्याळ

किंमत रुपये ६ हमी ३ वर्षांची

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि भक्कम ह्या फोटोप्रमाणें वॉच घ्या. ६०० वर खपलीं. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.




आह्मी स्विटझरलंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम करविलीं आहेत. यावर आमचें नांव आहे. हें घड्याळ रेल्वे रेग्युलेटरचें असून याचे कांटे रासकोप प्रमाणें असून सेकंडकाटा आहे मागील बाजूस झांकण असून आंत कांच आहे. चावी देण्यास मोगरा आहे. डायल ( लेटी ) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांत ६ जीवेल ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविले आहेत. ) ज्या घड्याळास रुबी जुवेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यांत व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरीं घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्याची जो उमेद बाळगील त्यास १०।११ वर्षांत दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल. व्ही. पी. नेही घड्याळ पाठवूं.

टीपः— " गिऱ्हाइकांत घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल. "

गोविंद महादेव पोळ.
६२-२४ वॉचमेकर आणि रिपेरर नासिक.

## जाहिरात

वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजाचा यंदाचा समारंभ अकोलें येथें तारीख २८ व २९ फेब्रुवारी सन १८९६ [ शुक्रवार व शनिवार ] रोजीं होणार आहे. समाजाचे वेळीं मेंबरांनीं अगत्य येण्याची कृपा करावी. समाजा पैकीं कांहीं मेंबरांचीं नांवें आह्मांस ठाऊक नसल्यामुळें त्यांस आमचे कडून निमंत्रण चिठ्या गेल्या नाहींत तरी त्यांणीं हेंच निमंत्रण समजून वर्गणी होतां होईल तितकी लवकर पाठवावी. वर्गणीचे दर नेहमी प्रमाणें १ रु० २ रु० व रु० ५ आहेत कळावें.

अकोलें
ता० ९।२।९६ } दत्तात्रय कृष्ण कोल्हटकर व लक्ष्मण गोविंद ओक सेक्रेटरी.

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध ४ शके १८१७

मुंबई इलाख्यांत राधनपूर ह्मणून एक संस्थान आहे. त्या संस्थानचे महाराज नुकतेच मरण पावले आहेत. त्यांच्या गादीला महाराजांचा मुलगा वारस आहे पण तो अल्पवयी असल्या कारणामुळें महाराजांनीं मरण्या पूर्वींच राज्यकारभाराच्या व्यवस्थे विषयीं एक मृत्युपत्र करून ठेविलें आहे महाराज स्वतां आजारी होते तेव्हां राज्यकारभार उत्तम प्रकारें हांकण्यासाठीं ह्मणून त्यांनीं एक कौंसिल स्थापित केलें. त्यांच्या मरणा नंतर याच कौंसिलानें रिजेन्सी--कौंसिल या नात्यानें राजपुत्र वयांत येईपर्यंत सर्व कारभार चालवावा असा मृत्युपत्रांत अधिकार देऊन ठेविला आहे. हें कौंसिल पांच महाजनाचें आहे. त्यांतील गृहस्थ चांगले नांवाजलेले आहेत. आणि कौंसिलानें कायमचा सल्ला नामदार जव्हेरीलाल उमियाशंकर याज्ञिक यांचा घेत जावा असें ही महाराजांनीं लिहून ठेविलें आहे राजपुत्राच्या पालना विषयीं व राजवाड्या विषयीं सर्व व्यवस्था महाराणीकडे महाराजांनीं सोपविली आहे. या व्यवस्थेला कोण नांवें ठेवील बरें! सर्व गोष्टीचा निकाल महाराजांनीं मोठ्या पोक्त विचारानें व दूरवर दृष्टीनें केला आहे. पण सध्यां सर्व प्रकार उलटला आहे. काळ फिरला ह्मणजे हातांतला हिरा देखिल गार बनते त्याप्रमाणें राधनपूर संस्थानची दुर्दशा उडाली आहे. पोलिटिकल एजंट यांच्या हुकूमानें राज्यकारभार चालूं आहे. कौंसिलाला रद्द केलें. राजपुत्राच्या संरक्षणा साठीं ह्मणून जामदारखाना वगैरे सर्व बंदोबस्तांत ठेविला आहे इतकेंच नाहीं तर खुद्द महाराणीचे पोषाख व जवाहीर हीं जप्तींत ठेविलीं आहेत. महाराणीचे खानगी दागदागिने व पोषाख जप्त केले ह्मणजे मोठ्या नवलाचें व खेदाचें कारण आहे. ही पोलिटिकल एजंटची पातशाही किती जुलमाची व अन्यायाची आहे बरें! महाराणी स्वभावतः हुशार, धुरंधर व व्यवहारदक्ष आहे. महाराज वारल्याबरोबर जर तिची ही दशा तर गादीची मालकी निव्वळ नांवाची नव्हे काय! महाराणीकडून गव्हरनर साहेबाकडे या बाबदींत अर्ज झाला आहे तेव्हां काय निकाल लागतो तें पहावें.

अलिकडे नेटिव संस्थाना या हक्का विषयीं मोठा नाजूक प्रश्न निघाला आहे. लीवारनर सारखे मुत्सद्दी नेटीव संस्थानें नामशेष करण्याविषयीं विलक्षण तर्क काढीत आहेत. सध्यां प्रश्न मोठा कठीण उम्दवला आहे. महाराज हयातींत होते तों पर्यंत त्यांची गादावर मालकी होती. पण मेल्या नंतर त्यांस संस्थानाची व्यवस्था मृत्युपत्रानें करण्याचा कांहीं अधिकार नाहीं. महाराज मेल्या नंतर गादी रिकामी झाली तेव्हां पुढील व्यवस्थेचा सर्व हक्क ब्रिटिश सरकारचा आहे असें तर्कशास्त्र हल्लीं पुढें आलें आहे. देशी संस्थनांची स्वतंत्रता नाहींशी करण्याची ही एक युक्तीच आहे या युक्ती प्रमाणें रिजेन्सी–कौंसिल सध्यां अनधिकारी ठरविलें आहे. देशी संस्थानांच्या हक्का विषयीं एकदा अखेरचा निकाल झालाच पाहिजे आणि तो निकाल करण्यास हीच संधि उत्तम आहे. तूर्त राधनपूर संस्थानावर गदा आहे ! काय निर्णय होईल तो खरा!

पोस्ट खात्याची सन १८९४-९५ सालाची हकीकत प्रसिद्ध झाली आहे ही हकीकत फार उपयोगी आहे आणि ती थोडी बहुत सर्वांस ठाऊक असावी हें अगदीं अगत्याचें आहे. पोस्टल खातें सर्व देशासाठीं एक आहे. या खात्याचा मुख्य अधिकारी ह्मणजे डायरेक्टर जनरल हा सर्व खात्याचीं सूत्रें आपल्या हातीं ठेवितो आणि त्याच्या नियंत्रणा प्रमाणें पोस्ट खात्याचीं कामें चालतात सर्व देशाचें मिळून एक खातें असल्यामुळें पोस्ट ऑफिसच्या कामाची पद्धती सर्वत्र एक आहे. पोस्टाची व्यवस्था ब्रिटिश राज्यांत एक आहे इतकेंच नाहीं तर देशी संस्थानांतील पोस्ट आफिसांची व्यवस्थाही इंग्रज सरकार मार्फत सगळीकडे एकसारखी ठेविली आहे. गुदस्ता काश्मिर संस्थानचें पोस्ट खातें ब्रिटिश पोस्ट खात्याशीं सामील करण्यांत आलें आणि तसेंच मध्यप्रांतांतील नांदगांव, व बस्त्रा, व मद्रासे कडील पुद्दाकोटा या संस्थानांतही ब्रिटिश पोस्ट ऑफिसें चालूं केलीं. एकसूत्री पोस्टल कारभार झाल्यानें खर्च कमी येतो आणि दळणवळणाचे कारभार अगदीं सुयंत्र चालतात. पोस्ट आफिसा विषयीं संक्षिप्त माहिती विद्यार्थ्यांस शिकविण्या साठीं पोस्टाचा एक स्वतंत्र विषय प्राथमिक शिक्षणक्रमांत पंजाब सरकारनें घातला आहे. पंजाब इलाख्यांतलि सरकारी व खानगी शाळांतून पोस्टाचा विषय शिकविला जातो. आणि या नवीन पद्धतीनें पोस्ट खात्याची माहिती सर्व लोकांस आपोआप होत जाते. पोस्ट खातें लोकप्रिय करण्याची ही एक युक्ति आहे आणि असा विचार दिसतो कीं, पोस्ट खात्याचा विषय देशांतील सर्व प्राथमिक शाळांतून शिकविला जाण्या विषयीं तजवीज होणार आहे. ही योजना चांगली आहे आणि ही लवकरच वहिवाटींत येईल अशी आह्मास उमेद आह.

एक अत्यंत महत्वाची सुधारणा वायव्य प्रांत व औंध यांच्या पोस्टल सर्कल मध्यें झाली आहे. दिवाणी कोडताचीं समन्सें, नोटीसा वगैरे बजावण्याचीं कामें तिकडे पोस्ट आफिसांतून रजिस्टर्ड पत्रा प्रमाणें बजावलीं जातात. दिवाणी कोर्टाचें काम फार सोपतीनें होतें, पक्षकारास फारसे श्रम पडत नाहींत, खर्च थोडा लागतो व पोस्टाच्या कामा बरोबर हें काम सहजी होऊन ज[ातें.] ही व्यवस्था नवीनच चालूं झाली आ[हे] तेव्हां तिचा पूर्ण अनुभव येई पर्यंत दिवाणी कोडतांच्या गैरसोयी होत असल्यास काय काय होतात हें अजून बाहेर आलें नाहीं. कायद्या या दृष्टीनें कांहीं नडी येण्याचा संभव दिसत नाहीं. हल्लीं दिवाणी कोडतांचें समन्सें व नोटीसा बजावण्याचें काम नाझरमार्फतीनें होत असतें. तें पोस्ट ऑफिसच्या कामा प्रमाणें सुयंत्र व बिनबोभाट चालत नाहीं हें कोणीही कबूल करील. वर निर्दिष्ट केलेलें दिवाणी काम पोस्ट ऑफिस मार्फत होत गेल्यास आमच्या मतें पुष्कळ फायदा होईल असा अंदाज आहे.

या राष्ट्राच्या पोस्ट आफिसांचा इतर खंडाशीं संबंध गुदस्ता पासून फार फैलावला आहे. आफ्रिका, व अमेरिका व आस्ट्रेलेशिया या खंडाशीं दळणवळण अधिक वाढलें आहे. ही गोष्ट फार समाधानकारक होय. मुंबईहून विलायतला जी मेल जाते व विलातेहून मुंबईला येते तिचा वेग पुष्कळ वाढला आहे. पी. ओ. कंपनीशीं करार असा आहे कीं विलायतची मेल-आगबोट मुंबईत दर सोमवारीं सकाळीं ८ वाजतां त्या कंपनीनें आणून पोंचवावी. गेल्या वर्षी चार वेळां ... शुक्रवारींच मेल-आगबोट मुंबईच्या ... आली; वीस वेळां शनिवारीं आली, पंचवीस वेळां रविवारीं आली असू[न] ... चारच वेळां सोमवारीं मेल-आगबोट ... फार लवकर मेल आली तेव्हां लंडनहून ... घाल्या नंतर १३ दिवस ६ तास ५५ मिनिटें इतका वेळ लागला व साधारणपणें ... साडे पंधरा दिवस लागतात.

सर्व देशांत १०७१४ पोस्ट ऑफिसें आहेत. त्या ... पत्रें टाकू आला ... १८... अशा सभांच्या व क्लबांच्या ... रणा... गांत हसूं होतें. ती फजिती सहन ... दे... कांहीं काय करायाचें तें आरंभीं चांग... ... र करून करावें. आपल्या बला... वा... विचार होऊन आपणाला इतरांक... ... आणि उत्तेजन किती मिळेल

रून पत्रव्यवहार चालतो. देशाचा विस्तार सरासरी १॥ लक्ष चौरस मैल अहे. तेव्हां १४१ मैलाला व २६६२४ लोकसंख्येला १ पोस्ट ऑफिस पडतें. पोस्ट खात्याची भरभराट आहे या पेक्षां शेंकडो पटीनें अधिक झाली पाहिजे आणि ती शिक्षणप्रसार पुष्कळ वाढल्या शिवाय होणार नाहीं.

गेल्या वर्षी एकंदर पोस्ट कार्डा १४,३१,०६,७७७, हांशिल भरलेलीं पत्रें १६,७७,०२,७४०, नाटपेड पत्रें २,७९,२३,७८९, रजिस्टर्ड पत्रें ७८,१६,९९३, वर्तमानपत्रें २,८१,४४,७०७; बुकें व पाकिटें १,६२,४७,६९९; व पार्सलें २९,६१,९७२; मिळून एकंदर ३९,४०,०३,७९७, इतकीं पोस्ट ऑफिसांतून पाठविल्यांत आलीं. पोस्ट कार्डांचा उपयोग उत्तरोत्तर फार वाढला आहे आणि कांहीं कालानें पत्रापेक्षां पोस्ट कार्डांचा उपयोग अधिक होईल असा सुमार आहे. एकंदर लोकसंख्यंच्या मानानें पहातां पोस्ट कार्डें, पत्रें, पाकिटें, व वर्तमानपत्रें मिळून पोस्टल वस्तु माणशी १८ पडते. रशियाचें प्रमाण हेंच आहे. इंग्लंड, स्काटलंड, व आयर्लंड मिळून प्रमाण ५३ आहे. ह्मणजे मुंबई इलाख्यांतील लोकसंख्येपैकीं ज्यांस लिहितां वाचतां येते त्यांच्या मध्यें हें प्रमाण आढळेल. हिंदुस्थानदेश किती अक्षरशत्रू आहे याचें मापकयंत्र एका प्रकारें पोस्ट खातें आहे आणि त्याची वरील हकीकत देशाची वाईट स्थिति दर्शविते.

---

अकोल्यास सध्यां मुनिसिपालिटी विषयीं गप्पा गोष्टी विशेष चालतात. नवीन सहा सभासदांची निवडणूक पुढील आठवड्यांत व्हावयाची आहे. मुनसिपालिटीच्या कायद्यानें अशी योजना केली आहे कीं प्रत्येक लोकनियुक्त सभासदानें तीन वर्षे लोकसेवा करावी आणि नंतर मुनसिपालिटीची रजा घ्यावी. येथील मुनसिपालिटींत १८ सभासद लोकानियुक्त असतात ह्मणजे दरसाल सहा गृहस्थ तीन वर्षांच्या कामगिरी नंतर जुने ह्मणून मुनसिपालिटींतून निघतात आणि त्यांच्या जागीं सहा नवे सभासद लोकांच्या वतीनें निवडले जातात. या वार्षिक निवडणूकीची तूर्त धांदल चालली आहे.

मुनसिपालिटी ही एक स्थानिक संस्था आहे. या संस्थेचा उद्देश असा कीं गांवकरी ...नीं आपल्या गांवांतील शहरसफाईच्या, पु...या पुरवठ्याच्या व व्यापार धंद्याच्या ...आपल्या आपण करून घ्याव्यात. या ...रांत राजकीय विषय कांहीं येत नस... स्वराज्याचा अनुभव स्थानिक गोष्टी ...र्योन मुनसिपालिटींत येतो. अलिकडे मुनसिपाल हद्दींतील दवाखाना व प्राथमिक शाळा हीं मुनसिपालिटीच्या ताब्यांत दिलीं आहेत. उत्तरोत्तर मुनसिपालिटीचीं कामें पुष्कळ वाढत चाललीं आहेत आणि लोकही आपल्या स्थानिक अधिकारांचा उत्तम उपयोग करूं लागले आहेत. वऱ्हाडांत आठ मुनसिपालिट्या आहेत त्यापैकीं आकोला मुनसिपालिटीचा पहिला नंबर आहे असें सरकारी वार्षिक रिपोर्ट सांगतात. ही गोष्ट येथील लोकांच्या सुजनतेला, सार्वजनिक ...कपणाला फार ...स्पद आहे आकोलें शहरांत एक चक्कर मारली ह्मणजे येथील शहरसफाई, नळाचें पाणी, नवा वसलेला टूमदार बाजार, अतिशय वाढत चाललेला व्यापार, इत्यादि गोष्टी आमच्या विधानाची सत्यता दर्शवितील.

यंदा जे सहा गृहस्थ लोकसेवा तीन वर्षे करून मुनसिपालिटीचा निरोप घेत आहेत त्यांच्या चांगल्या कामगिरी बद्दल लोक त्यांचे ऋणी आहेत राजश्री वैद्य, पटवर्धन, गोविंदराम सुरजमल, साठे, चुनिलाल गुलाबचंद व ब्रयांड या सहा जणांनीं यथाशक्ती सार्वजनिक कामाला मदत दिली आणि त्यांच्या उदाहरणानें दुसरे कांहीं गृहस्थ पुढें सरसावतील अशी आह्मांस उमेद आहे. रा. रा. गणपतराव वैद्य यांनीं मुनसिपालिटीकडील शाळाखातें उत्तम चालविलें आणि प्राथमिक शिक्षणाविषयीं विशेष काळजी घेतली हें या समयीं निर्दिष्ट केलें पाहिजे. तसेंच राजश्री बाळकृष्णपंत साठे यांनीं सेक्रेटरीचें काम उत्कृष्ठ केलें आणि आपल्या गोड स्वभावानें व सर्वमान्य काम करण्याच्या शैलीनें यांनीं सर्व धोरणें नीटपणें संभाळलीं व खालवरच्या लोकांस राजी राखून मुनसिपालिटीचें तारूं वर्णनीय तऱ्हेनें चालविलें. रा. रा. दामोधर गणेश पटवर्धन हे गृहस्थ या प्रांताला अगदीं नवे होते तेव्हांच हे मुनसिपालिटींत शिरले. यांनीं मुनसिपल कामांत कट्टी मेहनत घेतली आणि सर्व काम मोठ्या हौसेनें व दक्षतेनें केलें. राजश्री पटवर्धन यांनीं मुनसीपल कार्यांत उत्तम प्रकारें लक्ष पोचविलें, सर्व कारभार निष्पक्षपातानें चालविला आणि म्युनसिपालिटीच्या कामकाजास वळणही अधिक पद्धतशीर लाविलें या गोष्टी विषयीं आह्मी त्यांचे अभिनंदन करितों. हे गृहस्थ धूर्त, चतुर व विद्वान आहेत. यांचा निर्भीडपणा व विचारस्वातंत्र्य आह्मास बहुत लाभप्रद झालेलें आहे आणि त्याबद्दल आह्मी त्याचें फार फार आभार मानतों.

लोक गुणाला लुब्ध असतात. ज्या गृहस्थांनीं चांगलें काम केलें त्यांस सोडून इतरांस निवडीत बसणें हें पुष्कळ मताधिकारी लोकांस पसंत नाहीं. लोकांच्या अशा कृतींत तथ्यही मोठें आहे. रा० रा० वैद्य, साटे, पटवर्धन किंवा यांच्या सारख्या सद्गृहस्थांस लोकानीं कां सोडावें हें आह्मास समजत नाहीं. काम केल्यानें अनुभव येतो व ज्यास्त ज्यास्त अनुभव झाला ह्मणजे लोकांचा फायदा अधिकाधिक घडूं लागतो. करितां अशा अनुभविक, कार्यदक्ष व लोकप्रिय माणसांची जरूरी विशेष असते. तेव्हां वरील योग्यतेचे गृहस्थ पुन्हा उमेदवार होऊन लोकसेवेला आपली तत्परता दाखवितील तर फार उत्तम होईल.

## जकातीच्या कायद्याचा प्रतिकार

(आकोल्यास जंगी सभा)

गेल्या शनिवारीं येथील काटन-मार्केटच्या विस्तीर्ण पटांगणांत नागरिक लोकांची जंगी सभा भरली होती. सभेस ५००।६०० लोक जमले असावेत. या पेक्षां मोठी सभा होईल असें वाटलें होतें पण नाना कारणामुळें सभा व्हावी तितकी मोठी झाली नाहीं. गांवातील प्रमुख मंडळी बरीच जमली होती. पार्शी, हिंदू व मुसलमान या जातीनीं जनसमूह रमणीय बनला होता. व्यापारी, वकील, व उद्यमी लोक पुष्कळ आले होते.

अध्यक्षस्थानीं रावसाहेब देवराव विनायक सर्वानुमतें विराजमान होऊन त्यांनीं सभेचा उद्देश कळविला. सरकारनें २० नंबरावरील देशी कापडावर कर बसविण्यांत गुदस्ता जो अन्याय केला होता तोच अन्याय यंदा २० नंबरी सुतावरील व खालील देशी कापडावर सरसकट कर बसविल्यानें अनंत पटीनें वाढला आहे याबद्दल सरकारास दिलगिरी प्रदर्शित करावी असा सभेचा बेत आहे. आणि दुसरा ठराव हा कीं सरकारी कायद्यामुळें आपण अगदीं हताश झालों तरी ल्यांका शायरच्या व्यापाऱ्यांची खोड मोडण्यासाठीं आपण दृढ निश्चयानें विलायती कपडा बिलकूल वापरूं नये आणि देशी कपड्यावरच आपल्या गरजा भागवून घ्याव्यात. राव साहेब देवराव विनायक यांनीं सांगितलें कीं पृथ्वीवरील सर्व राष्ट्रामध्यें राजनीतीचा एक नियम असा आढळतो कीं बाह्य राष्ट्रांतून येणाऱ्या मालावर कांहीं माफक जकात बसवावी आणि त्या रीतीनें देशी मालाच्या व्यापारधंद्यास उत्तेजन द्यावें. हा नियम १८७७ साला पर्यंत हिंदुस्थानासही लागूं होता पण आमचे राज्यकर्ते कांहीं क्षत्रियवंशस्थ नाहींत व त्यांची बनियेशाहीची दृष्टी आरंभीं होती तशीच चालू आहे. अप्रतिबंध व्यापाराचें तत्व चालू केलें आणि ८ कोट रुपयांचें उत्पन्न बुडविलें मग हें उत्पन्न भरून काढण्यासाठीं मीठावरील कर, इनकम ट्याक्स सारखे कर नवीन बसविले. इंडियाच्या गरीब, दरिद्री, व निःशक्त प्रजेस अप्रतिबंध व्यापाराच्या तत्वानें पिळून काढलें आहे. आह्मी आज सभेंत करींत आहों तें सर्व राजभक्तीला धरूनच आहे.

पहिली सूचना मेसर्स हारमसजी, देसाई, मौलवी अबदूल कादर व शिवबक्सजी यांनीं आणिली कीं सरकारला लोकांची नाखुषी प्रदर्शित करावी. राजश्री देसाई यांनीं जोरदार संभाषण केलें. गरिबांचें होत असलेलें नुकसान स्पष्टपणें दाखविलें व देशी गिरण्यांवर ओढवलेलें संकट ध्वनित केलें.

देशी कपडा वापरावा व विलायती वापरूं नये अशी सूचना रा. रा. पांडुरंग बापूजी यांनीं आणिली. देशी गिरण्या १४१ असून ५४ लाख रुपयांचा माल तयार होतो हें देखील विलायतच्या २८ कोट रुपयांचा कपडा काढणाऱ्या ७४६५ गिरणीवाल्यांस सहन झालें नाहीं. अखेरीस देशीच कापड वापरा ह्मणून सांगते वेळीं राजश्री राजंदेकर अगदीं जोरांत आले आणि त्यांच्या भाषणानें सर्वांस स्फूरण चढलें. पुण्याचे काका दिल्लीच्या दरबारी धावळीची बंडी घालून गेले होते तें ध्यानांत आणा व देशाभिमानाला जागे राहून स्वदशीच कपडा वापरा असा त्यांनीं उपदेश केला. मि. हारमसजी हार्वीचे एजंट यांनीं वरील सूचनेस अनुमोदन दिलें. हे गृहस्थ फार गोड व मुद्देसूत बोलले. विलायती कपडा दिखाऊ व नकली असतो, तो चांगला टिकत नाहीं, व विकत घेतेवेळीं तो स्वस्त वाटतो तरी परिणामीं फारच महाग पडतो. विलायती कापड फुकट मिळालें तरी वापरूं नका. देशी माल वापरूं लागा ह्मणजे नवे कारखाने निघतील, लोकांना नवा धंदा मिळेल, व हल्लीं २ आणे रोज मिळत नाहीं तेथें पोट भरायाची रोजी नवी निघेल असा बहुत फायदा आहे. त्यानंतर रा. रा. नारायण काशिनाथ दाते यांनीं दृढ निश्चयानें पाऊल पुढें टाका, सरकारानें केलेल्या अन्यायाचा प्रतिकार करा आणि त्या साठां एक जूटीनें व एक दिलानें संप केलाच पाहिजे असें मोठ्या कळकळीनें व आवेशानें जमलेल्या लोकांस सांगितलें इंग्रजी वर्तमानपत्रकर्ते व युरोपियन व्यापारी देखील सरकाराविरुद्ध ओरड करित आहेत हें विसरतां कामा नये. शिकलेल्या पुढारी लोकांनीं, व मध्यम वर्गातील लोकांनीं मनाशीं देशी कापड वापरण्याची पक्की शपथ घेतली पाहिजे. मि सिलिमखा हेही या विषयावर बोलले. नंतर श्रीहंस सच्चिदानंद स्वामी यांनीं आपल्या भाषणानें सर्व मंडळीस खूप हांसविलें व त्यांच्या कांहीं गोष्टी मुद्याला धरून ही होत्या

तिसऱ्या ठरावा प्रमाणें कांहीं प्रमुख मंडळीची एक कमिटी नेमण्यांत आली. ही मंडळी देशी कापडा विषयीं लोकांच्या मनांत आस्था उत्पन्न करून दुसरा ठराव अंमलांत आणील, या कमिटीत कापडाच व्यापारी गृहस्थ आहेत. शेवटीं रावसाहेब देवराव यांनीं सर्व गोष्टींचें पुन्हा उद्घाटन केलें आणि सांगितलें कीं या कायद्याच्या वेळीं निराळेंच राजनीतिचें तत्व बाहेर पडलें आहे. तें मोठ्या धोक्याचें आहे आणि त्या तत्वा प्रमाणें इंडियाचें राज्य इंडिया साठीं असें ह्मणतात तें खोटें ठरलें आहे राज्यकर्त्यांशीं राजनिष्ठपणानें आपण लढाई मारली पाहिजे आणि आपले सर्व मार्ग यथाशास्त्र आहेत तेव्हां सर्व लोकांनीं एक विचारानें या सभेच्या ह्मणण्याला स्वकृतीनें मदत द्यावी. या सभेला पार्शी मंडळीनें नामी मदत दिली ही गोष्ट संस्मरणीय होय. नंतर कांहीं कटाव वाचण्यांत आले व पुढें सभा आटोपत आहे इतक्यांत एका विद्यार्थ्यानें आपल्या अंगावरील विलायती उपरणें सर्वां देखत जाळलें! देशाभिमानाचें वारें असेंच विलक्षण आहे.

---

# The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 17, 1896

Whenever a bill is introduced in the Viceregal Legislative Council the honorable member in charge of it, generally, propounds the principle or principles on which the bill is based. These principles are advocated as forming the ground work of administrative policy. Political literature will advance by leaps and bounds when it is being profusely stocked with sound theories springing up in the hot atmosphere of the Calcutta Council. The Mandate theory propounded last year at the passing of the Police Bill, was forced upon the masses. This time the Hon. Sir James Westland gives another very *generous* principle which is contained in the following lines. These theories put together will illustrate how arguments can be shaped to serve occasions.

"It is useless to talk as if India were an independent Government, in the same sense, as, say, the Government of United ... of

सालअखेर
रकोळ



America. The Government of such a country can afford to neglect all interests but those of its own subjects; and in fact it is bound to do so, and to regard the interests of other countries only so far as they re-act upon its own. It need not care what injury (if any) its fiscal or commercial legislation causes to other countries; such injury is not its concern, except (as I say) in so far as it may re-act upon itself. But that is not our position: India is one of the members of a big Empire, the portions of which are bound together by innumerable ties, and it is out of the question that we should intentionally administer its affairs so as to cause injury to a great British industry. If injustice were proposed to an Indian one, it would be the duty of us, as representing Indian interests, to fight against that injustice to the utmost; but even then, the final verdict would not rest with us. But the pretension that it is in any way either our duty, or even consistent with our duty, to shut our eyes to interests that lie outside the geographical limits of India, to refuse to consider them, is one which is utterly unsustainable, and which notwithstanding sorrowful solicitations of the Hon'ble Member for Madras, I do not for a moment accept as defining my line of conduct."

It is quite clear that the Hon. Member means that India does not exist for herself but for England too. Further on if any necessity accidently crop up in future requiring a large sacrifice of Indian interests for the better preservation or rather development of home interests, no wit will be spared to extend the above principle a little by enunciating that at times India must exist for England. Of course England cannot and therefore need not care to exist for India.

---

In spite of strong and emphatic protests entered by the Indian merchantile community and despite the warmest appeals of the non-official Native members of the Viceregal Legislative Council, the Cotton Duties Bill passed into Law on the 3rd [illegible] this month. The Hon. Rai Bahadur Ananda Charlu could not have better represented the popular opinion than in his most vigorous, thoughtful and eloquent lines which we beg to extract below, from his scholarly speech in the Council. He first shows that the proposed Act will produce the reverse of its object to stop Protection. He says:—

It should be borne in mind that most of India's by gone industries have long been dead and unceremoniously buried. If some few have yet a tenacity of life, it is because they are as yet beyond the reach of the most scientifically finished power-loom. Fresh industries, after the modern methods, have put forth shoots and are showing signs of growth and development. They have so far flourished, my Lord, as to enable the head of our Government—the Secretary of State for India—to say quite recently—I trust he said it with pride on behalf of India—that in other than the Indian market Lancashire has within the last ten years not been able to compete with India; that while during these ten the value of the cotton exports from Great Britain to countries other than Indian has *not* increased, the exports from the Indian mills have during the self-same period, literally doubled and they are increasing still, and that there is this year a large increase in Indian exports.

The closing portion of the speech is a master-piece of a stirring appeal to the Anglo-Indians in the Council. It runs as follows:—

"They prosper by finding a fitting field in India; and let India too prosper by their presence and their labours in her midst. Let them realise that there is hope for her countless masses, if they cast their lots with them and throw their weight in the scale of justice to them; for a united representation of all India could not but powerfully tell. The Government themselves might then abandon these obnoxious measures. If they do not, even then such a combined protest might yet tell effectively in England. That these Bills are, transparently, the outcome of pressure from high need not trouble them any more than they should trouble us; for, meditating a wrong is one thing and perpetrating it is quite another; and our final arbiter might yet see fit not to perpetrate what he may have meditated. Even would-be murderers, my Lord, have been known to relent, repent and renounce. I first entreat the Government to abandon these unjust and injudicious measures; and I next entreat my Anglo Indian colleagues—my non-official colleagues in particular—to lend the Government a helping hand so that with their votes against the Government, the Bills might be dropped. Even if the Government were not prepared to take advantage of the chance thus offered, a solidarity of non-official votes might nevertheless give us a chance in the freer atmosphere of England—a chance which would be seriously imperilled if the Government and my non official Anglo-Indian colleagues become one and send up these odious measures to that final arbiter of Indian destinies as enjoying their hearty or united support—a course which would seemingly imply full local approval and might supply the Secretary of State with an excuse and a justification, which neither justice nor fair play would warrant. I am painfully conscious that I have spoken with considerable warmth; but I could not carry a smile on my lips or play the *role* of a soft-tongued courtier when I am face to face with a gross injury which is in store for the masses. More I will not say just at present; but less than this I could not say—with justice to my own convictions and with justice to the multitudinous poor, that are meant to be bled for no benefit of their own and for no fault of their own.

"I have a word to say to two Hon'ble Members who have spoken before me—the Hon'ble Mr. Rees and the Hon'ble Sir Griffith Evans. To Mr. Rees I shall say that he has taken a far too rosy view of the situation, and that, after hearing all he said, I see no reason to recall a single word of what I have spoken. To the Hon'ble Sir Griffith Evans I say that it was as *one of the people* I have spoken and not as the spokesman of any party, against which latter *róle* he has advised—and rightly advised."

---

## वऱ्हाड

ठवामान— हिंवाळा पालटला व उष्णतेला सुरुवात होऊं लागली आहे. हवा स्वच्छ दिसते. रोगराई थोडीबहूत सर्वत्र आहे.

येत्या मार्च महिन्यांत उमरावतीस प्रांतिक सभा भरण्याचा विचार ठरला होता पण पटकीच्यां वाऱ्यामुळें व पाण्याच्या अडचणामुळें सभेचा बेत येत्या नोंवेंबर पर्यंत तहकूब राहिला.

उमरावती जिल्हा. बोर्डाचें काम अती वाईट असल्या विषयीं कळल्यावरून मे० कमिशनर साहेबांनीं बारीक चौकशी चालविली आहे! परिणाम काय हातो तें पहावें!

रा० रा० गणेश बापूजी यांनीं ३ महिन्यांची हक्काची रजा घेतली. त्यांच्या रजेंत रेसिडेंटचे हेडक्लार्क रा० रा० सुबरायलू नायडू ए० असिस्टंट कमि० यांस नेमण्यांत आलें.

मि० इलियट सेशन जज्ज हल्लीं आकोल्यास आहेत. रफुवाला जयराम याचा खून करणाऱ्या आरोपींची चोकशी चालू आहे.

येत्या आठवड्यांत सर एडवर्ड बक हे येथें येऊन प्रांतिक आफिसरांचें कान्फरन्स भरणार आहे ह्मणून विशेष चळवळ चालू आहे.

वाडेगांवास एका भटकर अडगांवाच्या कुणब्यानें बायकोच्या गैरवर्तणुकीमुळें आत्महत्या केली. दुराचारांत संकटें अशींच ओढवतात!

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होते तेव्हां त्यांस कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकेट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहीरात

सन १८८९ चा अक्ट ७ प्रमाणें.

दि० कि० मु० नंबर १७ वर्ग १५ / १८९६

दिपुटी कामिशनर साहेब जि० इलिचपूर यांचे कोर्टांत

नांव— नरसाजी व शिवरामजी

बापाचें नांव— मलजी कुणबी

रहाणार— दहिगांव खुर्द कसबे अंजनगांव तालुके दर्यापूर

जिल्हा— इलिचपूर यांस मयत

मलजी बापाचें नांव सटवाजी कुणबी रहाणार दहिगांव खुर्द परगणे अंजनगांव तालुके दर्यापूर जिल्हा इलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदहू अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं ता० ९ माहे मार्च सन १८९६ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत अगर स्वारी असेल तेथें हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

ता० ४ माहे फेब्रवारी सन १८९६ इ०

जज्ज

H. Godwin Austen
Deputy Commissioner
Ellichpur District

---

मेहकर, १३।२।९६.

### स्वदेशी कपडा वापरूं

( टोळेजग सभा )

गेल्या शिवरात्रीच्या दिवशीं श्री बालाजीचे मंदिरांत गांवकरी लोकाची मोठी सभा भरली होती. आमच्या गांवीं अशा सभा अगदीं क्वचित् दिसतात. देवदर्शनाला येणारा स्त्रीसमूहही सभेच्या वेळीं तटस्थ होता व त्यामुळें सभेला मोठी शोभा आली होती सभा भरविण्याचें श्रेय रा. रा. शिवरामसा तुकासा यांच्याकडे आहे. उमरावतीहून मुद्दाम राजश्री बालमुकुंद शिवचरणगीर हे आले होते. अध्यक्षस्थानीं रा. रा. केशव वासुदेव सोमण विराजमान झाल्या नंतर प्रसिद्ध साहू राजश्री शिमरामसा यांनीं सभेचा उद्देश कळविला. ते ह्मणाले कीं जकातीच्या बिलामुळें राणी साहेबांचे जाहिरनामे व अभिवचनें देखील मोडलीं जात आहेत. वीसापासून खालील नंबराच्या सुतावर व कपड्यावर कर पूर्वीं बसविला नव्हता तो हल्लीं बसविला ह्मणजे मोठा अन्याय होय. सरकारच्या जांचाच्या उलट आपण कृतज्ञबुद्धीनें गेलें पाहिजे. आपणच विलायतचें नांव सोडून देऊं, स्वदेशी कपडा व स्वदेशी वस्तु आपण वापरूं, आर्य नांवाचा अभिमान राखूं आणि ईश्वरसाक्ष शपथ घेऊं कीं देशीच कपडा वापरूं व विलायती वापरणार नाहीं.

त्या नंतर अध्यक्षांच्या सूचनेवरून राजश्री बालमुकुंद ह्मणाले कीं देशी कापडावर बसलेल्या कराबद्दल लोकांची दिलगिरी सरकारास आपण कळविली पाहिजे. राजा व प्रजा यांचे परस्पर हक्क लक्ष्यांत घेतले तर राज्यकर्त्यांचें वर्तन एकतर्फी दिसेल. मनुष्यमात्रास स्वदेशाभिमान, स्वजात्यभिमान, किंवा स्वलोकाभिमान थोडा फार तरी असतोच व त्याचमुळें इंग्रज बहादूरास या देशाची बुडणूक करून त्यांच्या व्यापारास उत्तेजन देण्याची स्फूर्ती झाली. सरकारचा आपपरभाव सर्वत्र दिसून पडतो: आफ्रिकेंतील वसाहतींत इंडियन लोकांस होत असलेला जांच, मद्रासेस एका गृहस्थास पृथ्वीप्रदक्षिणा करण्याला देखील न मिळालेली मुभा इत्यादि सरकारच्या एकतर्फीपणाची ताजीं उदाहरणें आहेत. हल्लींच्या कायद्यानें लोकमताची पायमल्ली झाली आहे तर उपाय एवढाच कीं स्वदेशी कपडा वापरण्याचा सर्वत्रांनीं निश्चय करावा हें वक्त्यानें अनेक उदाहरणांनीं चांगलें सिद्ध केलें. श्रोता नंतर रा. रा. वामनसा राजाराम[illegible]पण ती पुदेशपांडे यांनीं समयोचित, संभव फार कमी. देशी कपडा वापरणेसाच प्रकार घडून आला शपथा घेतल्याच अशा सभांच्या व क्लबांच्या रखास्त झार्गांत हसूं होतें. ती फजिती सहन तरच आपीं काय करायाचें तें आरंभीं चांगार करून करावें. आपल्या बला-विचार होऊन आपणाला इतरांक-.य आणि उत्तेजन किती मिळेल

यंदाच्या सालीं दुष्काळाची भीति बऱ्या ठिकाणीं दिसूं लागली आहे. सिंध प्रांतांत तर खाण्यास न मिळाल्यानें बंडाळी सुरू झाली असून तिकडे पलटण रवाना झाली आहे. बिहार, मध्य बंगाल व हजारीबाग इकडे धान्याची अतिशय कमी उपज झाली आहे. पश्चिमोत्तर प्रदेश (काश्मीरच्या बाजूस) व पंजाब इकडे मोठा दुष्काळ पडण्याची लक्षणें दिसतात. कांहीं पाटस्थलें मात्र बरीं आहेत. राजपुतान्यांत साधारण अशीच दशा आहे. याप्रमाणें उत्तर हिंदुस्थानांत दशा झाली. दक्षिण हिंदुस्थानांतही साधारण अशीच दशा आहे. त्यांत पहिली पिकें कांहीं बरी झालीं पण गहु हरबऱ्यानें बराच हिसडा दिल्याचें कळतें पहावें हें वर्ष कोणत्या रीतीनें तडीस जातें तें!

सन १८९० सालचे रेलवे ॲक्टामध्यें लवकरच फेरफार होणार असल्याचें समजतें.

हिंदुस्थानांतील तार खात्यांत लवकरच फेरफार होण्याचें घाटत आहे.

क्वीन्सलंड प्रांतांत नववरच महापूर येऊन बरीच मनुष्य मृत्युमुखीं पडलीं व सुमारें ५० मैलपर्यंत रेलवे रस्ता वाहून गेला.

वायव्येकडील प्रांतांत दुष्काळ कामें सुरू करण्यांत आलीं आहेत.

मणिपुरच्या दुर्दैवी राजास मागें काळे पाण्यावर अंदमान बेटांत टाकण्यांत आलें होतें. त्यास पुन्हा हिंदुस्थानांत आणलें आहे नशीब विचाऱ्याचें!

सन १८९३ सालांत हायकोर्टांतील नं० ५०९च्या कामांत सिताराम एसजी नांवाच्या एका इसमानें जाणून बुजून खोटी साक्ष दिल्यामुळें त्याजवर काम चालून गेल्या आठवड्यांत त्यास १८ महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा झाली. खोटी साक्ष देणारांनीं हें उदाहरण लक्षांत घेण्यासारखें आहे.

बलगेरियाचा राजा शरण आल्यामुळें रशिया सरकार शांत झाल्याची बातमी आली आहे. बल्गेरियाचा राजा स्वतः क्याथलीक पंथाचा आहे, पण त्यानें आपल्या वडील मुलास रशीयन धर्म देण्याचें योजिलें आहे. असें न करण्याबद्दल त्याच्या धर्मगुरूनें व राणीनें पुष्कळ हरकती घेतल्या परंतु त्याचा कांहीं उपयोग न होता ता. १४ मिनहु रोजीं ग्रीक चर्चमध्यें वरील विधी होण्याचें ठरलें आहे व या प्रसंगीं रुशियाचा शहा या मुलाच्या धर्मपित्याप्रमाणें उभा राहणार आहे. समर्थाची मर्जी संपादण्या करितां असेंच करावें लागतें. श्रीस. वि.

सासवड येथील रामा मेथा गांवाच्या एका बनियानें आपल्या १६ वर्षे वयाच्या मुलाला त्यानें घरांतील एक जिनस चोरल्यावरून चापून मारिलें आणि त्यामुळें थोड्या वेळानें तो मुलगा मेला त्याबद्दल या म... [illegible] झाला आहे.

[illegible] मुनसिपालिटी ... कलकत्ता येथें एक ... आहेत. उत्तरोत्तर मुनसिपालिटी ... चाललीं आहेत ... ची हकीकत अशी ... आपल्या स्थानिक अधिकारांचा (... यांचें ...योग करूं लागले आहेत. वऱ्हाडांत ... होतें आणि मुनसिपालिट्या आहेत त्यापैकीं आकोल... यानें दुसमिपालिटीचा पहिला नंबर आहे असें ... ण्याबद्दल ...कारी वार्षिक रिपोर्ट सांगतात. ही ...लेली होयेथील लोकांच्या मुननेला, सार्व... असें स... ...किपणाला फार ...

मजलें कीं आपली स्वतःचीही बायको दरम्यान दुसऱ्या कोणी फुस लावून पळवून नेली आहे. त्यानें कित्येक महिने आपल्या बायकोचा शोध केला पण त्याला तिचा पत्ता लागेना तथापि वरील दिवशीं सकाळीं ती त्याच्या नजरेस पडल्याबरोबर त्यानें तिला फारच भयंकर प्रकारें एका मोठ्या चाकूनें तिच्या अवयवांचें तुकडे तुकडे करून ठार केलें! इतकेंच नव्हे तर, त्यानें शेवटीं तिच्या डोक्या या सुद्धां चिंधड्या उडवून टाकिल्या! या खुनी मनुष्याला तो हें कर्म करीत असतांच लोकांनीं पकडलें आणि पोलिसच्या स्वाधीन केलें.

तरुण मुलगी काढून नेणें:— पुणें बुध्या धाकू कांलाटी याणें मारुती सुतार याची रंगु नांवाची १४ वर्षाची नांदती मुलगी काढून मुंबईस वाईट कामासाठीं नेल्याबद्दलचा खटला सिटी म्याजि. मि. प्लंकेट यांचे पुढें चालून त्यांणीं त्यास पक्के चौकशीसाठीं सेशन कमीट केलें आहे.

व्याख्यान प्रीतिः—स्वामी विवेकानंद नांवाचे हिंदु धर्मोपदेशक संन्याशी हल्लीं लंडनमध्यें आर्य लोकांचे तत्वज्ञानशास्त्र व योगविद्या यांचवर व्याख्यानें देत असतात तीं व्याख्यानें ऐकण्यास श्रोत्यांची अतिशय गर्दी जमते. व तेथें जागा मिळाली नाहीं तर स्त्री पुरुष एतद्देशीयां प्रमाणें मांड्या घालून वसूकरांवरून बसून मनःपूर्वक एकत असतात एवढीं व्याख्यान प्रीति लंडनच्या लोकांमध्यें असलेली पूर्वी कधीं कोणी बघितली नव्हती.

पुण्याचा एक चांभार पिराजी जोती यानें रविवारी संध्याकाळीं बेलबागेंतून एकाचा जोडा चोरल्याबद्दल सोमवारी त्याला तेथील मॅजिस्त्रेटानीं एक वर्षाची सक्तमजुरीची सजा दिली.

प्यॅरीस येथील एका इजिप्शन रहिवाशानें पाठविलेल्या पत्राला उत्तर देतांना मि० ग्लाडस्टन यांनीं असें कळविले आहे कीं, इजिप्ट ब्रिटिशांनीं सोडून देण्याची वेळ कित्येक वर्षापूर्वींच आलेली आहे आणि त्यावेळीं या बाबतींत तोड काढण्यास दुसरीं सरकारें आपल्याला मदत करतील अशी आपल्यास आशा होती पण ती आशा पूर्ण झाली नाहीं, ती कां पूर्ण झाली नाहीं तें मात्र आपल्याला सांगतां येत नाहीं.

नगर जिल्ह्यांतील अकोला येथें गेल्या जानेवारीत उदासी बोवाच्या मठाशीं संध्याकाळचे ५ वाजतां नेमिया नांवाच्या एका मुलाचा खून त्याच्या अंगावरचे दागिनें लुबाडण्यासाठीं कंकर यानें त्याचे पोटात सुरी खुपसून केला नंतर त्याच्या अंगावरचे दागिनें काढण्याकरितां व तो ओरडूं नये ह्मणून कंकरनें तावडतोब त्याचे हातपाय व जीभ ही तोडून टाकिली होती. ही हकीकत तेथील अधिकारी यांना समजल्या बरोबर त्यांनीं त्याला तावडतोब मोठ्या कुशलतेनें पकडलें असून आता त्याच्यावर खटलाही चालला आहे. दी. बं.

इंफ्लुएंझा—कलकत्यास हा ताप फारच पसरला असून लोक फार जाया होत आहेत.

चमत्कारिक रीतीनें नाहींसे झाले—अलीपुरचे डि. माजि० मि० कालिन्स ह्यानीं मिदनापूरचे राजे मालित मोहनराय हे एकाएकीं नाहींसे झाले, त्या संबंधानें बारीक रीतीनें चौकशी चालविली आहे. राजा मालित मोहनराय हे ता. २७ डिसेंबर रोजीं एका देशी बोटींत बसून निघाले होते व टाकी व भांगोर ह्यांचे दरम्यान नाहींसें झाले. असा शोध लागल्यावरून सदरहू बोटींतील लोक पकडले आहेत चौकशी सुरू आहे.

जगाची वैद्य परिषद—जगावरील सर्व वैद्यशास्त्रज्ञाची एक जंगी परिषद येत्या आगष्ट महिन्यांत मास्को येथें भरणार आहे.

अमेरिकेस मदत— आयरिस लोकांनीं एक जाहिरनामा काढून युनायटडस्टेट्स सरकारास असें कळविलें आहे कीं जर इंग्लंड बरोबर अमेरिकेची लढाई सुरू होईल तर आपण २ लक्ष सैन्य तुह्मांस पुरवूं. वाहवा रे इंग्लिशांचें स्वाध्यय!

महाराणी सरकाराचे कलोनियल सेक्रेटरी मि० चेंबरलेन हे आपल्या भाषणांत ह्मणाले कीं, "अलीकडे इंग्लंड एकटें झालें आहे. त्यास कोणाचा आधार नाहींसा झाला आहे. आणखी ज्या ठिकाणाहून त्याला साह्य मिळण्याची खातरी होती, तिकडून अविश्वास आणि कधीं कधीं द्वेषही भासूं लागला आहे." त्याप्रमाणेंच फ्रेडरिक हारिसन ह्मणाले कीं, आमच्या इंग्लंडास सध्या कोणी मित्र नाहीं, पहावें तिकडे त्याविषयीं मत्सर आणि द्वेष हीं स्पष्ट दिसून येतात. आणखी असें होण्याचें कारण ह्यांनीं असें सांगितलें कीं, इंग्लिश लोकांचा फाजीलपणा हें जाहे. होय हेंच एक मुख्य कारण असलें पाहिजे. मनुष्यास मित्र किंवा साह्यकर्ते मिळत नाहींत, ह्यांत लोकांचा दोष नसतो, तर, त्या मनुष्यांचा असतो. हाच प्रकार राष्ट्रास लागू आहे. इतर वसाहतींची आणि उपराज्यांची गोष्ट आह्मांस तितकीं ठाऊक नाहीं परंतु स्वानुभवावरून आह्मी असें सांगतों कीं हिंदुस्थानच्या लोकांत देखील इंग्लिश राज्याविषयीं जशी निष्ठा आणि भक्ति पूर्वीं होती तशी आतां राहिली नाहीं, राज्यपद्धतीविषयीं लोक फार कुरकुरूं लागले आहेत परवां कापडाच्या जकातीचा कायदा पसंत झाला, अशा प्रकारच्या कायद्यांना लोकांच्या मनांतल्या अनिष्टेस भर पडते. पण हें आमचें सरकार पहात नाहीं. अथवा पहात असून त्याविषयीं त्यास परवा व भय वाटत नाहीं, कांहीं असलें तरी परिणाम एकच आहे, विचार करण्यासारखीं गोष्ट आहे.

अमेरिकेंतल्या स्वतंत्र संस्थानाचें आणि इंग्लंडाचें जर कधीं वैमनस्य येऊन लढाई चालू झाली, तर, ती इंग्लंडास फार जड जाईल. अशा वेळेस ऐयरिश लोक स्वस्थ रहावयाचे नाहींत. ते इंग्लंडाला त्रास देऊं लागतील. शिवाय, इंग्लंडाच्या इतर उपराज्यांत अगदीं स्वस्थता राहीलच, असें सांगतां येत नाहीं. कां कीं, त्यांना त्यांच्या विषयींची बुद्धि असावी तशी नाहीं. आणखी इंग्लिश लोकांनीं राज्यें मिळविलीं आहेत, तीं पापानें मिळविलीं आहेत, असा समज लोकांत आहे तेव्हां पापसंपादित राज्यापासून फार दिवस सुख व्हावयाचें नाहीं, असें लोकांस वाटतें. इं० प्र०

१८९५ पात्यांचा चाकू— शेफील्डच्या एका कंपनीपाशीं एक चाकू आहे. त्याला १८९५ पातीं आहेत व प्रत्येक ५ वर्षांनीं त्यांस ५ पातीं नवीं जोडतात.

जगांत मोठी पेन्सिल— जगांत मोठी शिसपेन ग्ल्याडस्टन साहेबांजवळ आहे. तिची लांबी ३९ इंच आहे. तिचा वेळीं हातात धरण्याकडे ही ते उपयोग करितात.

कागदाचे दांत लुबक येथें करूं लागल्यास आज बरेच दिवस झाले.

रशियन सरकार आपल्या सैन्याला फ्रेंच हत्यारें देणार.

जर्मन सरकारनें आपलें आरमार लवकर वाढवावें अशाबद्दल कोलेनियन पक्षाची फार खटपट चालली आहे.

गेल्या २० वर्षांत जगांत ४ लक्ष मैल रेलवे तयार करण्यांत आली. सु. प.

---

## नोटीस

नोटीस बेसमी सखाराम व सूर्यभान व सिवराम वल्लद लक्ष्मणजी व चंद्रभान व चिमण्या वल्लद नारायण सर्व जात माळी राहणार वाभळी तालुके दर्यापूर यास खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येतें कीं तुमचे येथें तुमचे येथें माझे खाते आहे ते लक्ष्मणजी व नारायणजी जिवंत असले वेळीं पासून आहे ते मयत झाले असून त्याचे वारस तुह्मी असल्यामुळें तुह्मी एकत्र असतांच रुपये १५०३ बद्दल वहिवर सही करून दिल्ही नंतर चारशे रुपये मी चिमणाजी यास दिल्हे. बाकी रुपये ११०३ देणें असलेले मजला कबूल आहेत तर ते रुपये घेऊन सर्वांनीं आपल्या सह्या करून मजला रशीद द्यावी तसे जर करणार नाहीं तर पुढें फिर्याद वगैरे केल्यास खर्चाचा जबाबदार मी होणार नाहीं ता. ७-२-९६ इसवी.

[ सही ]

आकाजी वा पैकाजी खेडेकर जात कुणबी राहणार बाभळी तालुके दर्यापूर दस्तुर खुद्द.

---

## नोटीस

रा० रा० गोविंदराव चिमणाजी पांडे राहणार मोखे तालुके बाळापूर यांस नोटीस देणार लक्ष्मणसिंग वल्लद गिरधारीसिंग रहाणार शेंगांव. नोटिशीनें असें कळविले जाते कीं तुह्मांकडेस आमचे रुपये येणें याजबद्दल तुह्मी खांदे करून दिले आहेत. त्या खांद्या पैकीं दोन खांद्याचे रुपये (१००) शंभर तुह्मी ही नोटीस पावले दिवसांपासून आठ दिवसांत आणून द्यावेत आणि पावती घ्यावी. असें झालें नाहीं तर आपणावर फिर्याद करून सर्व रुपये कोर्ट खर्चां सुद्धां वसूल केले जातील ह्मणून दिली नोटीस सही तारीख ११ माहे फेब्रुवारी सन १८९६ इसवी.

( सही )

लक्ष्मणसिंग वल्लद गिरधारीसिंग राहणार शेगांव दस्तुर खुद्द.

---

☞ हे पत्र अकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.

सालअखेर „ ७ „१ ८
किरकोळ अंकास .... .... .... ६४

नोटिशी बद्दल.
१० ओळींचे आंत रु० १
दर ओळीस .... ०।८६
दुसरे खेपेस .... .... ०।१

Annual in arrears 7 „ 1 Rs.
Six monthly ... ... ... 3 „ 8
Single copy ... ... ... ... ... 4 as.

Advertisment.
Below 10 lines ... 2 Rs.
Per line over 10 ... 4 as.
Repetition Per line ...

# वऱ्हाडसमाचार.

THE BERAR SAMACHAR

VOL XXX — AKOLA MONDAY 24 FEBRUARV 1896 — NO 8

वर्ष ३० — आकोला सोमवार तारीख २४ माहे फेब्रुवारी सन १८९६ इ० — अंक ८

## घड्याळ

किंमत रुपये ६ हमी ३ वर्षांची

अति स्वस्त, दिसण्यांत सुंदर, मजबुत आणि भक्कम ह्या फोटोप्रमाणें वॉच घ्या. ६०० वर खपलीं. १२ घड्याळें एकदम घेणारास १ घड्याळ फुकट मिळेल.




आम्ही स्विटझरलंडमध्यें हीं घड्याळें मुद्दाम करविलीं आहेत. यावर आमचें नांव आहे. हें घड्याळ रेलवे रेग्युलेटरचें असून याचे कांटे रासकोप प्रमाणें असून सेकंडकाटा आहे. मागील बाजूस झांकण असून आंत कांच आहे. चावी देण्यास मोगरा आहे. डायल ( लेटी ) चीनईच्या असून रंगीबेरंगी आहेत. आंकडे ठळक, बिलोरी कांच असून यांत ६ जीवेल ( ह्मणजे चक्रांचे खालीं वर हिरे बसविले आहेत. ) ज्या घड्याळास रुबी जुवेल असतील त्यांची किंमत ज्यास्त व तेंच पुष्कळ दिवस चालण्यात व टिकण्यांत अधिक असतें. तुह्मी दुसरीं घड्याळें वापरलीं व वापरतां त्यांत आमचें एक वापरून पहाण्याची जो उमेद बाळगील त्यास १०।११ वर्षांत दुसरें घड्याळ घेण्याची जरूर लागणार नाहीं. कांच कमान आणि पेटी व ३ वर्षांची ग्यारंटी घड्याळा सोबत मिळेल. व्ही. पी. नेही घड्याळ पाठवूं.

टीपः— " गिऱ्हाइकांस घड्याळावर आपलें नांव घालणें असल्यास उत्तम इंग्रजींत घातलें जाईल. प्रत्येक अक्षरास चार्ज अर्धा आणा पडेल. "

गोविंद महादेव पोळ.
१२-२४ वॉचमेकर आणि रिपेरर नासिक

## जाहिरात

वऱ्हाड हायस्कूल माजी विद्यार्थी समाजाचा यंदाचा समारंभ अकोलें येथें तारीख २८ व २९ फेब्रुवारी सन १८९६ [ शुक्रवार व शनिवार ] रोजीं होणार आहे. समाजाचे वेळीं मेंबरांनीं अगत्य येण्याची कृपा करावी. समाजा पैकीं कांहीं मेंबरांचीं नांवें आह्मांस ठाऊक नसल्यामुळें त्यांस आमचे कडून निमंत्रण चिठ्या गेल्या नाहींत तरी त्यांणीं हेंच निमंत्रण समजून वर्गणीं होतां होईल तितकी लवकर पाठवावी. वर्गणीचे दर नेहमी प्रमाणें १ रु० २ रु० व रु० ५ आहेत कळावें.

अकोलें ता० ९।२।९६ { दत्तात्रय कृष्ण कोल्हटकर, लक्ष्मण गोविंद ओक, सेक्रेटरी.

## जाहिरात.

सर्व लोकांस कळविण्यांत येते कीं आठवडे बाजारचा कर वसूल करण्याचा, कमेटीचे हद्दींतील कचरा वाहून नेण्याचा, स्लाटर हाऊसचा कर वसूल करण्याचा, व स्टेशन धर्म शाळेचा कर वसूल करण्याचा सन. १८९६।९७ सालचे हक्कांचा लिलांव ता० १९ माहे मार्च सन १८९६ इसवी रोजीं सकाळीं ७॥ वाजतां टाऊनहालांत केला जाणार आहे ज्यांस घेण्याची इच्छा असेल त्यांनीं सदहू तारखेस सदहू वेळीं टौनहालांत हजर राहावें. कळावे तारीख १८।२।९६ इसवी.

B. M. Sate
Secretary
Akola Municipal Committee

मुक्काम उमरावती ता. १८।२।९६

रा. रा. वऱ्हाड समाचारकर्ते यांस

वि वि. खालील चार ओळीस जागा द्याल अशी आशा आहे-

येथील पोलीस खात्यांतील कांहीं प्रमुख मंडळीच्या मनांतून येथें एक क्लब स्थापन करावयाचें घाटत आहे असें ऐकतों. पोलीस खात्यांतील नौकरांशिवाय इतरांस क्लबांत सामील होण्याची परवानगी नसावी असें मला वाटतें. स्टेशनाजवळ पूर्वेकडील खुल्या जागेंत जागा मागून तेथें आपसांत वर्गणी करून जमलेल्या पैशानें एक शानदार इमारत उभारावी अशी कांहीं प्रमुख आफिसरांची खटपट चालू आहे, ही खटपट गेल्या चार पांच महिन्यापासून चालू असल्याचें समजतें कोणी ह्मणतात कीं स्टेशनाच्या पश्चिमेकडे जागा मागावी व कित्येकांच्या मनांत पूर्वेसच मागावी असें येतें. व कांहींना छावणींत रिझर्व जवळची जागा पसंत आहे. तथापि अझून कांहींच ठरलें नाहीं. वर्गणी किती जमली व किती जमेल हें ही समजलें नाहीं. ही दिरंगाई होण्याचें कारण लहानसान मंडळीचा निरुत्साह व पैशा संबंधी कुरकुर हीं असावें. त्यांत वरील दर्जाच्या मंडळीला सर्वच जोखीम आपल्या आंगावर पडण्याची भीति पडून होतां होईल तों एक जुटीनें सर्वांची या कृत्यास यथाशक्ति मदत मिळून कोणालाच फारशी घस पडूं नये असें होण्याचा संभव कमी आहे असें वाटत असावें. ह्मणून ह्या कामांत हात घालण्यास कोणी एकदम पुढें होत नाहींत असें वाटतें, तरी कोणी तरी पुढार घेतल्या शिवाय प्रसंग विशेषीं थोडी जास्त घस सोसावी लागल्यास ती सोसण्यास तयार झाल्याशिवाय आणि मेहनतीनें इतर मंडळीच्या मनांत उत्साह व निरालस्य जागृत केल्याशिवाय काम तडीस जावयाचें नाहीं. आह्मा लोकांचा असा स्वभावच पडून गेला आहे कीं लांब लांब गोष्टी करून व मोठा आव घालून शेवटीं डोंगर पोखरून उंदीर सुद्धां काढणें होत नाहीं.

वास्तविक अशी संस्था येथें असणें जरूर आहे. त्या संस्थेचा उद्देश काय असल तो ईश्वर जाणें. पण मी समजतों तसा जर असेल तर अशा प्रकारची संस्था उमरावतीसच काय पण प्रत्येक जिल्ह्याच्या गांवीं स्थापन व्हावी असें कोणालाहि वाटल्याशिवाय राहणार नाहीं. ज्या अर्थीं ह्या क्लबाशीं इतर मंडळीचा संबंध असावयाचा नाहीं त्याअर्थीं प्रत्यक्ष जरी नाहीं तरी अप्रत्यक्ष रीतीनें आपल्या खात्यासंबधांनें निरनिराळ्या कामा संबंधानें चर्चा होऊन त्यांनीं आपलें कर्तव्य स्वल्प रीतीनें बदलाम न होतां, लोकांना त्रासदायक न होतां आणि वरिष्ठ अंमलदाराची इतराजी न होतां कसें करितां येईल ह्या गोष्टीचा विचार करण्याला चांगली संधी मिळेल. जिकडे पहावें तिकडे लोकांच्या मनांत पोलिसां विषयीं वाईट ग्रह झाला आहे असें दिसतें. पोलीस खात्यांतील लोक ह्मणजे यमदूत असें लोक समजतात. वास्तविक पोलिस खातें स्थापन करण्यांत सरकारचा उद्देश हा आहे कीं आपल्या गरीब सन्मार्गानें चालणाऱ्या, कायद्याला भिऊन वागणाऱ्या व दुसऱ्याचें अन्यायानें नुकसान न करितां स्वकष्टार्जित भाकरी खाणाऱ्या प्रजेस डाकू, चोर, फैली इत्यादि दुष्ट लोकांचा उपद्रव न होतां देशांत स्वस्थता चिरकाल रहावी आणि ह्मणून अशा लोकांना शिक्षा होण्याकरितां न्यायाधिशापुढें हजर करावें, खऱ्या गुन्हेगारांस शिक्षा मिळाल्याशिवाय राहत नाहीं असें सर्वांच्या प्रत्ययास आणून अनीतिपथ क्रमूं इच्छिणाराचे मनावर इतकी दहशत बसवावी कीं त्याचें पाऊल चटदिशीं सन्मार्गी वळावें हीं कामें दयाळू सरकारानें पोलीस खात्याकडे सोंपविलीं आहेत. सारांश पोलीस खातें हें प्रजेचें स्वास्थ्य, धन आणि सुख ह्यांचें रक्षक आहे. असें असतां लोकांनीं त्या खात्यांतील लोकांच्या नांवानें खडे कां फोडावें! पोलीस खात्यांतील कित्येक मंडळी कबूल करतील कीं दुसरीकडे नौकरी मिळत नसल्यास किंवा व्यापार, शेती वगैरे कामें होत नसल्यास त्या खात्यांत नौकरी पत्करावी खालच्या दर्जाची मंडळी तर साफ ह्मणते कीं मोलमजुरी करून शरीर जाळण्यापेक्षां ह्या खात्यांत यावें ह्मणजे एकंदरींत पोलीस खात्याचें कर्तव्यकर्म किती जबाबदारीचें आणि स्तुत्य आहे हें ह्या मंडळीस कळत नाहीं असें मानण्यास कांहीं हरकत नाहीं. मग हाताखालील कांहीं लोक कर्तव्य परान्मुख झाले तर वरिष्ठांना आपलें काम जड पडतें. अशा स्थितींत सर्वच लोकांच्या दुषणाच्या तडाख्यांत सांपडतात. संबंध योगें एक करितो आणि त्याचें फळ दुसऱ्यांनाहि भोगावें लागतें.

यावरून दिसून येईल कीं पोलीसची नौकरी किती नाजुक आणि जबाबदारीची आहे ती. हें खातें स्थापन करण्यांत सरकारचा उद्देश, वरिष्ठ अंमलदाराशीं त्यांची मर्जी राखून वर्तन ठेवणें व लोकांचा पोलीस खात्याविषयीं झालेला वाईट ग्रह काढून टाकण्या करितां झटणें ह्या गोष्टी मनांत बाळगून नौकरी करणें ह्मणजे सोपें काम नाहीं. ह्या गोष्टी लक्ष्यांत ठेवून चालणाऱ्यांना आपली नौकरी सांभाळणें किती जड जात असेल बरें अशा तोडीचीं माणसें ह्या खात्यांत थोडीं असलीं ह्मणजे त्यांची जी दशा होते तिचें अनुमान करितां येत नाहीं. जाति बहिष्कृत झालेल्यानांच मात्र असलें दुःख समजतें. असो.

वरील तिन्ही तत्वें आमच्या पोलीस खात्याचे मंडळींचे मनांत जागृत राहण्याकरितां अशा प्रकारच्या संस्था कांहीं अंशीं तरी कारणीभूत होतील. कारण वेळोवेळीं लहानापासून तों मोठ्यापर्यंत सर्वांना परस्पर सहवासाचा लाभ घडून जे आजिवर लोक लोकांच्या प्रीतीस पात्र झाले आहेत व सरकारची नौकरी इमानानें व दक्षतेनें बजावून वरिष्ठांना प्रीय झाले आहेत अशाच्या वर्तनक्रमाचें निरिक्षण करण्याची सर्वांनीं चांगली संधि मिळेल. व त्यांचे मनांत अशा लोकांचा कित्ता गिरविण्याची बुद्धि ही उत्पन्न होईल. बिकट व निकडीच्या प्रसंगीं कसें काय करावें, अत्यंत भयंकर गुन्हेगाराशीं गांठ पडली असतां किती हुशारी ठेवावी लागते व कसकशी कारवाई करावी लागते इत्यादि गोष्टीसंबंधानें आपसांत चर्चा होऊन अनभ्यस्त व अनुभवरहित लोकांना अशा प्रसंगीं वापरले या व कसास उतरलेल्यांचा अनुभव मिळून त्यांचें अनुकरण करण्याची स्फूर्ति उत्पन्न होईल येणेंप्रमाणें अनेक उपायामानें सर्वांची सुधारणा होऊन त्यांच्यांत एकी व प्रेमभाव हीं वाढतील.

सारांश असें क्लब असणें हें सर्व प्रकारे इष्ट आहे. मात्र तें सुरळीत चालविलें पाहिजे. आमच्यामध्यें सभा व क्लबें-विश्रांती गृहें स्थापन होण्याची मारामार पण ती पुष्कळ दिवस टिकण्याचा संभव फार कमी. पुष्कळ ठिकाणीं असाच प्रकार घडून आला आहे. अर्थातच अशा सभांच्या व क्लबांच्या मंडळीचें जगांत हसें होतें. ती फजिती सहन करण्यापेक्षां काय करायाचें तें आरंभीं चांगला विचार करून करावें. आपल्या बलाबलाचा विचार होऊन आपणाला इतरांकडून सहाय आणि उत्तेजन किती मिळेल

pur

ह्या गोष्टीकडे पुढारी मंडळींनें लक्ष दिलें पाहिजे. प्रसंगीं थोडी जास्त घस सोसावी लागल्यास ती सोसण्यास तयार असलें पाहिजे कित्येकांना जास्त मेहनत घ्यावी लागेल व इतकें ही करून आपण जें इच्छितों तें रंगारूपास न येतां मध्येंच वाहवलें तर त्याचें ही अपयश बहुतांशीं आपल्या माथीं बसेल हें ही त्यांनीं विसरूं नये.

अशा प्रकारचीं कामें हीं एकव्या दुकव्याला असाध्यच होत. दसकी चकडी एकका बोजा हें लक्षांत ठेवून छोटेखांनीं व उमेदवार मंडळींनें एका दिलानें शक्त्यनुसार पैशाची आणि अंग मेहनतीची ह्या कामीं मदत दिली तर ती फार महत्वाची होईल. चोहोंकडून चार हात लागल्या शिवाय कांहीं होणें नाहीं. ह्या गोष्टीची वाटावाट आज चार पांच महिन्यापासून होत आहे तरी अजून कशास कांहीं ठिकाण नाहीं असें लोकांना वाटून त्यांना आपणाला नांवें ठेवण्यास जागा मिळेल ही गोष्ट मनांत ठेऊन लहान मोठ्यानीं हें काम शेवटास नेण्या करितां सतत झटण्यास कंबर बांधिली पाहिजे ह्याचा आमची पोलीस खात्यांतील मंडळी योग्य विचार करतील असें समजून हा लेख पुरा करितों.

"आपला"
एक हितचिंतक

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध १० शके १८१७

बाबू पृथ्वीचंद्रराय यांनीं हिंदुस्थानच्या घोर दारिद्र्या संबंधानें एक उत्तम निबंध लिहिला आहे. त्यांतील महत्वाच्या गोष्टी परीक्षणाच्या निमित्तानें गेल्या 'इंडिया' च्या फेब्रवारीच्या अंकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. मूळ ग्रंथ सध्यां आह्माजवळ नाहीं तथापि त्यांत ज्या गोष्टींचें विवेचन केलें आहे त्या सर्वत्रांस ठाऊक असणें अगदीं अगत्याचें आहे ह्मणून आह्मी त्या गोष्टी खालीं नमूद करीत आहों. हिंदुस्थान देश दरिद्री आहे किंवा नाहीं याविषयीं सध्यां प्रश्नच राहिला नाहीं. ज्या कोणास या देशाची कांहीं माहिती आहे तो तत्काळ कबूल करितो कीं हा देश दरिद्री आहे. खरोखरच हें दारिद्र्य अति घोर आहे, दारिद्र्या खालीं लोकांचा चक्काचूर उडाला आहे, व त्याचा प्रसार वाढला आहे इतकेंच नाहीं तर अधिकाधिक वाढत चालला आहे. दारिद्र्याचा प्रश्न अद्याप सरकारनें प्रत्यक्षपणें लक्ष्यांत घेतला नाहीं आणि मि. राय लिहिण्याच्या आवेशांत ह्मणतात कीं राष्ट्रीय सभेचे ठराव देखील या प्रकरणांत अस्पष्ट व व्यर्थ आहेत. इंडियाच्या सांपत्तिक वैभवाला जे किडे लागले आहेत ते नाहींसे करण्याकडे कोणीच लक्ष्य पुरवीत नाहीं. सर्व राजकीय प्रश्ना मध्यें या दारिद्र्याचाच प्रश्न मुख्य आहे आणि याचा योग्य निकाल लागल्याखेरीज हा देश सुधारण्याची आशाच नको. बाबूराय यांनीं कांहीं नामी उपाय सूचविले आहेत पण त्यापेक्षांही जो रोग सांपत्तिक स्थितीचा लय करितो त्याची चिकित्सा या निबंधानें फार उत्तम केली आहे. अशीच चिकित्सा नामदार दादाभाई यांनीं पूर्वी पुस्तकरूपानें केली आहे. तें पुस्तक अगदीं सप्रमाण आहे आणि सर्वत्र त्याचा उपयोग करीत असतात.

हिंदुस्थान मुख्यत्वें करून शेतकऱ्यांचा देश आहे. बंगालचे माजी लेफटेनंट गव्हनर सर चार्लस इलियट हे देखील असे बोलले कीं आमच्या शेतकरी लोका पैकीं निम्या लोकांस उभ्या वर्षांत कधीं आपली भूक पूर्णपणें निमाली असें वाटत नाहीं; आणि निम्मी लोकसंख्या ह्मणजे पुरुष, बायका व मुलें मिळून दहा कोटीवर मनुष्यें होतात लोकांच्या दारिद्र्या संबंधानें मि० राय यांनीं पुष्कळ प्रमाणें व आधार दाखविले आहेत त्या पैकीं एक उतारा पुरें आहे. मद्रासचे शेती खात्याकडील अधिकारी मि० राबर्टसन लिहितात कीं पीकपाणी उत्तम आलें ह्मणजे त्या वर्षी शेतकऱ्या या कुटुंबांतील माणसें धरून त्याचें उत्पन्न सरासरीनें ३ पेन्स ह्मणजे ३ आणे रोजी पेक्षां अधिक पडत नाहीं. आणि हंगाम वाईट असला ह्मणजे त्या या कष्टदायक स्थितीला सीमाच नाहीं. अशा प्रकारें सगळ्या महिन्यांत शेतकऱ्याचें उत्पन्न ८ सिलींग ह्मणजे ६ रुपयाहून देखील कमी पडतें. विलायतेस एक मजूर किंवा गिरणींतील कामकरी रोज थोडा वेळ काम करून एका आठवड्यांत अधिक मजूरी कमावतो. आणि हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं इंडियांत पोटखर्च अगदीं थोडा लागतो तरी चांगल्या सुबत्तेच्या वेळीं दर माणशीं दर महिन्यास २॥. रुपया पेक्षां कांहीं कमी लागत नाहीं; व गेल्या खानेसुमारींत आढळलें कीं दर कुटुंबांत सरासरी ४।९ माणसें पडतात तेव्हां इतक्या माणसांचा पोट खर्च व रोजनदारीचें वेतन यांची तोंडमिळवणी कशी होते हें कळणें कूट प्रश्ना प्रमाणें कठीण व गूढ आहे. पण निसंशय हा मेळ बसतच नाहीं. आणि विश्वसनीय आधारावरून असें निघतें कीं ४ कोटी प्रजा सदासर्वकाळ कडकडीत उपासमारींत दिवस कंठीत असतात. या वर्णनांत पुष्कळ गोष्टी बाध धरिल्या तथापि हें निर्विवाद आहे कीं पुष्कळ लोकांची स्थिती अंतःकरण फाटण्या इतकी वाईट आहे. लोकांस खाण्याला पोटभर जेथें मिळत नाहीं तेथें आजारा सारख्या आपदा दत्त ह्मणून उभ्याच असतात.

दारिद्र्याचीं कारणें शोधतांना मि० राय यांनीं अनेक कारणांचा विचार केला आहे. इंडियाची लोकसंख्या अती वाढली आहे असें कांहींजण कारण दाखवितात. पण फ्रान्स देशापेक्षां या देशीं लोकवस्ती सरासरीनें एका चौरस मैलाला अधिक दाट आहे तथापि जर्मनी, इटली व चीन या देशांतील लोकवस्ती पेक्षां इकडे अधिक पातळ आहे; आणि इंग्लंड व बेलजम या देशांच्या मानानें इकडे निम्मी लोकवस्ती आढळते. या देशांत सरासरीनें लोकवस्तीनें प्रमाण फार दाटीचें पडत नाहीं तथापि कित्येक प्रांतीं वस्ती अती दाट आहे आणि लोक घरेंदारें सोडून इतर पातळ वस्ती या स्थळीं जाऊं इच्छित नाहींत व त्यामुळें वाढत्या लोकसंख्येच्या कारणाचा प्रतिकार होऊं शकत नाहीं. दुसरें कारण असें कीं इंडियांतील धान्य परद्वीपीं अतोनात जाऊं लागलें त्यामुळें महर्गता फार झाली आणि महर्गतेच्या मानानें लोकांच्या वेतनाचे दर कांहीं वाढले नाहींत. तिसरें कारण जमिनीचा सारा मोठा, आहे आणि पीकपाण्याच्या वाईटपणा मुळें त्यांत कांहीं सूट वगैरे मिळत नाहीं. इतकेंच नाहीं तर सरकारचा वारंवार सारा वाढविण्याची पद्धत लोकांस फार पीडाकारक आली आहे मद्रास इलाख्यामध्यें तर असें आढळतें कीं दरसाल सारा योग्य वेळीं न पोच ल्यामुळें सुमारें ३३॥ लक्ष लोकांची घरेंदारें विकलीं जाऊन सारा वसूल करण्यांत आला डाक्टर वाकर ह्मणतात कीं या देशच्या शेतकऱ्यांमध्यें हीय्या नाहीं. त्यांचे खर्च उधळपणाचे असतात असें कांहींजण ह्मणतात. भलताच दानधर्म, एकत्र कुटुम्बांत राहण्याची रीत, व्यसनाधीनता, भांडखोरपणा, महापूर, दुष्काळ, टोळधाड. इत्यादि दुसरीं अनेक कारणें दाखविण्यांत येतात. मि राय ह्मणतात कीं कांहीं ही ह्मटलें तरी या देशाचें दारिद्र्य ब्रिटिश राज्य.खालीं फार वाढलें आहे.

दारिद्र्य दूर करण्यासाठीं मि० राय यांनीं कांहीं चांगले उपाय सूचविले आहेत. हे उपाय येणें प्रमाणें.

( १ ) जमिनीचा धारा सर्वत्र कायमचा ठरवा आणि शेती नफ्यानें लाऊन काढणारे लोक जमिनीचे मालक जितके कमी असतील तितकें चांगलें.

( २ ) आयर्लंडांत जसे शेतकऱ्यांस कांहीं हक्क दिले आहेत तसे हक्क इकडच्या लोकांस देऊन त्यांची स्थिती सुधारा.

( ३ ) शेतकऱ्यासाठीं गांवोंगांव पेढ्या निघाल्या पाहिजेत.

( ४ ) ज्या प्रांतीं शेतकरी फार आहेत त्या प्रांतांतून लोकांस हालवून या देशच्या अफाट राज्यांत त्यांच्या निराळ्या वसाहती स्थापा आणि लोकसंख्या अतोनात न वाढेल तर फार बरें.

( ५ ) शेतकी विषयींची विद्या लोकांस शिकवा, आणि कालवे वगैरे बांध याचीं कामें सरकारनें चालू करावीं.

( ६ ) इंग्लंडा प्रमाणें या देशीं गरिबांचा कायदा निराळा करा आणि पंचाईतीची पद्धत चालू करा.

( ७ ) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर लोकांवर बसले आहेत त्यापैकी कांहीं कमी करा व कांहीं समतोल सारखे बसवा.

या उपायामध्यें पुष्कळ गोष्टी विचार करण्या सारख्या आहेत आणि कित्येक वादग्रस्त आहेत. इंडियाच्या दारिद्र्याच्या प्रश्नाचा खल वारंवार जितका होईल तितका ब्रिटिश राज्यास व रयतेस परिणामीं सुखावह होणार आहे.

✓ इंडियाचें राज्य इंडियाचे लोकासाठींच आहे आणि त्यांत इंग्लंडाच्या लोकांचा प्रत्यक्ष संबंध नाहीं अशीं विधानें मुत्सदी लोकांच्या तोंडून ऐकण्यांत आलीं आहेत. या विधानावरून इंग्लिशांच्या उदारपणाचें मोठें आश्चर्य वाटे आणि या देशास ब्रिटिश राज्यरूपी परिसच लाभला आहे असा खोटा समज लोकांचा होऊन जात असे परंतु निदर्शनास गोष्टी फार वाईट येतात आणि त्या आमच्या राज्यकर्त्यांचा खरा लोभी स्वभाव, बनियेशाही, व आपमतलबीपणा या विषयीची उत्तम साक्ष देतात. नामदार मेथा यांनीं गुदस्तां पोलिस बिलाच्या वेळीं कायदे-कौन्सिलदारांस त्या बिलाच्या अनर्थकारक परिणामा विषयीं बोध केला तेव्हां स्टेट सेक्रेटरीचा हुकूम असाच आहे ह्मणून तें बिल पसार करण्यांत आलें. स्टेट सेक्रेटरीचा हा विचित्रच हक्क त्या प्रसंगीं कायदे-कौंसिलांत प्रतिपादण्यांत आला. गेल्या जकातीच्या बिलाच्या वेळीं नामदार वेस्टलांड यांनीं इंडियाचें राज्य कोणासाठीं आहे या प्रश्नाचा नामी खुलासा केला. म्यांचेस्टरवाल्या इंग्लिश लोकांची विशेष काळजी वां घेतली पाहिजे हें स्पष्टपणें कळवितांना नामदार वेस्टलांड बोलले कीं:— "अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थाना प्रमाणें इंडियाचें सरकार स्वतंत्र आहे असें ह्मणणें निरर्थक आहे. स्वतंत्र राज्य असलें ह्मणजे त्यांतील प्रजेच्या कल्याणाहून इतर गोष्टी तुच्छ करिता येतील आणि असेंच करणें खरें कर्तव्य होय. इतर राष्ट्राच्या कल्याणाचा विचार एवढाच करावयाचा कीं त्या योगें स्वदेशास तत्संबंधानें फायदा झाला पाहिजे. आपल्या जमाबंदीचे व व्यापाराचे कायदे इतर राष्ट्रांला अहितावह झाले तथापि स्वतंत्र सरकारला त्या गोष्टीचा कांहीं विचार कर्तव्य नाहीं. हें अहित आपल्या राष्ट्रास अहितप्रद होणार नाहीं अशी खबरदारी घेतली ह्मणजे पुरें आहे. पण इंडियाची गोष्ट निराळी आहे. एका मोठ्या राज्याचा हा देश एक घटकावयव आहे. या राज्याच्या घटकावयांचा परस्पर संबंध असंख्यात प्रकारांचा आहे. तेव्हां विलायतचा जो मोठा उद्योग व व्यापार त्याला धक्का पोंचेल अशा रितीनें इंडियाचा राज्यकारभार चालवूं नये हें उघड उघड आहे. इंडियाच्या उद्योगाची होती होत असली तर इंडियाच्या वतीनें भांडण्याचें आमचें काम आहे; पण तेव्हां देखील अखेर निकाल कांहीं आमच्या हातांत नाहीं इंडियाच्या चतुःसीमेच्या पलिकडील गोष्टी विषयीं आह्मी डोळे झांकावे हें आमचें कर्तव्य आहे किंवा कर्तव्यान्तर्गत आहे असें जर कोणी प्रतिपादन करितील तर तें अगदीं अप्रमाण आहे असें आह्मी मानतों."

नामदार वेस्टलांड यांनीं ब्रिटिश राज्याच्या घटकावयवांत या देशास गणिलें आहे आणि या देशानें आपल्या बरोबरीच्या इतर घटक वयवासाठीं तोशीस सोसली पाहिजे असा प्रौढ विचार प्रगट केला आहे. पण प्रश्न एवढाच कीं इंडिया साठीं इतर घटकावयवांनीं काडीमात्र तरी घस लावून घेतली आहे काय? खरा प्रकार असा दिसतो कीं इंडियाच्या ऱ्हासावर इतर घटकावयवांची इमारत उभारली आहे.

आकोल्यास पाण्याचा पुरवठाः—

यंदा सर्व प्रांतभर बरसात कमी झाल्यामुळें उन्हाळ्यांत पाण्याची फार अडचण होईल ह्मणून सर्वत्र ठिकाणीं ह्या संबंधानें विचार होत आहे. आकोले येथें ९ लाख रुपये खर्च करून कापशी येथून ११ मैला-

वरून विहिरीचें पाणी नळानें आणलें आहे परंतु विहिरीतील पाणी पुष्कळ खोल गेलें असल्यामुळें तें पंप करून नळांत सोडलें पाहिजे. या कामाकरितां रक्कम रुपये ४००० खर्च लागेल तो येथील मुनासिपालटीनें देण्याचें कबूल केलें आहे. इतकें करून पाणी पुरेल किंवा नाहीं या बद्दल शंका आहेच म्हणून मोर्णा नदीचें पाण्याचा पिण्याकडेस उपयोग करावा म्हणून विचार चालू आहे परंतु त्या पाण्यापासून भयंकर रोग उद्भवण्याचा संभव आहे असें येथील सिव्हिल सर्जन डाक्टर रेऊ यांचें म्हणणें आहे तथापि सदर्हू पाण्याच्या दोन बाटल्या भरून तें मुंबई येथें केमिकल आनालायझर यांजकडेस परिक्षेकरितां पाठविलें आहे पाणी पसंत झाल्यास नदींतून नळ लावून त्या नळानें पाणी शहरास पुरविण्यांत येईल. एकंदरींत पांच लाख रुपयांचा फन्ना उडून शेवटीं या प्रमाणें पाण्याची हाकाटी व्हावी हें फार आश्चर्यकारक आहे!

———०:०———

“वऱ्हाड हायस्कूल माजि विद्यार्थी समाज”

आमचे पत्रांतील जाहिराती प्रमाणें यंदाचा हा समाज येथें ता २८ व २९ शुक्रवार शनिवार ह्या रोजी भरणार आहे रेलवेचे कनसेशन मागावे याचा यंदा पुष्कळ कारणाकरितां विचार नाहीं. समाजाचे उमरावतीकर मेंबर हे शुक्रवार रात्रीं “झुंझारराव” ह्या नाटकाचा प्रयोग करून दाखवितील सामाजिक विषयावर मि. मोरो विश्वनाथ जोशी बी. ए. बी. एल ह्यांचें उत्तम व्याख्यान होईल. मित्र मंडळीचे करमणुकी करिता गायन कलानिपुण प्रोफेसर बाळकृष्ण बोवा मिरजकर यांचें सुस्वर गायन होईल. व्यायामाचे खेळाची उत्तम व्यवस्था करण्यांत येणार आहे. क्रिकेट, वगैरे इंग्रजी तऱ्हेचे पत्याचे खेळ होतील व ज्यांस हे खेळ माहात नसतील त्यांचे करितां मुद्दाम सूचना पत्रकाची व त्या प्रमाणें खेळ शिकविण्याची व्यवस्था करण्यांत येईल. असल्या समजापासून मित्र मंडळीचे प्रेमभाव वाढविण्याची व दोन दिवस आराम घेण्याची ही उत्तम संधी आहे. तसेच विद्वान मंडळीच्या गांठी पडून त्यांच्याशीं दळणवळण ठेवण्यानें व त्यांचे आचार विचार कळून पुष्कळ फायदा हो याचा संभव आहे.

---

## The Berar Samachar

MONDAY FEBRUARY 24, 1896

We learn on a reliable authority that the ill report about the management of the Amraoti District Board is altogether unfounded. The vague misgivings and forebodings about the future prospects of a practical form of Local Self—Government are entirely creations of an imaginative and inventive mind working upon some crude stuff gathered here and there. Our contemporary of the Vaidarbh has within his knowledge a good deal of matter which he cannot inwardly digest and formulate in a sympathetic and acceptable manner. The system of Local Boards has worked well with a certain degree of success in this province. It seems that the climate and soil of this province is not unsuitable to the plant introduced under the benign vice—royalty of Lord Ripon. Like other institutions under the direct control of the government the Boards may have some special defects but on that ground they are not less thriving in this province. We can refer with pride to the nice work which the Akola District Board turns out from year to year under the Vice—Chairmanship of Mr. Dattatraya Vishnu Bhagwat an ornament of the leading citizens of Akola. We have commenced an inquiry about the Amraoti District Board and we hope we shall be able to give our readers a fair idea of the true state of things Our learned editor of the Vaidarbha has painted too black a picture and affirms with a moral certainty that he is justified in doing so. However we are glad to say that he is misinformed and that there are not such circum—stances as will warrant the higher authorities to deal a deadly blow to the system of District Boards. We shall ask our readers to suspend their judgment in this connection and to remain in hope that they will have to learn a good many pleasant things hereafter.

———

It is an *official* secret as to why a *burra* Conference is being held at Akola. Sir Edward Buck comes as the *trusted* prophet of somethin[g] good to the ryots in general. He will hold his consultations with the chief officers in Berar; but it is a wonder why the people in whose interests the whole task is imposed are taken not into confidence. The whole affair appears as a mystic mission of an omniscient government.

———

Rao Sahib S. V. Patwardhan, under cover of a strict discipline in matters of school—management is working rather over-anxiously. His administration, such as appears just now, seems to go ahead of the existing conditions of educa—tional machinery at work in Berars. Evidently therefore he is, we are afraid, likely to lose popular esteem if he does not take care to adapt his schemes to the present state of things. It is no wonder therefore that teachers should find their position most precarious. Though letters are pouring forth from various quarters anent the present educational administration we purposely refrain from giving publicity to them considering that they would be of no use when our Director would catch this hour and take advice to give a smooth course to his carreer.

———

The history of the Cotton Duties Act will remind us of a painful position we hold in the esteem of our rulers. Public opinion has no value in their eyes and it is sheer injustice with which the bill passed into law. Further the reduction in import duty from 5 to 3 and a half per cent is a stigma under the deplorable state of finances. The Hon'ble Babu Mohiny Roy thus advertises to it with a feeling of dismay:— “The import duty on cotton goods happens to have a past history which augers no good of its future. The duty was fixed at 10 per cent. *ad valorem* by Act VII of 1859. It continued at that rate till 1875 when, by Act XVI of 1875, it was reduced to 7 and a half per cent. Then in 1882 it was abolished altogether by Act XI of that year. Of these two Acts, the one of 1875, which was passed during Lord Lytton's Vice-royalty, was 'the beginning of the end' and the other Act XI of 1882, passed during the administration of Lord Ripon, was 'the end' itself of the import custom-revenue. The repeal was made amidst a flourish of trumpets. Our finances were represented to be in a very prosperous condition and able to bear the sacrifice of about a million and-a-half of revenue. There was a great deal of tall talk about the import duty pressing upon poor people and invocation of the principles of free trade. Disillusion came soon enough. The income-tax had to be re-imposed, the salt-tax considerably increased, and a petroleum-duty imposed; and yet the Government did not find it possible to make two ends meet. Deficit continued to be the normal condition of the finances of India until we re-imposed last year an import-duty of 5 per cent. upon cotton goods. Then, owing to a rise in exchange, we have before us the prospect of a small surplus at the end of the year. Dost thou do wisely to throw away this surplus? is a question which the tax—paying millions of India have a right to ask our Finance Minister. Nay more, they have a right to insist that no portion of our revenue shall be thrown away without necessity. The Finance Minister has no guarantee that the exchange will not go down during the next five years. He has not made out or stated any case of necessity for throwing away 30 per cent. of our import-revenue. Sur—render of duty upon yarns, amounting to 20 lakhs, seems to be a sufficient sop for the time to Manchester. She will never accept as a payment in full anything that we may offer her now. She will take it merely as an instalment. Then it clearly behoves us to pay in instalments small and spread over a large number of years.”

———

The following is culled from the short summary of the Edu—cational progress in India in the last year to show wha[t] our Govern—ment spends on education:—

“The gross expenditure (direct and indirect) on Public Instruction, which had increased steadily from Rs. 3,05,19,682 and Rs. 3,16,72,827 in 1891—92 and 1892—93 to Rs. 3,22,79,706 in 1893—94, rose to Rs. 3,30,88,431 in the year under review. The direct expenditure increased from Rs.2,58,51,608 in 1893-94 to Rs. 2,65,39,921 in 1894—95, and the indirect from Rs. 64,28,098 to Rs. 65,48,513. The rise in direct expenditure was mainly due to the growth of the cost of Secondary and Primary Schools from Rs. 1,06,36,125 and Rs. 1,03,23,937 respectively in 1893—94, to Rs. 1,08,10970 and 1,06,48,066 in 1894—95. There was an increase in the cost of Arts Colleges (from Rs.22,13,938 to Rs. 22,85,129), Professional Colleges (from Rs.8,22,866 to Rs.9 07,820), and Special schools other than Training Schools (from Rs.11,48,395 to Rs. 11,91,155). But the cost of Training Schools for Masters and Mistresses declined from Rs. 7,06,347 to 6,96,781. The increase in indirect expenditure (which includes charges on account of direction, inspection, Scholarships, buildings, furniture and apparatus, and miscellaneous items) was distributed over every head exc[ept] “miscellaneous.”

### Ourselves

Our subscribers will, we hop[e] allow us the usual Holi Holiday which they have hitherto done u[n]grudgingly. As our offices will [be] closed for these days there w[ill] be no paper issued on the 2n[d] proximo.

---

## वऱ्हाड

रा. रा विनायक आप्पाजी काणे तहशीलदार, अकोट यांस माजिस्ट्रेट वर्ग अधिकार देण्यांत आलें आहेत.

रा. रा उत्तमराव यशवंतराव नायब-तहशीलदार, इलिचपूर यांनीं तीन महिन्यांची रजा घेतली आहे.

मि. सिम्पसन असिस्टंट कमिशनर, आकोला हे रजेवरून परत येऊन आपल्या कामावर दाखल झाले.

मे० प्लौडन साहेब रेसिडेंट हैद्राबाद यांची स्वारी काल दोन प्रहरचे गाडीनें येथें येणार होती परंतु तो बेत रहित होऊन तारीख २९ रोजीं येतील असें समजतें.

येथील रफूवाला जयराम याचा खून केल्या बद्दल अंबू, उकर्डा व गंगाराम यांस आरोपींस फाशीची शिक्षा सांगितली आहे.

सुटी—हुताशनी या सणा निमित्त 'वऱ्हाडसमाचार' चा तारीख २-३-९६ रोजी अंक निघणार नाहीं. सालाबाद प्रमाणें आमचे वाचक ही हक्काची रजा मोठ्या आनंदानें मंजूर करितील अशी आशा आहे

---

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तव्हां त्यांस कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकेट मिळावें म्हणून त्यानें जिल्हे कोर्टांस अर्ज केल्या विषयीं जाहीरात

सन १८८९ चा अक्ट ७ प्रमाणें.

दि० की० मु. नंबर २/१८९६

दिपुटी कमिशनर साहेब जि० एलिचपूर यांचे कोर्टांत

नांव—सिवरामजी

बापाचें नांव— गोंडाजी कुणबी

रहाणार— कृष्ण पूर तालुके एलिचपूर जिल्हा— एलिचपूर यांस मयत

गोंडाजी बापाचें नांव उदेभानजी रहाणार एलिचपूर तालुके एलिचपूर जिल्हा एलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें म्हणून सदर्हू अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याज करितां तदरहू मयताचे मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे म्हणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यांस जाहिरातीद्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं गत २० माहे मार्च सन १८९६ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं वरील कोर्टांत अगर स्वारी असेल तेथें हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

ता० १८ माहे फेब्रुवारी सन १८९६ इ०

H. Godwin Austen
Deputy Commissioner
Ellichpur.

जड्डम

## वर्तमानसार.

ह्या गोष्टीकडे पुढारी मंडळींनें लक्ष दिलें पाहिजे. प्रसंगीं थोडी जास्त घस सोसावी लागल्यास ती सोसण्यास तयार असलें पाहिजे कित्येकांना जास्त मेहनत घ्यावी लागेल व इतकें ही करून आपण जें इच्छितों तें रंगारूपास न येतां मध्येंच वाहवलें तर त्याचें ही अपयश बहुतांशीं आपल्या माथीं बसेल हें ही त्यांनीं विसरूं नये.

अशा प्रकारचीं कामें हीं एकट्या दुकट्याला असाध्यच होत. दसकी नकडी एकका बोजा हें लक्षांत ठेवून छोटेखानीं व उमेदवार मंडळींनें एका दिलानें शक्त्यनुसार पैशाची आणि अंग मेहनतीची ह्या कामीं मदत दिली तर ती फार महत्वाची हाईल. चोहोंकडून चार हात लागल्या शिवाय कांहीं होणें नाहीं. ह्या गोष्टीची वाटावाट आज चार पांच महिन्यापासून होत आहे तरी अजून कशास कांहीं ठिकाण नाहीं असें लोकांना वाटून त्यांना आपणाला नांवें ठेवण्यास जागा मिळेल ही गोष्ट मनांत ठेऊन लहान मोठ्यानीं हें काम शेवटास नेण्या करितां सतत झटण्यास कंबर बांधिली पाहिजे ह्याचा आमची पोलीस खात्यांतील मंडळी योग्य विचार करतील असें समजून हा लेख पुरा करितों.

"आपला"
एक हितचिंतक

वऱ्हाडसमाचार

मिती फाल्गुन शुद्ध १० शके १८१७

बाबू पृथ्वीचंद्रराय यांनीं हिंदुस्थानच्या घोर दारिद्र्या संबंधानें एक उत्तम निबंध लिहिला आहे. त्यांतील महत्वाच्या गोष्टी परीक्षणाच्या निमित्तानें गेल्या 'इंडिया' च्या फेब्रवारीच्या अंकांत प्रसिद्ध झाल्या आहेत. मूळ ग्रंथ सध्यां आह्माजवळ नाहीं तथापि त्यांत ज्या गोष्टींचें विवेचन केलें आहे त्या सर्वत्रांस ठाऊक असणें अगदीं अगत्याचें आहे ह्मणून आह्मी त्या गोष्टी खालीं नमूद करीत आहों. हिंदुस्थान देश दरिद्री आहे किंवा नाहीं याविषयीं सध्यां प्रश्नच राहिला नाहीं. ज्या कोणास या देशाची कांहीं माहिती आहे तो तत्काळ कबूल करितो कीं हा देश दरिद्री आहे. खरोखरच हें दारिद्र्य अति घोर आहे, दारिद्र्या खालीं लोकांचा चक्काचूर उडाला आहे, व त्याचा प्रसार वाढला आहे इतकेंच नाहीं तर अधिकाधिक वाढत चालला आहे. दारिद्र्याचा प्रश्न अद्याप सरकारनें प्रत्यक्षपणें लक्ष्यांत घेतला नाहीं आणि मि. राय लिहिण्याच्या आवेशांत ह्मणतात कीं राष्ट्रीय सभेचे ठराव देखील या प्रकरणांत अस्पष्ट व व्यर्थ आहेत. इंडियाच्या सांपत्तिक वैभवाला जे किडे लागले आहेत ते नाहीसे करण्याकडे कोणीच लक्ष्य पुरवीत नाहीं. सर्व राजकीय प्रश्नां मध्यें या दारिद्र्याचाच प्रश्न मुख्य आहे आणि याचा योग्य निकाल लागल्याखेरीज हा देश सुधारण्याची आशाच नको. बाबूराय यांनीं कांहीं नामी उपाय सूचविले आहेत पण त्यापेक्षांही जो रोग सांपत्तिक स्थितीचा लय करितो त्याची चिकित्सा या निबंधानें फार उत्तम केली आहे. अशीच चिकित्सा नामदार दादाभाई यांनीं पूर्वीं पुस्तकरूपानें केली आहे. तें पुस्तक अगदीं सप्रमाण आहे आणि सर्वत्र त्याचा उपयोग करीत असतात.

हिंदुस्थान मुख्यत्वें करून शेतकऱ्यांचा देश आहे. बंगालचे माजी लेफ्टेनंट गव्हनर सर चार्लस इलियट हे देखील असे बोलले कीं आमच्या शेतकरी लोका पैकीं निम्या लोकांस उभ्या वर्षांत कधीं आपली भूक पूर्णपणें निमाली असें वाटत नाहीं; आणि निम्मी लोकसंख्या ह्मणजे पुरुष, बायका व मुलें मिळून दहा कोटीवर मनुष्यें होतात लोकांच्या दारिद्र्याचा संबंधानें मि० राय यांनीं पुष्कळ प्रमाणें व आधार दाखविले आहेत त्या पैकीं एक उतारा पुरे आहे. मद्रासचे शेती खात्याकडील अधिकारी मि० राबर्टसन लिहितात कीं पीकपाणी उत्तम आलें ह्मणजे त्या वर्षीं शेतकऱ्या या कुटुंबांतील माणसें धरून त्यांचें उत्पन्न सरासरीनें ३ पेन्स ह्मणजे ३ आणे रोजी पेक्षां अधिक पडत नाहीं. आणि हंगाम वाईट असला ह्मणजे त्या या कष्टदायक स्थितीला सीमाच नाहीं. अशा प्रकारें सगळ्या महिन्यांत शेतकऱ्याचें उत्पन्न ८ सिलींग ह्मणजे ६ रुपयाहून देखील कमी पडतें. विलायतेस एक मजूर किंवा गिरणीतील कामकरी रोज थोडा वेळ काम करून एका आठवड्यांत अधिक मजूरी कमावतो. आणि हें ध्यानांत धरलें पाहिजे कीं इंडियांत पोटखर्च अगदीं थोडा लागतो तरी चांगल्या सुबत्तेच्या वेळीं दर माणशी दर महिन्यास २॥. रुपया पेक्षां कांहीं कमी लागत नाहीं; व गेल्या खानेतलाशींत आढळलें कीं दर कुटुंबांत सरासरी ४।५ माणसें पडतात तेव्हां इतक्या माणसांचा पोट खर्च व रोजनदारीचें वेतन यांची तोंडमिळवणी कशी होते हें कळणें कूट प्रश्ना प्रमाणें कठीण व गूढ आहे. पण निसंशय हा मेळ बसतच नाहीं. आणि विश्वसनीय आधारावरून असें निघतें कीं ४ कोटी प्रजा सदासर्वकाळ कडकडीत उपासमाऱ्यांत दिवस कंठीत असतात. या वर्णनांत पुष्कळ गोष्टी बाध धरिल्या तथापि हें निर्विवाद आहे कीं पुष्कळ लोकांची स्थिती अंतःकरण फाटण्या इतकी वाईट आहे. लोकांस खाण्याला पोटभर जेथें मिळत नाहीं तेथें आजारा सारख्या आपदा दत्त ह्मणून उभ्याच असतात.

दारिद्र्याचीं कारणें शोधतांना मि० राय यांनीं अनेक कारणांचा विचार केला आहे. इंडियाची लोकसंख्या अती वाढली आहे असें कांहींजण कारण दाखवितात. पण फ्रान्स देशापेक्षां या देशीं लोकवस्ती सरासरीनें एका चौरस मैलाला अधिक दाट आहे तथापि जर्मनी, इटली व चीन या देशांतील लोकवस्ती पेक्षां इकडे अधिक पातळ आहे; आणि इंग्लंड व बेलजम या देशांच्या मानानें इकडे निम्मी लोकवस्ती आढळते. या देशांत सरासरीनें लोकवस्तीचें प्रमाण फार दाटीचें पडत नाहीं तथापि कित्येक प्रांतीं वस्ती अती दाट आहे आणि लोक घरेंदारें सोडून इतर पातळ वस्ती या स्थळीं जाऊं इच्छित नाहींत व त्यामुळें वाढत्या लोकसंख्येच्या कारणाचा प्रतिकार होऊं शकत नाहीं. दुसरें कारण असें कीं इंडियांतील धान्य परद्वीपीं अतोनात जाऊं लागलें त्यामुळें महर्गता फार झाली आणि महर्गतेच्या मानानें लोकांच्या वेतनाचे दर कांहीं वाढले नाहींत. तिसरें कारण जमिनीचा सारा मोठा, आहे आणि पीकपाण्याच्या वाईटपणा मुळें त्यांत कांहीं सूट वगैरे मिळत नाहीं. इतकेंच नाहीं तर सरकारचा वारंवार सारा वाढविण्याची पद्धत लोकांस फार पीडाकारक आली आहे मद्रास इलाख्यामध्यें तर असें आढळतें कीं दरसाल सारा योग्य वेळीं न पोच ल्यामुळें सुमारें ३३॥ लक्ष लोकांची घरेंदारें विकलीं जाऊन सारा वसूल करण्यांत आला डाक्टर वाकर ह्मणतात कीं या देशच्या शेतकऱ्यांमध्यें हीय्या नाहीं. त्यांचे खर्च उधळपणाचे असतात असें कांहींजण ह्मणतात. भलताच दानधर्म, एकत्र कुटुम्बांत राहण्याची रीत, व्यसनाधीनता, भांडखोरपणा, महापूर, दुष्काळ, टोळधाड. इत्यादि दुसरीं अनेक कारणें दाखविण्यांत येतात. मि राय ह्मणतात कीं कांहीं ही ह्मटलें तरी या देशाचें दारिद्र्य ब्रिटिश राज्य खालीं फार वाढलें आहे.

दारिद्र्य दूर करण्यासाठीं मि० राय यांनीं कांहीं चांगले उपाय सूचविले आहेत. हे उपाय येणें प्रमाणें.

(१) जमिनीचा धारा सर्वत्र कायमचा ठरवा आणि शेती नफ्यानें लाऊन काढणारे लोक जमिनीचे मालक जितके कमी असतील तितकें चांगलें.

(२) आयर्लंडांत जसे शेतकऱ्यांस कांहीं हक्क दिले आहेत तसे हक्क इकडच्या लोकांस देऊन त्यांची स्थिती सुधारा.

(३) शेतकऱ्यासाठीं गांवोंगांव पेढ्या निघाल्या पाहिजेत.

(४) ज्या प्रांतीं शेतकरी फार आहेत त्या प्रांतांतून लोकांस हालवून या देशच्या अफाट राज्यांत त्यांच्या निराळ्या वसाहती स्थापा आणि लोकसंख्या अतोनात न वाढेल तर फार बरें.

(५) शेतकी विषयींची विद्या लोकांस शिकवा, आणि कालवे वगैरे बांध याचीं कामें सरकारनें चालू करावीं.

(६) इंग्लंडा प्रमाणें या देशी गरिबांचा कायदा निराळा करा आणि पंचाईतीची पद्धत चालू करा.

(७) प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष कर लोकांवर बसले आहेत त्यापैकी कांहीं कमी करा व कांहीं समतोल सारखे बसवा.

या उपायामध्यें पुष्कळ गोष्टी विचार करण्या सारख्या आहेत आणि कित्येक वादग्रस्त आहेत. इंडियाच्या दारिद्र्याच्या प्रश्नाचा खल वारंवार जितका होईल तितका ब्रिटिश राज्यास व रयतेस परिणामीं सुखावह होणार आहे.

---

√ इंडियाचें राज्य इंडियाचे लोकासाठींच आहे आणि त्यांत इंग्लंडाच्या लोकांचा प्रत्यक्ष संबंध नाहीं अशीं विधानें मुत्सदी लोकांच्या तोंडून ऐकण्यांत आलीं आहेत. या विधानावरून इंग्लिशांच्या उदारपणाचें मोठें आश्चर्य वाटे आणि या देशास ब्रिटिश राज्यरूपी परिसच लाभला आहे असा खोटा समज लोकांचा होऊन जात असे परंतु निदर्शनास गोष्टी फार वाईट येतात आणि त्या आमच्या राज्यकर्त्यांचा खरा लोभी स्वभाव, बनियेशाही, व आपमतलबीपणा या विषयीची उत्तम साक्ष देतात. नामदार मेथा यांनीं गुदस्तां पोलिस बिलाच्या वेळीं कायदे-कौन्सिलदारांस त्या बिलाच्या अनर्थकारक परिणामा विषयीं बोध केला तेव्हां स्टेट सेक्रेटरीचा हुकूम असाच आहे ह्मणून तें बिल पसार करण्यांत आलें. स्टेट सेक्रेटरीचा हा विचित्रच हक्क त्या प्रसंगीं कायदे-कौन्सिलांत प्रतिपादण्यांत आला. गेल्या जकातीच्या बिलाच्या वेळीं नामदार वेस्टलांड यांनीं इंडियाचें राज्य कोणासाठीं आहे या प्रश्नाचा नामी खुलासा केला. म्यांचेस्टरवाल्या इंग्लिश लोकांची विशेष काळजी वां घेतली पाहिजे हें स्पष्टपणें कळवितांना नामदार वेस्टलांड बोलले कीं:— "अमेरिकेंतील स्वतंत्र संस्थाना प्रमाणें इंडियाचें सरकार स्वतंत्र आहे असें ह्मणणें निरर्थक आहे. स्वतंत्र राज्य असलें ह्मणजे त्यांतील प्रजेच्या कल्याणाहून इतर गोष्टी तुच्छ करिता येतील आणि असेंच करणें खरें कर्तव्य होय. इतर राष्ट्राच्या कल्याणाचा विचार एवढाच करावयाचा कीं त्या योगें स्वदेशास तत्संबंधानें फायदा झाला पाहिजे. आपल्या जमाबंदीचे व व्यापाराचे कायदे इतर राष्ट्रांला अहितावह झाले तथापि स्वतंत्र सरकारला त्या गोष्टीचा कांहीं विचार कर्तव्य नाहीं. हें अहित आपल्या राष्ट्रास अहितप्रद होणार नाहीं अशी खबरदारी घेतली ह्मणजे पुरें आहे. पण इंडियाची गोष्ट निराळी आहे. एका मोठ्या राज्याचा हा देश एक घटकावयव आहे. या राज्याच्या घटकावयांचा परस्पर संबंध असंख्यात प्रकारांचा आहे. तेव्हां विलायतचा जो मोठा उद्योग व व्यापार त्याला धक्का पोंचेल अशा रितीनें इंडियाचा राज्यकारभार चालवूं नये हें उघड उघड आहे. इंडियाच्या उद्योगाची होती होत अपली तर इंडियाच्या वतीनें भांडण्याचें आमचें काम आहे; पण तेव्हां देखील अखेर निकाल कांहीं आमच्या हातांत नाहीं इंडियाच्या चतुःसीमेच्या पलिकडील गोष्टी विषयीं आह्मी डोळे झांकावे हें आमचें कर्तव्य आहे किंवा कर्तव्यान्तर्गत आहे असें जर कोणी प्रतिपादन करितील तर तें अगदीं अप्रमाण आहे असें आह्मी मानतों."

नामदार वेस्टलांड यांनीं ब्रिटिश राज्याच्या घटकावयवांत या देशास गणिलें आहे आणि या देशानें आपल्या बरोबरीच्या इतर घटक वयवासाठीं तोशिस सोसली पाहिजे असा प्रौढ विचार प्रगट केला आहे. पण प्रश्न एवढाच कीं इंडिया साठीं इतर घटकावयवांनीं काडीमात्र तरी घस लावून घेतली आहे काय? खरा प्रकार असा दिसतो कीं इंडियाच्या ऱ्हासावर इतर घटकावयवांची इमारत उभारली आहे

---

आकोल्यास पाण्याचा पुरवठा:—

यंदा सर्व प्रांतभर बरसात कमी झाल्यामुळें उन्हाळ्यांत पाण्याची फार अडचण होईल ह्मणून सर्वत्र ठिकाणीं ह्या संबंधानें विचार होत आहे. आकोले येथें ५ लाख रुपये खर्च करून कापशी येथून ११ मैला-

वरून विहिरीचें पाणी नळानें आणलें आहे परंतु विहिरीतील पाणी पुष्कळ खोल गेलें असल्यामुळें तें पंप करून नळांत सोडलें पाहिजे. या कामाकरितां रक्कम रुपये ४००० खर्च लागेल तो येथील मुनासिपालटीनें देण्याचें कबूल केलें आहे. इतकें करून पाणी पुरेल किंवा नाहीं या बद्दल शंका आहेच ह्मणून मोर्ना नदीचें पाण्याचा पिण्याकडेस उपयोग करावा ह्मणून विचार चालूं आहे परंतु त्या पाण्यापासून भयंकर रोग उद्भवण्याचा संभव आहे असें येथील सिव्हिल सर्जन डाक्टर रेडी यांचें ह्मणणें आहे तथापि सदर्हू पाण्याच्या दोन बाटल्या भरून तें मुंबई येथें केमिकल आनालायझर यांजकडेस परिक्षेकरितां पाठविलें. आहे पाणी पसंत झाल्यास नदींतून नळ लावून त्या नळानें पाणी शहरास पुरावण्यांत येईल. एकंदरींत पांच लाख रुपयांचा फन्ना उडून शेवटीं या प्रमाणें पाण्याची हाकाटी व्हावी हें फार आश्चर्यकारक आहे!

——०:०——

"वऱ्हाड हायस्कूल मानि विद्यार्थी समाज"

आमचे पत्रांतील जाहिराती प्रमाणें यंदाचा हा समाज येथें ता २८ व २९ शुक्रवार शनिवार ह्या रोजी भरणार आहे रेलवेचे कनसेशन मागावे याचा यंदा पुष्कळ कारणा करितां विचार नाहीं. समाजाचे उमरावतीकर मेंबर हे शुक्रवार रात्रीं "झुंझारराव" ह्या नाटकाचा प्रयोग करून दाखवितील " सामाजिक विषयावर मि. मोरो विश्वनाथ जोशी बी. ए. बी. एल ह्यांचें उत्तम व्याख्यान होईल. मित्र मंडळीचे करमणुकी करिता गायन कलानिपुण प्रोफेसर बाळकृष्ण बोवा मिरजकर यांचें सुस्वर गायन होईल. व्यायामाचे खेळाची उत्तम व्यवस्था करण्यांत येणार आहे. क्रिकेट वगैरे इंग्रजी तऱ्हेचे पत्याचे खेळ होतील व ज्यांस हे खेळ माहात नसतील त्यांचे करितां मुद्दाम सूचना पत्रकाची व त्या प्रमाणें खेळ शिकविण्याची व्यवस्था करण्यांत येईल. असल्या समाजापासून मित्र मंडळीचे प्रेमभाव वाढविण्याची व दोन दिवस आराम घेण्याची ही उत्तम संधी आहे. तसेच विद्वान मंडळीच्या गाठी पडून त्यांच्याशीं दळणवळण ठेवण्यानें व त्यांचे आचार विचार कळून पुष्कळ फायदा हो याचा संभव आहे.

The Berar Samachar
MONDAY FEBRUARY 24, 1896

We learn on a reliable authority that the ill report about the management of the Amraoti District Board is altogether unfounded. The vague misgivings and forebodings about the future prospects of a practical form of Local Self—Government are entirely creations of an imaginative and inventive mind working upon some crude stuff gathered here and there. Our contemporary of the Vaidarbh has within his knowledge a good deal of matter which he cannot inwardly digest and formulate in a sympathetic and acceptable manner. The system of Local Boards has worked well with a certain degree of success in this province. It seems that the climate and soil of this province is not unsuitable to the plant introduced under the benign vice-royalty of Lord Ripon. Like other institutions under the direct control of the government the Boards may have some special defects but on that ground they are not less thriving in this province. We can refer with pride to the nice work which the Akola District Board turns out from year to year under the Vice—Chairmanship of Mr. Dattatraya Vishnu Bhagwat an ornament of the leading citizens of Akola. We have commenced an inquiry about the Amraoti District Board and we hope we shall be able to give our readers a fair idea of the true state of things Our learned editor of the Vaidarbha has painted too black a picture and affirms with a moral certainty that he is justified in doing so. However we are glad to say that he is misinformed and that there are not such circumstances as will warrant the higher authorities to deal a deadly blow to the system of District Boards. We shall ask our readers to suspend their judgment in this connection and to remain in hope that they will have to learn a good many pleasant things hereafter.

——•◦•——

It is an *official* secret as to why a *burra* Conference is being held at Akola. Sir Edward Buck comes as the *trusted* prophet of something good to the ryots in general. He will hold his consultations with the chief officers in Berar; but it is a wonder why the people in whose interests the whole task is imposed are tak[illegible] into confidence. The whole affair appears as a mystic mission of an omniscient government.

——◦o◦——

Rao Sahib S. V. Patwardhan, under cover of a strict discipline in matters of school—management is working rather over-anxiously. His administration, such as appears just now, seems to go ahead of the existing conditions of educational machinery at work in Berars. Evidently therefore he is, we are afraid, likely to lose popular esteem if he does not take care to adapt his schemes to the present state of things. It is no wonder therefore that teachers should find their position most precarious. Though letters are pouring forth from various quarters anent the present educational administration we purposely refrain from giving publicity to them considering that they would be of no use when our Director would catch this hour and take advice to give a smooth course to his carreer.

——

The history of the Cotton Duties Act will remind us of a painful position we hold in the esteem of our rulers. Public opinion has no value in their eyes and it is sheer injustice with which the bill passed into law. Further the reduction in import duty from 5 to 3 and a half per cent is a stigma under the de[illegible]able state of finances. The Hon'ble Babu Mohiny Roy thus advertises to it with a feeling of dismay:—

"The import-duty on cotton goods happens to have a past history which augers no good of its future. The duty was fixed at 10 per cent. *ad valorem* by Act VII of 1859. It continued at that rate till 1875 when, by Act XVI of 1875, it was reduced to 7 and a half per cent. Then in 1882 it was abolished altogether by Act XI of that year. Of these two Acts, the one of 1875, which was passed during Lord Lytton's Viceroyalty, was 'the beginning of the end' and the other Act XI of 1882, passed during the administration of Lord Ripon, was 'the end' itself of the import custom-revenue. The repeal was made amidst a flourish of trumpets. Our finances were represented to be in a very prosperous condition and able to bear the sacrifice of about a million and-a-half of revenue. There was a great deal of tall talk about the import duty pressing upon poor people and invocation of the principles of free trade. Disillusion came soon enough. The income-tax had to be re-imposed, the salt-tax considerably increased, and a petroleum-duty imposed; and yet the Government did not find it possible to make two ends meet. Deficit continued to be the normal condition of the finances of India until we re-imposed last year an import-duty of 5 per cent. upon cotton goods. Then, owing to a rise in exchange, we have before us the prospect of a small surplus at the end of the year. Dost thou do wisely to throw away this surplus? is a question which the tax-paying millions of India have a right to ask our Finance Minister. Nay more, they have a right to insist that no portion of our revenue shall be thrown away without necessity. The Finance Minister has no guarantee that the exchange will not go down during the next five years. He has not made out or stated any case of necessity for throwing away 30 per cent. of our import-revenue. Surrender of duty upon yarns, amounting to 20 lakhs, seems to be a sufficient sop for the time to Manchester. She will never accept as a payment in full anything that we may offer her now. She will take it merely as an instalment. Then it clearly behoves us to pay in instalments small and spread over a large number of years."

——

The following is culled from the short summary of the Educational progress in India in the last year to show what our Government spends on education:—

"The gross expenditure (direct and indirect) on Public Instruction, which had increased steadily from Rs. 3,05,19,682 and Rs. 3,16,72,827 in 1891—92 and 1892—93 to Rs. 3,22,79,706 in 1893—94, rose to Rs. 3,30,88,431 in the year under review. The direct expenditure increased from Rs.2,58,51,608 in 1893-94 to Rs. 2,65,39,921 in 1894—95, and the indirect from Rs. 64,28,098 to Rs. 65,48,513. The rise in direct expenditure was mainly due to the growth of the cost of Secondary and Primary Schools from Rs. 1,06,36,125 and Rs. 1,03,23,937 respectively in 1893—94, to Rs. 1,08,10970 and 1,06,48,066 in 1894—95. There was an increase in the cost of Arts Colleges (from Rs.22,13,938 to Rs. 22,85,129), Professional Colleges (from Rs.8,22,866 to Rs.9,07,820), and Special schools other than Training Schools (from Rs.11,48,395 to Rs. 11,91,155). But the cost of Training Schools for Masters and Mistresses declined from Rs. 7,06,347 to 6,96,781. The increase in indirect expenditure (which includes charges on account of direction, inspection, Scholarships, buildings, furniture and apparatus, and miscellaneous items) was distributed over every head except "miscellaneous."

——

### Ourselves

Our subscribers will, we hope allow us the usual Holi Holiday which they have hitherto done ungrudgingly. As our offices will be closed for these days there will be no paper issued on the 2nd proximo.

## वऱ्हाड

रा. रा विनायक आप्पाजी काणे तहशिलदार, अकोट यांस माजिस्ट्रेट वर्गाचे अधिकार देण्यांत आलें आहेत.

रा. रा उत्तमराव यशवंतराव नायब-तहशिलदार, इलिचपूर यांनीं तीन महिन्यांची रजा घेतली आहे.

मि. सिम्पसन असिस्टंट कमिशनर, आकोला हे रजेवरून परत येऊन आपल्या कामावर दाखल झाले.

मे० प्लौडन साहेब रेसिडेंट हैद्राबाद यांची स्वारी काल दोन प्रहरचे गाडीनें येथें येणार होती परंतु तो बेत रहित होऊन तारीख २५ रोजीं येतील असें समजतें.

येथील रफूवाला जयराम याचा खून केल्या बद्दल अंबू, उकर्डा व गंगाराम यांस आरोपींस फाशीची शिक्षा सांगितली आहे.

सुटी—हुताशनी या सणा निमित्त 'वऱ्हाडसमाचार' चा तारीख २-३-९६ रोजीचा अंक निघणार नाहीं. सालाबाद प्रमाणें आमचे वाचक ही हक्काची रजा मोठ्या आनंदानें मंजूर करितील अशी आशा आहे

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तव्हां त्यांस कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहीरात

सन १८८९ चा अक्ट ७ प्रमाणें.

दि० की० मु. नंबर २
१८९६

दिपुटी कमिशनर साहेब जि० एलिचपूर यांचे कोर्टांत

नांव—सिवरामजी
बापाचें नांव— गोंडाजी कुणबी
रहाणार— कृष्णपूर तालुके एलिचपूर
जिल्हा— एलिचपूर यांस मयत

गोंडाजी बापाचें नांव उदेभानजी रहाणार एलिचपूर तालुके एलिचपूर जिल्हा एलिचपूर यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदर्हू अर्जदार याणें अर्ज केला आहे त्याज कारितां सदरहू मयताचे मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यांस जाहिरातीं द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं गत २० माहे मार्च सन १८९६ इसवी रोजीं सदरहू अर्जाची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत अगर स्वारी असेल तेथें हजर होऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकिकत दाखल करावी.

ता० १८ माहे फेब्रुवारी सन १८९६ इ०

H. Godwin Austen
Deputy Commissioner
Ellichpur.
जड्ज

## वर्तमानसार.

चीन जागा होऊं लागला—सेंटपीटर्सबर्ग येथल्या बातमी वरून समजतें कीं, युरोपियन धर्तीवर टिंपेटसिन येथें एक मोठें विश्वविद्यालय स्थापन करावें, सर्व चीनच्या राज्यभर कालेजें स्थापन करून त्यांतील विद्यार्थ्यांस युरोपियन प्रोफेसरांकडून पाश्चात्य धर्तीवर शिक्षण द्यावें, आणि युरोपांत शिकलेल्या चिनी विद्वानांनीं त्या युरोपियन प्रोफेसरांच्या हाताखालीं शिक्षणदानाचें काम करावें असा ठराव करून तो अमलांत आणण्याचा चीन सरकारचा बेत आहे.

जगांत आगगाडीची सुरवात होऊन ७० वर्षे झालीं तरी इतक्या अल्पावकाशांत चार लक्ष मैल रेलवेचा रस्ता चालूं झाला आहे. पैकीं एक षष्ठांश रेलवे ग्रेटब्रिटनच्या ताब्यांत आहे.

लोकरीच्या कपड्यावरील जकात उठविण्यासाठीं ओरड—यार्कशायर (इंग्लंड) येथल्या एका लोकरीच्या कारखानदाराच्या मतें हिंदुस्थानांत असलेल्या लोकरीच्या गिरण्यांस आयात जकातीचा फायदा मिळत आहे सबब स्वतंत्र व्यापारसत्वानें विलायतेहून हिंदुस्थानांत येणाऱ्या लोकरीच्या कपड्यावरील जकात उठवावी; नाहीं तर हिंदुस्थानांतील गिरण्यांत उत्पन्न होणाऱ्या लोकरीच्या कपड्यावर कर बसवावा अशी ओरड कारखानदारांनीं चालविली आहे. मधमाशांच्या एका थव्याची शांति झाली ह्मणजे त्या ठिकाणीं दुसरा थवा येतो त्या पैकींच जकातीच्या बाबतींत हे खूळ पिकलें आहे! परमेश्वराची मर्जी ह्मणावें दुसरें काय?

बांद्र्याहून मुंबईस मांस आणण्या करितां व कचरा नेण्याकरितां बैल गाड्यांचे ऐवजीं केरोसिन तेलाची वाफ सिद्ध करून तिच्या जोरानें चालणाऱ्या गाड्या प्रचारांत आणण्याचा मुंबई म्युनिसिपालिटीचा विचार आहे. शु. सु.

कोरियांत पुन्हा बंडावा सुरू झाला व बंडवाल्यांनीं तेथें असलेल्या जपानी फौजेची कत्तल केली. रशियाचे १०० लश्करी लोक एका तोफेसह कोरियांत उतरले. कोरियाचा राजा प्रधान वगैरे रशियाच्या फौजेच्या आश्रयास आले. बंड कां उपस्थित झालें समजत नाहीं.

चित्रळ प्रकरणांत प्रसिद्धीस आलेला उमराखान आतां मक्केच्या यात्रेस जात आहे व तो कराचीवरून मुंबईस येणार व मुंबईस आगबोटींत बसून मक्केस जाणार आहे. त्याच्या या प्रवासांत त्यास हिंदुस्थानसरकारानें चांगल्या सन्मानानें वागवावें असें ठरून त्या प्रमाणें हुकूमही झाला आहे असें सांगतात. हाही पोलिटिकल खेळांतलाच एक मासला आहे. चित्रळच्या वेळीं तो आमच्या सरकारचा एक शत्रू होता व त्यास शासन करण्यास सरकार तयार होतें. तो पुढें अमिराच्या आश्रयास राहिल्याचें बाहेर आलें तेव्हां आमचे सरकार अमिरावरही थोडे रागावलेच. पण आतां तोच उमरखान मक्केस जात आहे व सरकार त्यास सन्मानानें वागवीत आहे, मग या प्रकरणाची खुंटी कोठें असेल की अशो.

इटाली सरकार आपल्या अबिसीनियाच्या प्रकरणावर अधिक फौज पाठवित आहे.

टर्कीच्या सुलतानाच्या राज्यांतले तरुण मुसलमान लोक कांहीं खटपटी करूं लागल्या वरून सरकारी कामदारांकडून त्यांची धरपकड चालली आहे.

माझ्याशी ज्या गोष्टीबद्दल बोलणें करणार त्या गोष्टी मला आगाऊ कळवाल तर आपण इंग्लंडास येऊं असें प्रेसिडेन्ट क्रूगरचें ह्मणणें आहे.

दक्षिण अफ्रिकेंत शिरण्यास कोणत्याही परकीय राष्ट्रास इंग्लंड अगदीं जोरानें हरकत करील याकरितां ट्रान्सवाल सरकारच्या प्रेसिडेन्टानें दुसऱ्या राजावर विश्वास ठेवून राहण्याचा विचार करावा असें इंग्रज सरकार त्या प्रेसिडेन्टास बजावून सांगत आहे आह्मी आपल्या राज्यांतल्या कारभारांत कोणासही हात घालूं देणार नाहीं. असें प्रेसिडेन्टाचे ह्मणणें आहे.

कोणत्याही राष्ट्राची फौज टर्कीच्या विरुध्द होणें हें रशियन बादशहाच्या इच्छे विरुद्ध आहे असें एक रशियन प्रधान सांगतो. अ० द०

सावधगिरीची सूचना—मुलें शाळेंत आपल्या स्लेटपाटीवर तोंडाची वाफ टाकून अथवा पाटी जिभेनें चाटून किंवा हाताला थूंकी लावून त्या थुंकीनें पुनः पुनः जिभेला हात लावून पाटी पुसतात. ही रीति सर्वत्र पाहण्यांत येते परंतु असें करणें चांगलें नाहीं. स्लेटीच्या दगडावर हवेंतले एक प्रकारचे सूक्ष्म जीव असतात. ते जीव मोठे विषारी असून अशा रीतीनें पाटी पुसण्यामुळें मुलांच्या पोटांत जातात, अथवा गळ्याच्या नलिकेंत बसतात. आणि तेणेंकरून त्यांस अनेक प्रकारचे गळरोग उत्पन्न होतात. मुलांना नालगुंडे वगैरे होण्याचीं कारणें बहुत करून अशा प्रकारच्या अविचारमुलक पद्धती मध्येंच आहेत असें डाक्तरांचे ह्मणणें आहे.

मध्य हिंदुस्थानांत व वायव्येकडील प्रांतामध्यें दुष्काळानें बरेच उग्र स्वरूप धारण केलें आहे असें तिकडील वर्तमानपत्रावरून कळतें. उपाशी मरणाऱ्या लोकांचा कांहीं तरी निर्वाह लागावा ह्मणून वायव्येकडील प्रांताचे सरकारानें कामें सुरू केलीं आहेत. पण ग्वालेर व रेवा संस्थानांतूनही लोक ब्रिटिश मुलुखांत येत असल्यामुळें सर्वांनाच काम काम देतां येत नाहीं आणि ह्मणून लोकांची स्थिति भयंकर झाली आहे. आसपासच्या नेटिव्ह संस्थानिकांनीं आपापल्या संस्थानांतही दुष्काळपीडीत लोकांच्या सोईसाठीं कामें सुरू करावीं असें सरकाराकडून सुचविण्यांत आलें आहे, परंतु अद्यापि ह्या सूचनेचा उपयोग झाल्याचें दिसून येत नाहीं. ह्या वेळीं 'दुष्काळाप्रीत्यर्थ राखून ठेवलेला फंड' जर असता तर कांहींच पंचाईत वाटली नसती. पण तो सरकारानें सरहद्दीवर दऱ्याखोऱ्यांतून ओतून संपविला. लोकांच्या पैशांचा असा भलत्याच तऱ्हेनें विनियोग करून त्यांला अशा प्रसंगी उपाशी मरूं देणें, हा ब्रिटिश राज्याच्या कर्तृत्वाचाच मासलाच आहे ह्मणावयाचा. न्या. सु.

सोलापूर—गेले गुरुवारीं मंगळवार पेठेंत एका शिंप्याचे बाईनें आपले अंगावरील कपड्यावर राकेल ओतून व तें पेटवून आपल्यास जाळून घेतलें. अशा प्रकारें आत्महत्या करण्याचें कारण घरांतील कांहीं जिन्नस आपल्या संमती शिवाय विकल्या बद्दल तिला तिचा नवरा रागे भरला होता ह्मणतात. क० त०

अमीराची धूर्तता खरी कीं काय?—तोंडानें पाहिजे तितकी साखर पेरून, दोस्त सरकाराशीं दोस्त सरकारीपणाचें नातें ठेऊन, इंग्लंडचा किंवा हिंदुस्थानचा व्यापार आपल्या देशांतून कमी करण्याचा काबूलच्या अमीराचा उद्देश दिसतो असें हल्लीं अनुभवानें प्रसिद्ध झालें. कारण, इकडील माल आफगाणिस्तानांत जाण्याचा रस्ता सिंध व ब्रिटिश बलुचीस्तानामधून आहे. पण त्या बाजूला अमीरानें त्या मालावर जबरदस्त कर ठेवल्या कारणानें हल्लीं माल अतिशय कमी जाऊ लागला आहे. आणि त्यामुळेंच अमीराची ही खुबी हल्लीं प्रसिद्धीस आली आहे. विलायत सरकारचा शहाणपण त्यांच्याच उपयोगीं पाडण्याची अमीराची ही खुबी पाहून, त्याच्याच धुर्ततेची मोठी मौज वाटते. वास्तविक यांत काय हेतु असावा हें जरी आज सांगतां येत नाहीं, तथापि प्रत्यक्ष जो व्यापारांत कमीपणा आला आहे, तो पाहिला ह्मणजे देशी व्यापाराला उत्तेजन मिळून, परदेशी मालाचा शिरकाव कमी व्हावा हेंच तत्व अमीरानें स्वीकारलें असावें असें उघड दिसतें.

नगर जिल्ह्यांतील राहणार शंकर बळवंत कोठीवाले या नांवाच्या इसमाची पार्वती नांवाची १८ वर्षांच्या उमरीची स्त्री माहेराहून संभू व वासुदेव नांवाच्या दोघा विश्वासू नोकरांस बरोबर देऊन सासरीं पोंचविण्या करितां ह्मणून उजेनीहून दोन महिन्यावर निघाली ती बडोद्यास येऊन बऱ्हाणपुऱ्यांत राहिली होती. दोन महिने झाले तरी आपली बायको आली नाहीं ह्मणून तिच्या नवऱ्यानें पोलीसांत जाहीरात दिल्यावरून त्या धोरणानें बडोद्याचे शहर डिव्हीजनचे फौजदार साहेबांनीं या त्रिवर्गास म्याजिस्त्रेटकडे रवाना केलें आहे. कनक व कांता या बाबतींत कोणावर विश्वास ठेवूं नये असें जे थोर पुरुषांचें ह्मणणें आहे त्यांतील हा एक मासला आहे. सदर स्त्री बरोबरच्या गड्यावर इतकी फिदा झाली आहे कीं, ती आपलें लग्न झाल्याचें व नवरा असल्याचें मुळींच कबूल नाहीं!!

जलप्रवासाचे योगानें व्हाइसराय साहेबांची प्रकृति चांगली हुशार झाली आहे.

काश्मीर प्रांतांत बर्फ फार पडत असल्यामूळें तिकडील रस्ते व डांका बंद झाल्या आहेत.

ब्राझील व इंग्लंड ह्यांच्यामध्यें कांहीं प्रकरणांत भानगड उपस्थित झाली असल्याचें समजतें.

पारिसमध्यें विजेच्या सहाय्यानें झाडांना फुलें आणण्याचा प्रयत्न चालूं असून त्यांत बरेंच यश आलें आहे.

ट्रॅन्सवाल सरकार, फ्रेंच व जर्मन कारखान्यांतून नवीन तोफा वगैरे युद्ध सामुग्री आणवीत आहे. अनुभवाअंती जागें होतें.

गोवें प्रांतांत अद्यापि स्वस्थतेची चिन्हें दिसत नाहींत बंडवाले लोक हातीं लागत नसून त्यांची दांडगाई अद्याप चालू आहेच. श्रीस. वि.

नोटीस.

ति० रा० रा० निंबाजी मते राहणार भंडारजी भगताची ता. बाळापूर यांस

नोटीस देणार बापुण्या वल्लद मारुती गावंडे. असें कळवितो कीं, तुझी मुलगी नामे गिरजी ही माझी लग्नाची बायको आहे. व तिचे अंगावर दागिने आदमासे रुपये १५० आहेत. मी स्वतः १०-१५ वेळा तिजला घेणें करिता आलो परंतु पाठविली नाहींस व वाटेल ती सबब सांगतोस याजकरितां तूं तिजला दागिन्या सुद्धां ही नोटीस पावल्यापासून ४ दिवसांत आणून पावती करावी. कारण तूं बनावट फारकती रचणार आहेस व मी कोणत्याही प्रकारानें फारकती देत नाहीं तिजला नांदाविण्यास सर्व प्रकारानें तयार आहे तर तूं तिजला आणून पावती करावी. असें जाहाले नाहीं तर रिती प्रमाणें ताब्यांत घेणें करितां फिर्याद करून ताब्यांत घेतली जाईल व याजबद्दल जो खर्च ह्य। नोटिसीसुद्धा होईल तो सर्व भरून घेतला जाईल ह्मणून दिल्ही नोटीस सही तारीख १८।२।९६ इसवी.

(सही) बापुण्या वल्लद मारुती
गावंडे निशाणी वखर.

नमुना नंबर १४३

कोणी स्थानापन्न होतो तेव्हां त्यांस कर्ज वसूल करतां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून त्यानें जिल्हे कोर्टास अर्ज केल्या विषयीं जाहीरात

सन १८८९ चा अक्ट ७ कलम ६ प्रमाणें.

दि० क्रॉ० १५ मिसल नंबर $\frac{१}{१८९६}$

वि० सिव्हील ज्यडज साहेब जि० आकोला यांचे कोर्टांत

नांव—जानीबाई मर्द धानमल व धापाबाई मर्द—हरचंद
रहाणार—उगव तालुके आकोला
जिल्हा—आकोला यांस मयत

हरचंद बापोंचे नांव धानमल मारवाडी रहाणार उगव तालुके आकोला जिल्हा आकोला यांचें कर्ज वसूल करितां येण्यासाठीं सरटीफिकीट मिळावें ह्मणून सदरहू अर्जदार यांणें अर्ज केला आहे त्याज करितां सदरहू मयत मनुष्याचे मालमिळकतीवर किंवा तिचे कांहीं भागावर आपला हक्क आहे ह्मणून ज्या मनुष्याचा दावा असेल त्यांस जाहिरातीचे द्वारें कळविण्यांत येत आहे कीं, त्यांनीं ता० ९ माहे मार्च सन १८९६ इसवी रोजीं सदरहू अर्जीची चौकशी होईल त्यावेळीं या कोर्टांत हजर हाऊन आपापले हक्का विषयीं लेखी हकीकत दाखल करावी.

ता० १८ माहे फेब्रुवारी सन १८९६ इसवी.

V. N. Dandekar.
सि० ज्यडज्य.

☞ हे पत्र अकोलें येथें कै० वा० खंडेराव बाळाजी फडके यांचे "वऱ्हाडसमाचार" छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं छापून प्रसिद्ध केलें.